१८२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

22-९-१९२८

बारावे महाराष्ट्र साहित्य संमेलन

स्वागताध्यक्ष न. चिं. केळकर यांचे भाषण

REFBK-0003286

ग्रं. मं. ठाणें
निबंध
९५८

बारावें

महाराष्ट्र साहित्य संमेलन

पुणें

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी,
स्वागताध्यक्ष—श्री० न. चिं. केळकर
व अध्यक्ष—श्री० श्री. कृ. कोल्हटकर
यांचीं भाषणें

२२ मे १९२७

आणे

वाचन. २३०१
र. क्र. ३२८९
REFBK-0003286

बारावें

महाराष्ट्र साहित्यसंमेलन, पुणें.

श्री. नारायणराव बाबासाहेब घोरपडे,
संस्थान इचलकरंजी यांचें

प्रास्ताविक भाषण.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन,
यांनीं छापिलें व श्री. दत्तो वामन पोतदार यांनीं
पुणें येथें प्रसिद्ध केलें.

१९२७.

वा॰नं. १६५

बारावें महाराष्ट्र साहित्यसंमेलन, पुणें.

श्री. नारायणराव बाबासाहेब घोरपडे, संस्थान इचलकरंजी यांचें

प्रास्ताविक भाषण.

ग्रं. क्र. ३२८६

आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ॥
ते श्री शारदा विश्वमोहिनी । नमिली मिया ॥

रा. रा. नरसोपंत केळकर, रा. रा. श्रीपादराव कोल्हटकर व इतर साहित्य-प्रेमी बंधुभगिनींनो,

आभार प्रदर्शन.

या द्वादश साहित्य संमेलनाचा दरबार खुला करून प्रास्ताविक भाषण करणेचा मान मला देत आहां याबद्दल मी आपणा सर्वांचा फार आभारी आहें. एखाद्या गरिबास श्रीमंतांच्या पंक्तीचा लाभ झाला असतां जसा आनंद वाटतो तसाच आनंद आपल्यासारख्या साहित्यसेवकांच्या सहवासाचा लाभ घडल्यानें मला होत आहे. हा मान ना. गव्हर्नरसाहेब यांचेसारखे मोठे सरकारी स्थानिक अधिकारी किंवा एखाद्या सर्व मान्य व जाडच्या विद्वानास देणें वाजवी होतें, असें असतांही हा मान मला देऊन आपण सर्वांनीं माझा गौरव केला, याबद्दल मला धन्यता वाटत आहे. कार्यकारी कौन्सिलर्स व प्रांतिक दिवाण हल्लीं आपणांपैकींच आहेत; लॉर्ड सिंहासारखे आपल्यालाही देशी भाषा जाणणारे यापुढें गव्हर्नर लाभोत व त्यांचे हस्तें असले समारंभ खुले करण्याचे प्रसंग येवोत.

स्वतःसंबंधीं दोन शब्द.

माझे हातून वाङ्मयसेवा म्हणण्यासारखी कांहींच घडलेली नाहीं; कांहीं निबंध व एखाददुसरे पुस्तकाचीं माझे हातून भाषांतरें झालीं आहेत. माझे अंगीं पात्रता नसतांनाही अशा प्रसंगीं आपणांपुढें चार शब्द बोलण्याची संधि दिलीत याबद्दल मला फार संतोष वाटत आहे. यापूर्वी मला साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष होणेबद्दल तीन चार वेळां विचारणेंत आलें होतें. गेल्या सा ींही गु. प्रो. पाध्ये यांनीं मुंबईचे अधिवेशनाचे वेळीं पुन्हां विनंति केली होती, परंतु हें जबाबदारीचें काम माझे हातून बरोबर रीतीनें पार पडणार नाहीं असें वाटल्यानें मला तें आमंत्रण स्वीकारतां आलें नाहीं. रा. रा. नरसोपंत केळकर हे नुकतेच आजरें माधवगिरी येथें विश्रांतीस आले होते. त्यांचेमार्फत प्रो. पाध्ये यांनीं यंदाचे साहित्य संमेलनाचे वेळीं मी फक्त प्रास्ताविक भाषण करावें व अध्यक्षस्थान रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें आहे असें विचारणेंत आलें. या उभयतांचा शब्द मोडणें बरें नाहीं व जबाबदारीही त्या मानानें कमी असें वाटून मी ही कामगिरी करणेचें पत्करलें. मराठी वाङ्मयाची वाढ व्हावी अशी माझी मनापासून असलेली इच्छाही या कामीं कारणीभूत झाली; आतां मी जे चार शब्द आपणांस सांगणार आहें ते वाङ्मयप्रेमी वाचकवर्गाला वाङ्मयाविषयीं जें कांहीं वाटतें त्यासंबंधीं आहेत. ही कामगिरी माझे हातून यथामति जी होईल ती आपण सर्वांनीं गोड करून घ्यावी एवढीच विनंति आहे.

वाङ्मयाच्या अभिवृद्धीस शांततेची व सुराज्य-व्यवस्थेची अवश्यकता.

व्यापार, कलाकौशल्य व वाङ्मय यांच्या अभिवृद्धीस व उत्कर्षास शांततेच्या काळाची व सुराज्यव्यवस्थेची अत्यंत अवश्यकता आहे, आणि हीं दोन्हीही इंग्रज सरकाराच्या सुव्यवस्थित व सुसंघटित राज्यकारभारापासून आम्हांस लाभलीं आहेत ही मोठी समाधानाची व भाग्याची गोष्ट आहे. आजकाल उद्योगधंदे कलाकौशल्य वगैरे बाबतींत जी उन्नति दिसत आहे

तिचें बरेंचसें श्रेय या सुराज्यव्यवस्थेस आहे. मराठ्यांचा बराचसा काळ धामधुमींत गेल्यानें त्यांना अधिभौतिक शास्त्रांचा व ललितकलांचा उत्कर्ष करणेंस जितका अवसर मिळाला पाहिजे तितका मिळाला नाहीं, असो. ब्रिटिश साम्राज्यछत्राखालीं उत्तरोत्तर आमची अशीच सर्वांगीण उन्नति होऊन आमच्या सर्व आकांक्षा पूर्ण होतील अशी मला बळकट आशा आहे.

साहित्याचें वातावरण शुद्ध असतें.

आतां साहित्याच्या महतीसंबंधीं माझ्या अल्पमतीला जे विचार सुचतात ते आपणांपुढें मांडणेची मी परवानगी घेतों. साहित्याचें असें एकच वातावरण आहे कीं जें अत्यंत शुद्ध व पवित्र असून ज्यांत पक्ष अगर मतभेद यांस बिलकुल वाव नाहीं, व कोणत्याही सार्वजनिक कामांतील लोकांना व कोणत्याही जातीच्या व्यक्तींना यांत समान अधिकार आहेत. राजकारण किंव सामाजिक उलाढालींप्रमाणें येथील वातावरण दूषित नाहीं. सर्व साहित्यभक्तांना शारदादेवीचें मंदीर सदैव खुलें आहे. करितां सर्व भेदभाव विसरून सर्वांनीं या ज्ञानसत्रांत भाग घ्यावा अशी माझी विनंति आहे.

साहित्याची महती.

साहित्याची महती केवढी मोठी आहे हें मी आपणांस नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं, त्यासंबंधीं एक गोष्ट सहज आठवते ती मी सांगणेंची परवानगी घेतों. आम्ही एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें असतांना एकदां प्रो. वर्ड्सवर्थ साहेबांनीं प्रश्न टाकिला कीं, राजकारणी ग्लॅड्स्टन मोठा कीं कवि टेंनिसन मोठा. त्यावर आमचेपैकीं एकानें उत्तर दिलें कीं, ग्लॅड्स्टन मोठा. हें ऐकून प्रोफेसरसाहेबांना फार राग आला व ते म्हणाले, ग्लॅड्स्टन आज सर्वांचे नजरेपुढें आहेत, पण उद्यां जग त्यांनां विसरेल. टेनिसन हे इंग्लंडचे एक प्रसिद्ध कवि म्हणून मात्र साहित्यसृष्टींत कायमचे राहतील, व या दृष्टीनें इंग्लंडचे कांहीं काळ असलेले मुख्य प्रधान ग्लॅड्स्टनसाहेब यांचेपेक्षां कवि टेनिसन किती तरी श्रेष्ठ आहेत. कार्लाईलनें आपल्या ' हीरो आणि हीरोवर्शिप ' या पुस्तकांत म्हटलें आहे कीं, मी एकवेळ ब्रिटिश साम्राज्य

सोडणेस तयार होईन, पण मी शेक्सपीयर कवि कधींही गमावणार नाहीं. हें आपल्या वाचनांत आलें असेलच. आमच्या कवीसंबंधींही ही गोष्ट खरी आहे. आपल्या वेदामधील कांहीं सूक्तें फार उदात्त रमणीय काव्यमय आहेत. त्यांत निसर्गाच्या शक्तींची—वरूण, मारुत, उषा, वगैरेंचीं व मानवी स्वभाववैचित्र्याचीं किती बहारीचीं व मनोवेधक वर्णनें आहेत हें मीं आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. हीं सूक्तें मंत्ररुप झालीं आहेत. राम श्रेष्ठ का रावण श्रेष्ठ या प्रश्नाचें उत्तर या उभयतां अद्वितीय पुरुषांचें वर्णन करून त्यांचें नांव अजरामर करून ठेवणारा कवि वाल्मिकी अधिक श्रेष्ठ असें सुभाषित आहे, तें आपलें पाहण्यांत असेलच. तसेंच कविकुलगुरु कालिदासामुळेंच त्याचे आश्रयदात्याची म्हणजे भोजराजाची आज आम्हांस स्मृति आहे. अगदीं आलीकडील काळाकडे पाहिलेतही हेंच दिसून येतें. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्या प्रेमळ व रसाळ काव्यांमुळेंच त्यांची इतकी कीर्ति झाली आहे. तत्कालीन व मागेंपुढें झालेले इतर कित्येक त्यांचे बरोबरीचे साधुसंतांची आम्हांस आतां आठवणही राहिलेली नाहीं.

साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः ॥

ही कव्युक्ति प्रसिद्धच आहे. त्यासंबंधीं मीं कांहीं विस्तारानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु याचे अगदीं उलट असें एकमत आहे. या जीवन कलहाचे सृष्टींत काव्य धनोत्पादक नसून निरुपयोगी लोकांचे करमणुकीचें व काळाचा अपव्यय करणेचें एक साधन आहे. या दोन्ही विचारसरणींत अतिरेक असला तरी त्यांत तथ्यांश आहे, नाहीं असें नाहीं. "॥ **पिपासितैः काव्यरसो न पीयते** ॥" ही उक्ति आपणांस श्रुतच आहे. तात्पर्य काय काव्याचा आस्वाद घेणेस इतर स्वास्थ्याचीही जरूरी असते. हें खरें.

वाङ्मय राष्ट्राच्या उन्नति अवनतीचें मापनयंत्र आहे.

काव्यरसाला 'ब्रम्हानंद सहोदरः' असें म्हटलें आहे. हा आनंद कष्टमय जीवनयात्रेचा क्षणभर विसर पाडतो. तथापि साहित्याचा एवढाच उपयोग आहे असें नाहीं. राष्ट्राच्या उन्नति, अवनतीचें वाङ्मय हें एक उत्कृष्ट

द्योतक अगर मापनयंत्र (Barometer) असून सत्प्रेरणा करणारें आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. युरोपमधील १२,१३ व्या शतकांतील विद्येच्या पुनरुज्जीवनाचें म्हणजे 'Renaissance' चें श्रेय बरेच अंशीं तत्कालीन वाङमयास आहे. इंग्लंडमधील सुधारणा युग (Reformation) त्यावेळच्या ग्रंथकारांनीं घडवून आणिलें असे म्हणणें सत्यास सोडून होणार नाहीं. तसेंच फ्रान्स व इटलीमधील राज्यक्रांतीचें बीज ग्रंथकारांनींच पेरिलें हें सर्व विश्रुतच आहे. आपल्या महाराष्ट्रांतही शिवाजी-महाराजांचे वेळीं स्वातंत्र्यस्फूर्ति निर्माण करण्यास तुकाराम रामदासादि साधूसंतांचें काव्य कारणीभूत झालें. अगदीं अलीकडील काळ घेतल्यासही हेंच दिसून येतें. लोकहितवादींनीं जुन्या चालीरीतीमधील दोष दाखवून सुधारणेस उत्तेजन दिलें. तसेंच कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपलें तेवढें सर्व वाईट, विलायती तेवढें चांगलें, ही रूढ झालेली चुकीची समजूत दूर केली. गोविंदराव देवलांच्या शारदा नाटकानेंही बालविवाहास आळा घालून लोक-मत प्रौढ व विधवाविवाहास कसें तयार केलें हें आपणांस माहीतच आहे. कै. हरी नारायण आपटे यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो' वगैरे सारख्या कादंबऱ्यांनीं समाजजागृतीचें काम कसें केलें हें आपणा सर्वांस विदितच आहे 'Uncle Tom's Cabin' या पुस्तकानें गुलामगिरीच्या हिडीस स्वरूपाचें आविष्करण करून अमेरिकेंत व इतरत्र गुलामगिरीचें निर्मूलन करणेंचे कामीं केलेली कामगिरी प्रसिद्धच आहे. करितां यावरून राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षाचा संबंध साहित्याशीं किती निगडित झालेला आहे हें दिसून येईल.

साहित्याची व्याख्या.

आतां साहित्य म्हणजे काय हें थोडें पाहूं. साहित्याच्या आजपर्यंत बऱ्याच व्याख्या झाल्या आहेत. मी त्यासंबंधीं आतां विशेष चर्चा करूं इच्छित नाहीं व तसा माझा अधिकारही नाहीं. शिवाय आजचे आपले सन्माननीय अध्यक्ष या विषयावर योग्य तो प्रकाश पाडतीलच. परंतु मला इतकेंच सांगणेचें आहे कीं सारस्वत, साहित्य व वाङमय हें तिन्ही शब्द समानार्थीं योजले जातात,

तसें न करित. अभिजात किंवा नागर वाङ्मय यालाच सारस्वत म्हणावें. साहित्य आणि वाङ्मय हे दोन्ही शब्द इंग्रजींत ज्याला 'लिटरेचर' म्हणतात त्याअर्थी वापरले जावेत; सर्व लिखाणाला किंवा बोलण्याला सरसहा सारस्वत म्हणणें बरें दिसणार नाहीं असें माझे अल्पबुद्धीला वाटतें.

काव्य या शब्दांत गद्य व पद्य या दोहोंचाही समावेश होतो. पण साहित्य या शब्दानें काव्याचें बाह्य स्वरूप (form) आणि वस्तुस्वरूप (matter) यांचाच केवळ नव्हे तर इतर तदंगभूत वस्तूंचाही सहभाव दाखविला जातो. उदाहरणार्थ, काव्यांत वर्णावयाचा नायक व तद्विषयक कथानक, काव्यांतील व्यक्ति व समाज, काव्यांतील परिस्थिती व त्यांत प्रतिपादिलेलें ध्येय या सर्वांचा एकमेकाशीं पूर्ण सहभाव अथवा साहित्य पाहिजे तरच तें काव्य यशस्वी व चिरपरिणामीं होऊं शकतें. फार काय लेखक, कवी व त्यांचे विमर्शक, रसिक वाचक, मुद्रक व प्रकाशक या सर्वांचें साहित्य किंवा सहकार्य असावयास पाहिजे. अशाप्रकारचें सर्वांगीण साहित्य निपजावें, वृद्धिंगत व्हावें, हेंच साहित्य संमेलनाचें खरें कार्य आहे असें मी समजतों.

कवींना एक सूचना.

काव्याविषयीं विचार करितांना कवींचे बद्दलही एक गोष्ट सांगावीशीं वाटते. कित्येक वेळां कवींना आपण कांहीं नवीनच जनतेपुढें मांडतों असें वाटत असतें, '**जें न देखे रवि तें देखे कवि**' अशी म्हण आहे व त्यांत पुष्कळ सत्यही आहे. परंतु सुशिक्षित व बहुश्रुत समाजाला न पटेल असें जर कवी सांगूं लागला तर त्याचे काव्याची चीज होणार नाहीं हें उघडच आहे. पुष्कळ वेळां लोकांना काव्यमर्म कळत असतें व तसले विचारही सुचतात, परंतु कवीप्रमाणें आमच्या कल्पना आम्हांस शब्दांत व्यक्त करितां येत नाहींत, आणि हें कौशल्य कवींचे ठायीं मात्र चागलें प्रकारें असतें. तेव्हां सुशिक्षित बहुजन-समाजापेक्षां आपण फार श्रेष्ठ आहोंत अशी कवींनीं समजूत करून घेऊं नये अशी माझी त्यांना विनंति आहे. सहृदय समाजाला पटेल व रुचेल अशाच काव्याची चहा होते हें कवींनीं विसरतां कामा नये.

कलौ शक्तिः संघे.

प्रस्तुत काळ संघशक्तीचा आहे. ' कलौ शक्तिः संघे ' हें सुभाषित आपणा सर्वांस माहीतच आहे. संमेलनें, परिषदा, सभा, महासभा, अशीं आजच्या काळाला अनुरूप साधनें आहेत व त्यांचा निरनिराळे कार्यासाठीं उपयोग करून घेणें क्रमप्राप्तच आहे. करितां सर्व साहित्यभक्तांनीं एकत्र विचारविनिमय करून अनेक महत्वाचीं कामें श्रमविभागाचे तत्वावर करणेसारखीं आहेत. उदाहरणार्थ, मराठी मधील शास्त्रीयपरिभाषा निश्चित करणें, मराठीचा शब्दकोश तयार करणें, मराठी मुद्रणकलेंत शक्य त्या सुधारणा घडवून आणणें, द्रव्याभावीं धूळ खात पडलेले व आतां दुर्मिळ झालेले ग्रंथ प्रकाशित करणें वगैरे अनेक महत्वाचीं कामें साहित्य संमेलना-मार्फत व्हावयास पाहिजेत. याबद्दल मागील संमेलनांतून चर्चा झाली आहे, व याही संमेलनांत होणारच असेल.

मराठी वाङ्मयासंबंधीं विचार.

असो. आतां मराठी वाङ्मयाचा थोडा विचार करूं. बंगाली, पंजाबी, द्राविडी, तैलंगी ह्या भाषा बोलणारे लोक हे प्रायशः सर्व त्या त्या प्रांतांत एकत्रित असे आढळतात. मराठी बोलणारांची मात्र तशी स्थिती नाहीं; हे बरेच प्रांतांवर विभागलेले आहेत. उत्तरेस ग्वाल्हेर, झांशी, इंदूर, बडोदा, वऱ्हाड मध्यप्रांत या ठिकाणीं मराठी भाषा बोलणारे बरेच लोक आहेत. तसेच दक्षिणेकडे तंजावर, म्हैसूर व मद्रास इलाख्यांत ठिकठिकाणीं मराठी मातृभाषा असणारे लोक आढळतात. शिवाय आपल्यापैकीं मोठमोठे संस्थानिक परप्रांतांत आहेत त्यामुळें आपल्या मातृभाषेला जितकें उत्तेजन व साह्य व्यावयास पाहिजे तितकें त्यांना देतां येत नाहीं. व आपला बहुतेक व्यापार मराठी मातृभाषा नसणारांचे हातीं आहे. गुजराथ, बंगाल, पंजाब, या प्रांतांचे तसें नाहीं. त्यांचे संस्थानिक त्याच प्रांतांत असून त्यांचे लोकही एकेठिकाणीं आहेत. महाराष्ट्राप्रमाणें तेथील लोकसंख्या विखुरलेली नाहीं. बंगाल, गुजराथ, वगैरे प्रांत संपन्न आहेत, व त्यामुळें साहित्याच्या बाबतींत व इतर बाजूंनीं त्यांची उन्नति सहज होऊं शकते. महाराष्ट्र अकिंचन असून

निरनिराळे अमलाखालीं विभागलेला आहे. त्याचा विस्तारही आकुंचित होऊं लागला आहे. मराठेशाहींत महाराष्ट्र तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत गणला जात असे, व महाराष्ट्र म्हणजे महा–राष्ट्र हें नांव त्यावेळीं यथार्थ होतें परंतु ती स्थिती आतां राहिलेली नाहीं. असें जरी आहे तरी निराश होण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्रांत बुद्धिमत्ता, वाङ्मयाभिवृद्धीची लालसा उत्कट आहे. या दोन गोष्टींच्या जोरावर सर्व कांहीं साधतां येईल असें माझे अल्प बुद्धीस वाटतें.

इतिहासकार राजवाडे यांची गोष्ट.

यासंबंधीं बोलतांना कै. इतिहासकार विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचें मला नेहमीं स्मरण होतें. त्यांचें म्हणणें असें कीं ज्यांना द्रव्यबल नाहीं त्यांनीं अंगमेहनतीनें श्रम करून व कमी खर्चांत राहून देशसेवा केली पाहिजे. ते स्वतः महिना पांच सहा रुपयांत आपला निर्वाह चालवीत असत असें सांगतात व बराचसा प्रवासही ते पायीं करीत असत. आपल्या बुद्धीसामर्थ्याचे जोरावर त्यांनीं महाराष्ट्रीय ऐतिहासिक वाङमयांत केवढी मोठी भर टाकिली आहे हें मीं आपणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. दुसरें उदाहरण कै. वासुदेवशास्त्री खरे यांचें होय. त्यांनीं पटवर्धनी दप्तराचीं कागदपत्रें संशोधनाचें केवढें महत्कार्य केलें आहे हें आपल्या सर्वांचे नजरेसमोर आहेच. ऐतिहासिक लेख संग्रह छापविण्याचे कामी त्यांचें थोडेसें नुकसानच असे, व केव्हां केव्हां मी त्यांना थट्टेनें म्हणे कीं आणखी एखादें नाटकच लिहा म्हणजे पैशाची अडचण दूर होईल. तेव्हां ते सांगत कीं, जें काम मीं हातीं घेतलें आहे तें पुरें झालें पाहिजे, कारण हेंच राष्ट्राच्या दृष्टीनें अधिक महत्वाचें आहे. गरीबी असली तरी साधी रहाणी ठेवून उत्कट इच्छा, चिकाटी व दीर्घोद्योग यांचे साह्यानें माणसास सर्व कांहीं साधणें शक्य आहे याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे प्रो. धोंडो केशव कर्वे यांचे होय. त्यांचें उदाहरण आजमितीस आपले सर्वांचे नजरेपुढें असलेमुळें मी त्यांचेंसंबंधीं जास्त कांहीं सांगून आपला वेळ घेत नाहीं.

धनिक वर्गास एक सूचना.

जी गोष्ट सारस्वत सेवकासंबंधी सांगितली तीच त्यांना पोषण करणारे धनिकांसही लागू आहे. आपला पैसा सर्व आपले सुखासमाधानावर किंवा चैनीवर खर्च केला तर लोकोपयोगी कार्याला मदत करण्याला सवड कशी राहणार ? करितां अशा धनिक व बऱ्या स्थितींतील लोकांना देखील आपली राहाणी फार साधी ठेवून वाङ्मय उत्कर्षाला व लोकोपयोगी कार्याला मदत करितां येईल व तशी त्यांनीं करावी अशी त्यांना माझी कळकळीची विनंती आहे.

मातृभाषेसंबंधीं विचार.

आतां मातृभाषेच्या उन्नतीसंबंधी थोडा विचार करूं. मातृभाषेंतून शिक्षण देणें इष्ट आहे याबद्दल दुमत राहिलेलें नाहीं, तथापि मराठी भाषेमध्यें ग्रंथ-भांडार पुरेसें नाहीं व मातृभाषेंतून शिक्षण दिलेस इंग्रजीकडे दुर्लक्ष्य होईल असे ठरावीक आक्षेप घेणेंत येतात. परंतु ही विचारसरणीच सदोष आहे असें मला वाटतें. तीस चाळीस वर्षांपूर्वीतरी असा समज होता कीं स्त्रियांनासुद्धां वाङमयाची अभिरुची उत्पन्न करण्यासाठीं इंग्रजीच शिकविलें पाहिजे. कारण त्यावेळीं मराठींत थोडीशीं नाटकें व कांहीं भाषांतरें याशिवाय ग्रंथ नव्हते. परंतु तो मनू आतां पालटला आहे. आतां मराठीमध्यें बहुतेक सर्व विषयांवर चांगले ग्रंथ निर्माण झाले आहेत व होत आहेत, आणि मागणी तसा पुरवठा या न्यायानें, मातृभाषेंत शिक्षण देणेस सुरवात करा म्हणजे आणखी ग्रंथ रचना आपोआपच होईल, ग्रंथ तयार होईपर्यंत मातृभाषेंतून शिक्षण देण्याचें तहकूब करणें हें, अगोदर पोहणेस शिका व नंतर पाण्यांत पडा असें म्हणण्या इतकें सयुक्तिक आहे.

इंग्रजीचें ज्ञान कमी होईल असा दुसरा आक्षेप आहे, त्यांत थोडें तथ्य आहे. परंतु इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविणें सर्वांस अवश्य आहे असें नाहीं. नोकरीपेशाचे लोकांस व आमच्या सारख्यांना, ज्यांचा इंग्रज लोकांशीं वारंवार संबंध येतो त्यांना, इंग्रजी भाषेवर थोडें बहुत प्रभुत्व मिळविणें अवश्य असतें व

त्यांनीं तसें मिळवावेंही. पण नोकरपेशाचे असे लोक, शिक्षित समाजापैकीं शेंकडा फार तर पंचवीस असणार असें असतां इंग्रजींतून शिक्षण घेण्यास सर्वांस लावणें हें अत्यंत अस्वाभाविक व अनिष्ट नाहीं असें कोण म्हणेल. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं आमच्या समाजाचे मातृभाषेंतून शिक्षण देणेचे उपक्रमास असावें तेवढें पाठबळ नाहीं. प्रो. कर्वे यांचे स्त्रियांचे शाळेचें व विश्वविद्यालयाचें उदाहरण घ्या. तेथें मातृभाषेंतून शिक्षण दिलें जातें. पण तेथें विद्यार्थिनींची संख्या फारशी नसते. इतर शाळांतून व कॉलेजांतून पाहिलें तर विद्यार्थिनींची त्यामानानें बरीच गर्दी झालेली दिसते. याचें कारण समाजाची या गोष्टीबद्दल उदासीनता हेंच होय. ज्ञानार्जन हें ध्येय आहे हें विसरून नोकरी मिळविणेचा संभव तरी असावा अशी चुकीची समजूत लोक करून घेतात. इतर देशांत जरूरीप्रमाणें प्रौढपणीं जरूर त्या परभाषेचें अध्ययन करितात. तसेंच इंग्रजीसंबंधानें आम्हीं कां करूं नये ?

दुसरी भाषा (Second Language)

या मातृभाषेच्या विवेचनावरून आणखी एक गोष्ट सुचते ती अशी:— हायस्कूल व कॉलेजमध्यें असतांना आमच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीखेरीज दुसरी भाषा (Second language) म्हणून घ्यावी लागते. वस्तुतः ही तिसरी भाषा होय. कारण इंग्रजी व मातृभाषा या दोन शिकाव्या लागतातच. संस्कृत, फारशी वगैरे भाषांपैकीं एखादी, दुसरी भाषा म्हणून घेणेचा प्रघात आहे,परंतु विद्यार्थ्यांना ही तिसरी भाषा घेणें भाग पडूं नये. त्यानें 'अतिपरिचयात् अवज्ञा' या न्यायानें मातृभाषेची अवहेलना होते. कोणती तरी तिसरी भाषा घेणें इष्ट असेल तर आमचे विद्यार्थ्यांनीं फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, यांपैकीं एखादी घ्यावी. कारण या भाषांचे द्वार पाश्चिमात्य संस्कृतीचें व इतर शास्त्रांचें ज्ञान संपादतां येणें सारखें आहे. संस्कृत भाषेचें महत्व कमी आहे असें नाहीं, ती तर देवभाषा आहे. परंतु ज्यांना संस्कृताचा पुढें व्यासंग करणेचा नाहीं त्यांनीं संस्कृतभाषा न घेतां वर सांगितल्यापैकीं कोणतेही भाषेचा व्यासंग केला तरी चालेल. या भाषेचें अध्ययन केल्यास फक्त इंग्रजी पुस्तकांचे वाचनानें आपलें ज्ञान

भा॰ १३७

एकांगी झालेलें असतें तसें रहाणार नाहीं. करितां आपण अशा भाषांचें अध्ययन करून पाश्चात्यांचें ज्ञानभांडार लुटलें पाहिजे.

फ्रेंच व पोर्तुगीज या भाषांचा अभ्यास.

या भाषासंबंधीं बोलतांना थोडें विषयांतर करून आपणा सर्वांना विश्रुतच असलेली गोष्ट मी पुन्हां एकवार आपले समोर मांडणेची परवानगी घेतों, ती ही कीं:—फ्रेंच भाषेचा अभ्यास करणेकरितां किंवा तो वाढविणेसाठीं आपणांस फ्रान्समध्येंच गेलें पाहिजे असें नाहीं. हिंदुस्थान देशांत त्यांचें राज्य आहे व तेथें शाळा, कॉलेजांतून व युरोपियन व पुढारलेल्या हिंदी समाजांतून, इकडे ज्याप्रमाणें इंग्रजींतून सर्व व्यवहार चालतो, त्याचप्रमाणें पांडेचरी वगैरे ठिकाणीं फ्रेंच भाषेंतच चालतो. तेथें राहून आम्हांस युरोपपेक्षां फार कमी खर्चानें व श्रमानें फ्रेंच भाषेचें अध्ययन करितां येईल. हीच गोष्ट पोर्तुगीज भाषेसंबंधानेंही खरी आहे. या भाषेंतही उच्च दर्जाचें वाङ्मय आहे असें माझें ऐकिवांत आहे.

पुणें युनिव्हर्सिटी.

आणखी एका महत्त्वाचे प्रश्नाचा विचार सुचतो तो म्हणजे पुणें युनिव्ह-र्सिटीचा होय. या प्रश्नाची चर्चा सध्यां सर्वत्र चालू आहेच. पुणें महारा-ष्ट्राचें केंद्र असलेमुळें महाराष्ट्राचें स्वतंत्र विद्यापीठ होणें इष्ट आहे, व परिस्थितीही अनुकूल आहे. मुंबई युनिव्हर्सिटीनें मराठी हा ऐच्छिक विषय बी. ए., एम. ए. या परीक्षांस ठेविलेमुळें मराठी ही आतां प्रमुख भाषा झाली आहे. कर्नाटकांत विद्यापीठ स्थापन करणेबद्दल प्रयत्न चालू आहेत. तसेंच गुजराथेंतही गुथराथी विद्यापीठ स्थापनेची वाटाघाट सुरू आहे. हे दोन्ही प्रांत संपन्न व मोठमोठीं संस्थानें असलेनें तेथें लवकरच विद्यापीठें स्थापिलीं जातील. परंतु महाराष्ट्र गरीब असलेमुळें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्यास दिनावधी होणेचा संभव आहे. अशा वेळीं महाराष्ट्रांतील विद्याभिमानी व धनिक यांनीं पुढें होऊन द्रव्य सहाय्य केलें पाहिजे. मुंबईसारखें सर्वांग परिपूर्ण व सर्वसंग्रही महाराष्ट्रीय विद्यापीठ प्रथम होणार नाहीं हें खरें, तथापि महाराष्ट्राचें स्वतंत्र विद्यापीठ

काढूं नये असें नाहीं. प्रथमतः हिंदुस्थानांत कलकत्ता, मद्रास आणि मुंबई अशीं तीनच विश्वविद्यालयें निघालीं. नंतर पंजाब, अलाहाबाद, बनारस, अलीगड, डाक्का, नागपूर व रंगून अशीं नवीन विद्यापीठें काढणेंत आलीं. इंग्लंडमध्येंही ऑक्सफर्ड, केंब्रीज, या जुन्या व सुप्रसिद्ध युनिव्हर्सिट्या असतांना देखील मॅंचेस्टर, बर्मिंगहॅम, ग्लासगो, लंडन वगैरे पुष्कळ युनिव्हर्सिट्या निघाल्याच कीं नाहीं? तशीच महाराष्ट्रापुरती पुणें येथें युनिव्हर्सिटी निघणेस काय हरकत आहे? शिवाय येथें तीन ऑर्ट्स कॉलेजें, एक इंजिनिअरिंग व एक शेतकी कॉलेज इतकीं कॉलेजें आहेतच. त्यामुळें पुणें युनिव्हर्सिटी काढणें बरेंच सुलभ झालें आहे. पुढें मागें लवकरच धंदेशिक्षणाच्या कॉलेजची जोड दिली म्हणजे झालें.

मराठी वाङ्मयाची वाढ.

युनिव्हर्सिटी निघाली कीं मराठी वाङ्मयाचा सर्वस्वी उत्कर्ष होईल व ग्रंथरचनाही निरनिराळे विषयांवर होऊं लागेल यांत शंका नाहीं. विविध विषयांवर महाराष्ट्रांत चांगले ग्रंथ सध्यां निर्माण होत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं ही स्थिति नव्हती. कांहीं क्रमिक पुस्तकें, नाटकें व थोडीं भाषांतरें यापलीकडे ग्रंथरचना झाली नव्हती. सुदैवानें आज तशी स्थिति नाहीं. मनोरंजक वाङ्मयही पुष्कळ निर्माण झालें आहे. कै. हरीभाऊ आपटे, नाथ माधव, नारायण हरी आपटे, प्रो. वामनराव जोशी ह्यांच्या कादंबऱ्या अव्वल दर्जाच्या नाहींत असें कोण म्हणेल? वेदांत व तत्त्वज्ञान विषयावरही बरीच प्रगल्भ ग्रंथरचना झाली आहे. टिळकांचें गीतारहस्य, प्रो. जोशी यांचें नीतिशास्त्रप्रवेश वगैरे ग्रंथ उत्कृष्ट प्रतीचे या विषयांवर होत. इतिहास व चरित्रें यावरही ग्रंथ बरेच झाले आहेत. कै. राजवाडे, यांचे इतिहासखंड व कै. वासुदेवशास्त्री खरे, ह्यांच्या पटवर्धन दप्तरच्या बखरी, व ऐतिहासिक लेखसंग्रह, रा. सरदेसाई यांच्या रिसायती हे नमुनेदार ग्रंथ होत. तसेंच श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर यांचें टिळकचरित्र, रा. फाटककृत न्या. रानडे यांचे चरित्र, मिसेस रमाबाई रानडे व प्रो. कर्वे यांचीं आत्मवृत्तें हे ग्रंथ फार नांव

घेणेंसारखे आहेत. प्रि. गो. चिं. भाटे यांचीं प्रवासवृत्तें फार प्रसिद्ध आहेत. रामायण, महाभारत योगवासिष्ठ वगैरे संकृत ग्रंथांचीं चिपळूणकर आणि कंपनीनें प्रसिद्ध केलेलीं भाषांतरें चांगलीं साधलीं आहेत. शास्त्रीय ग्रंथांत बरीच प्रगती झाली आहे. डॉ. केतकर यांचे ज्ञानकोशाचा नांवानिर्देश करणें जरूर आहे. प्रो. भानूंची ग्रंथ रचना पुष्कळ असून त्यांत गीतेवरील त्यांचा ग्रंथ विशेष नांव घेणेजोगा आहे. रा. खाडिलकर, रा. केळकर, रा. कोल्हाटकर, कै. गडकरी, कै. देवल यांनीं उच्च प्रतीचीं नाटकें लिहून नाट्यवाङ्मयांत भर टाकिली आहे. काव्यशाखेंतही बरीच भर पडली आहे. रे. टिळक, रा. मोगरे, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, लेले ठोंबरे, अनंततनय ह्यांच्या कविता ह्या गोष्टीची साक्ष देत आहेत. इतरहीं पुष्कळ चांगले ग्रंथ आहेत परंतु वेळेच्या अभावी त्यांचा नामनिर्देश करणें मला आतां शक्य नाहीं. एकंदरीनें पाहतां आतांपर्यंत झालेली ग्रंथरचना बरीच आशाजनक आहे यांत शंका नाहीं.

आतां वाङ्मयाभिवृद्धीसाठीं कांहीं सूचना माझे अल्पमतीप्रमाणें करून हें लांबलेलें भाषण संपवितों.

ग्रंथ छपाईस द्रव्य सहाय्य.

द्रव्याभावांत कित्येक ग्रंथ छापिले जात नाहींत तेव्हां ही अडचण दूर करण्यासाठीं कांहीं तरी सुसंघटित प्रयत्न झाला पाहिजे. बडोदें सरकार व इंदूरचे माजी महाराज यांनीं पुस्तक प्रकाशनास मदत करणेचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे. पुणें येथील डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीहीं अल्प प्रमाणावर या बाबतींत कार्य करीत आहे. तथापि हे वर सांगितलेले प्रयत्न सर्व महाराष्ट्राचे मानानें फारच अपुरे आहेत. तेव्हां अखिल महाराष्ट्राची एक व्यापक व सुसंघटित आणि कायमची अशी ग्रंथ प्रकाशनाची योजना होणें अत्यंत जरूर आहे. आतां यास द्रव्यसहाय्य अर्थातच लागणार व तें करणें संस्थानिक व इतर धानिक वर्ग यांचें कर्तव्य आहे. बंगालमध्यें आज:

शास्त्रीय ज्ञानांत व साहित्यांत जी प्रगति दिसून येते तिचें बरेचसें श्रेय तिकडील श्रीमान् जमिनदार, वकील वगैरे लोकां-कडे आहे. यावरून एक आठवण होते ती सांगतों. मी विद्यार्थी असतांना एकदा न्या. रानडे यांना विचारलें होतें कीं अर्थशास्त्राच्या दृष्टीनें बंगा-ल्यांतील कायमधाऱ्याची पद्धति बंद होणें बरें नाहीं काय? त्यावर रावसा-हेबांना मला सांगितलें कीं आपलें म्हणणें एका अर्थीं बरोबर असेल. परंतु राष्ट्राचें कलाकौशल्य व साहित्य यांचे उत्कर्षासाठीं धनिक वर्गाची अत्यंत जरूरी असते. त्याचप्रमाणें राजकीय वगैरे महत्वाच्या सुधारणा देखील असा धनिक व वजनदार वर्ग असल्याशिवाय जोरानें होऊं शकत नाहींत. युरोप-खंडांत काय किंवा हिंदुस्थानांत काय ललितकला व वाङ्मय यांनां आज-पावेतों राजेरजवाडे वगैरे सारख्या बड्या वर्गाकडूनच (Aristocracy) साह्य झालेचें आढळून येतें, व काव्याची आणि कलाकौशल्याची वाढ बऱ्याच अंशीं या वर्गाचे आश्रयानें व उत्तेजनामुळेंच झाली आहे. व हिंदुस्थानांत आजमितीलाही होत आहे असें म्हणणें अतिशयोक्तिचें होणार नाहीं. यापु-ढेंही संस्थानिक व धनिकवर्ग यांजकडून वरीलप्रमाणें अशा राष्ट्रकार्यास मदत होत जाईल. कित्येकांना हा वर्ग निरुपयोगी वाटतो, परंतु माझे मतें हिंदु-स्थानांतील देशी संस्थानांचें अद्याप कार्य संपलेलें नाहीं व त्यांचें अस्तित्व आणखी बरेच दिवस आपल्या देशाचे ऊर्जितावस्थेला अवश्य आहे.

परकीय ग्रंथांचीं भाषांतरें.

सध्या नवे नवे ग्रंथ निर्माण करणेची हांव अधुनिक ग्रंथकारांस आहे व इंग्रजी ग्रंथांचे उद्दे विचार घेऊन इकडील बरेचसे ग्रंथकार मराठींत वाडगे ग्रंथ निर्माण करून आपली हांव पुरी करितात. यामुळें स्वयंस्फूर्तीचा व प्रतिभेचा व्हावा तसा उत्कर्ष होत नाहीं. करितां माझी लेखकवर्गास अशी नम्र सूचना आहे कीं त्यांनीं आपल्या जुन्या वाङ्मयाचा अभ्यास करून जुनी संस्कृति कायम ठेवून ग्रंथ निर्माण करावे. नुसतें परकीय वाङ्मयावरच उपजीविका करणें इष्ट नाहीं.

ज्यांनीं महाराष्ट्र मायभूमि म्हणून पत्करिली आहे त्यांनींहि मराठी वाङ्मयास सहाय्य करावें.

व्यापारानिमित्त व इतर कारणांसाठीं फार दिवसांपासून महाराष्ट्रांत मुसलमान, जैन, लिंगायत, मारवाडी, ख्रिस्ती, गुजर रजपूत वगैरे लोकांनीं कायमचें वास्तव्य केलें आहे. त्यांचा सर्व व्यवहार मराठींतूनच चालतो. करितां त्यांनीं मराठी वाङ्मयास द्रव्यसहाय्य व उत्तेजन देऊन मराठीसारस्वताच्या अभिवृद्धीला हातभार लावावा अशी माझी त्यांनां विनंति आहे. त्यांनीं आपआपले मातृभाषेचा योग्य अभिमान बाळगावा व घरीं आपली बोली कायम ठेवावी, आणि तें योग्यच होईल. परंतु जो देश मायभूमि म्हणून पत्करला त्या देशाच्या भाषेबद्दल अनास्था बाळगणें बरोबर नाहीं असें मला वाटतें. आपली महाराष्ट्रीय मंडळी ज्या प्रांतांत कायम राहणे साठीं गेली आहेत तेथें त्यांनीं आपली भाषा कायम ठेवून परप्रांतीय भाषेचा पूर्ण अवलंब केला आहे. हे माझे विचार विशेषतः आमचे मुसलमान बंधुवर्गास उद्देशून आहेत. महाराष्ट्रांत मुसलमानांची संख्या बरीच आहे. त्यांचेकडून एकादे दुसरे व्यक्ति खेरीज मराठी वाङ्मयास फारसें उत्तेजन मिळत नाहीं; उर्दुभाषेंतूनच आपलें सर्व शिक्षण व्हावें अशी अपेक्षा करणें जरा गैर आहे असें मला वाटतें. उर्दू ही दुसरी भाषा म्हणून घेतां येतेच. वर उल्लेखलेल्या सर्व लोकांनीं मराठी भाषेच्या उत्कर्षाकरितां आम्हांला साह्य करावें हें सांगणेचा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रीय भाषा.

हिंदुस्थानची हिंदी ही एक राष्ट्रीय भाषा असावी अशाबद्दल प्रयत्न चालू आहेत व ते स्तुत्यच आहेत. पण त्याबरोबरच मातृभाषेची हेळसांड करावी असें नाहीं. युरोपमध्येंही फ्रेंच ही सर्व राष्ट्रीय भाषा (Lingua franca) समजली जाते, तथापि त्यामुळें आपआपले राष्ट्रीयभाषेची कोणी हेळसांड करीत नाहींत. तसेंच येथेंही झालें पाहिजे.

साहित्य सेवकांनीं द्रव्याचा लोभ धरूं नये.

राजकारणामध्यें जशी स्थिति आहे त्याप्रमाणेंच साहित्य सेवेचे एकाच

कायाला वाहून घेतलेले लोक आपलेमध्यें फार थोडे आहेत. आपला व्यवसाय संभाळून साहित्यसेवा करमणुकीखातर अगर केवळ देशासाठीं वाङ्मय निर्माण करणारे आपलेमध्यें कांहीं लोक आहेत, परंतु त्यांचे हातून उच्च दर्जाचें वाङ्मय निर्माण होणें केव्हांही शक्य नाहीं. एकनिष्ठ, निर्लोभ व निस्सीम वाङ्मय भक्तांकडूनच उच्चप्रतीचें वाङ्मय निर्माण होऊं शकतें. वाङ्मय उपासक बहुधा अकिंचनच असतात. कारण श्रीचें व सरस्वतीचें वास्तव्य एके ठिकाणीं क्वचितच असतें. **'निसर्ग भिन्नास्पद'** अशा या दोन देवी आहेत. तेव्हां अशा निस्सीम साहित्य सेवकांचा चरितार्थ चालविणें, त्यांचे ग्रंथ प्रकाशनास मदत करणें हें समाजाचें कर्तव्य आहे. पाश्चिमात्य देशांतून चांगल्या ग्रंथकारास युनिव्हर्सिटी व प्रकाशक यांचे कडून साह्य मिळतें. आमचेकडे ग्रंथालयें, व वाचनाची आवड वाढलेमुळें ग्रंथकारास थोडेंबहुत पुस्तकें खपणेचे बाबतींत मदत होते. तथापि होतकरू ग्रंथकारांना अधिक प्रमाणावर मदत होईल अशी तजवीज होणें अवश्य आहे. सरस्वतीभक्तांनीं मात्र द्रव्याचा लोभ धरतां कामा नये; कारण द्रव्ययोग नेहमींच शक्य असतो असें नाहीं.

उद्योगधंदे व शास्त्रीय ज्ञान या विषयांवर मराठी ग्रंथांचा अभाव.

तत्वज्ञान, वेदांत, काव्य, व ललितकला या विषयांवर वाङ्मय आपलेंत बरेंच निर्माण झालें आहे. तथापि उद्योगधंदे व शास्त्रीयज्ञान या बाबतींत आपलेकडे अगदींच थोडे ग्रंथ आहेत. असलें शास्त्रीय व धंद्यासंबंधीं वाङ्मय निर्माण झाले शिवाय उद्योगधंदे व्यापार वगैरेची वाढ होणें शक्य नाहीं. दरिद्री व बेकार महाराष्ट्रांत धंद्याची वाढ होणें अत्यंत जरूर आहे, तेव्हां असलें वाङ्मय जितकें निर्माण होईल तितकें पाहिजे आहे. आणखी एका तऱ्हेचे वाङ्मयाची आपणांत जरूरी आहे. बालक व स्त्रीवाचकवर्ग यांचे हातांत देणें-सारखे ग्रंथ आमचेमध्यें फारच थोडे आहेत असें म्हटलें तरी चालेल. स्त्रीवर्गांत व बालक वर्गांत वाचनाची अभिरुची वाढत आहे. करितां तिला योग्य वळण लावणारे ग्रंथ जितके अधिक निर्माण होतील तितके पाहिजे आहेत. केवळ इंग्रजीग्रंथाचे रूपांतरानें हें काम भागणार नाहीं. आपली संस्कृति कायम राहून तिचे पायावर अधिक विस्तार होईल असें वाङ्मय हवें आहे.

वाङ्मय सेवकावरील जबाबदारी.

अलीकडे कांहीं वर्तमानपत्रांतून व मासिकांतून अगदीं हलके प्रतीचें वाङ्मय निर्माण होत आहे व त्यामुळें समाजाच्या रुचीस वाईट वळण लागतें. असें वाङ्मय निर्माण करणारे लेखक बेजबाबदारपणानें सरकारावर व इतर विषयांवर आपली लेखणी चालवून दूषित व अराजकीय वातावरण निर्माण करितात. यास वेळींच आळा घालणें आपले साहित्य भक्तांचे कर्तव्य आहे. या बेजबाबदार लिखाणाचे दुष्परिणाम आज चहूंकडे दृष्टीस पडत आहेत. हिंदु मुसलमान,हिंदूंच्या जाती जाती व पोटजातींमधील आणि इतर असलेच प्रकारचे वाद या बेजबाबदार लिहिण्यापासून उत्पन्न होतात. तेव्हां खरोखरीच जर हिंदु-मुसलमानांत व ब्राम्हण ब्राम्हणेतरांत सलोखा घडवून आणणेचा असेल तर असलें विषारी वाङ्मय एकदम बंद झालें पाहिजे. व या निरनिराळे समाजांतील जे सद्गुण आहेत त्यांचेकडेच विशेष नजर पुरवून साहित्यसेवकांनीं एकी घडवून आणणेचा प्रयत्न केला पाहिजे. अशा तऱ्हेचा प्रयत्न अन्य देशांतून केला जातो. इंग्लंड व स्कॉटलंड हे देश पूर्वीं अगदीं स्वतंत्र होते व त्यांचे मध्यें परस्पर बरीच तेढ होती. परंतु आतां या उभयतां राष्ट्रांचें ग्रेटब्रिटन हें एकच राष्ट्र झालें आहे व प्रत्येकजण देशांतील वीरांचे सद्गुणांचेंच तेवढें वर्णन करितो व त्यांचे अवगुणाची उपेक्षा केली जाते. शाळेंतील क्रमिक पुस्तकांतूनसुद्धां याच धोरणानें धडे घातले जातात, हें मी स्वत: या दोन्हीं देशामध्यें प्रवास करितांना पाहिलें आहे. रॉबर्टब्रूस, वुइलियम वॅलेस, यासारख्या स्कॉटलंडचे राष्ट्रीय वीरांचा अगर एडवर्ड धि थर्ड यासारख्या इंग्लंडचे राष्ट्रपुरुषांचा गौरवपूर्वकच उल्लेख आढळतो. आयर्लंडमध्यें मात्र अशी स्थिती आम्हांस आढळली नाहीं. इतिहासाचे बाबतींत सुद्धां बराच गैरसमज उत्पन्न करणारा, दुसऱ्यांचीं मनें दुखविणारा व परस्परांमध्यें वैमनस्य उत्पन्न करणारा मजकूर लिहिला जातो.कांहीं वर्तमानपत्रकार व मासिक पुस्तकांचे संपादक खोडसाळ व जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करणारा शिवराळ मजकूर लिहून समाजाचें व पर्यायानें राष्ट्राचें अपरिमित नुकसान करितात. आमच्यां-

तील लेखकवर्ग आपल्यावरील जबाबदारी ओळखील तो सुदीन होय. लेखकवर्गावर किती जबाबदारी असते याविषयीं एक कल्पित गोष्ट सांगून या विषयाची रजा घेतों.

फ्रेंच कवीची कल्पित गोष्ट.

एक कवि मृत्युनंतर यमलोकीं गेल्यावर त्याच्या अपराधांची चौकशी होऊन त्याला तापलेलें कढईत टाकणेची शिक्षा फर्मावण्यांत आली. खुनी, दरोडेखोर लोकांनाही आपलेपेक्षां सौम्य शिक्षा झालेल्या पाहून त्यानें स्मित केलें व म्हणाला देवाच्या घरीं न्याय नाहीं. त्यावर देवदूत त्याला म्हणाला, भल्या गृहस्था, तुझ्यासारखे घमेंडखोर लेखक लक्षावधि अपक्व बुद्धीच्या तरुणांचीं व तरुणींची मनें भ्रष्ट करून त्यांच्या डोक्यांत आपल्या देशाविषयीं, धर्माविषयीं अनादर उत्पन्न करून हजारों कुटुंबें धुळीस मिळवितात आणि पर्यायानें देशाचें व समाजाचें अपरिमित नुकसान करितात. अर्थात् असे तुझ्यासारखे लोक दरवडे करणारे लोकांपेक्षां शतपटीनें अधिक दोषी आहेत. आणि अशांनां अधिक कडक शिक्षा देणारा देव अन्यायी कसा ? हें उत्तर ऐकून कवीचें तोंडच मिटलें. तात्पर्य काय आपणा साहित्य सेवकांवर नीतिदृष्ट्या फार मोठी जबाबदारी आहे व सरस्वतीच्या निष्काम सेवेनें ती पार पडली जाईल अशी आशा आहे.

वाचक वर्गावरील जबाबदारी.

ज्याप्रमाणें लेखक वर्गावर चांगलें वाङ्मय निर्माण करणेची जबाबदारी आहे त्याचप्रमाणें वाचक वर्गावरही अशा वाङ्मयास आश्रय व उत्तेजन देऊन अनिष्ट वाङ्मयास आळा घालणेची जबाबदारी आहे. मागणी तसा पुरवठा या न्यायानें जोपर्यंत अश्लील व सदभिरुची बिघडविणारें वाङ्मय वाचणारा वाचक वर्ग आहे तोपर्यंत असलें अनिष्ट वाङ्मय निर्माण होणारच. चहा, चिवडा, कॉफी वगैरेचीं दुकानें बंद व्हावी अशी कांहीं लोकांची किती उत्कट इच्छा असली तरी जोंपर्यंत अशा मालाला गिऱ्हाईक आहे तोंपर्यंत असलीं दुकानें चालणारच. स्वतःच्या व आपल्या मुलांमुलींच्या शारिरिक आरोग्याची काळजी घेणें जितकें आवश्य आहे तितकीच, किंबहुना त्याहून

अधिक काळजी आपणांला व मुलांमुलींना इष्ट वळण लागावें, त्यांची नीति-मत्ता कायम रहावी हें पाहणें प्रत्येक स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे. तेव्हां अनिष्ट वाङ्मयास बिलकुल आश्रय देतां कामा नये.

काव्यें म्हणून दाखविणारे (recitationists).

चांगलें वाङ्मय निर्माण करणें हें जसें महत्वाचें काम आहे तितक्याच महत्वाचें त्या वाङ्मयाचा सामान्यजनास परिचय करून देणें हें आहे. पाश्चिमात्य देशांत मोठमोठे कवींचीं काव्यें म्हणून दाखविणारे (recitationists) व त्यावर चरितार्थ चालविणारे लोक असतात; हा उपक्रम आमच्या इकडेही सुरू केल्यास बरें होईल. पूर्वीचे भाट, गोंधळी, कथेकरी अशीं काव्यें म्हणून दाखवीत असत; परंतु हा वर्ग आतां नष्टप्राय झाला आहे. तेव्हां या धंद्याचें नवीन स्वरूपांत कोणी पुनरुज्जीवन केल्यास हवें आहे. यांत स्वार्थ साधून म्हणजे निर्वाह होऊन लोकरंजनाबरोबरच काव्याची आवड जनतेमध्यें उत्पन्न केल्याचें श्रेय येतें. शाळांतून भेंड्यांची चाल पूर्वी होती, ती आतां हळूं हळूं बंद होत चालली आहे. तिला आलेलें मालिन्य धालविलें पाहिजे. बालकांना यामुळें चांगल्या कवितांचा परिचय होऊन त्यांची स्मरणशक्तीही वाढते.

साहित्य चर्चा.

आतां साहित्यचर्चा कशी व्हावी या विषयीं बोलून माझें बरेंच लांबलेलें भाषण संपवितों. अलीकडे साहित्यचर्चा जी चालते ती बरेच प्रसंगीं पोरकट असून व्यक्तीद्वेष व उपहास यांनीं भरलेली असते. त्यांत भारदस्तपणा बिल-कूल नसतो. पुस्तकाचें परीक्षण करतेवेळीं लेखकाची जात कोण, तो करतो काय, त्याचीं मतें कशीं आहेत, असल्या अप्रस्तुत गोष्टींची चर्चा केली जाते, व पुस्तकांतील विषय भाषा वगैरे गोष्टींकडे दुर्लक्ष होतें, करितां माझी अशी सूचना आहे कीं, साहित्याची गंभीर व सर्वांगीण चर्चा होण्यास कांहीं एक शास्त्रोक्त व नियमबद्ध पद्धति अमलांत आणली जावी; या चर्चेस वाहून घेतलेल्या व समतोलपणानें काम करणाऱ्या मोठ्या तज्ञ विद्वानांनीं पाश्चिमात्य देशांतील पद्धतीप्रमाणें “ अकॅडेमी ”

सारखीं स्वतंत्र नासिकें काढलीं पाहिजेत. साहित्यसंमेलनाचें कार्य वर्षभर अधिक नेटानें चालू ठेवणें करितां कांहीं एक योजना अमलांत आणली जावी. मराठीमध्यें उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ जेथें संग्राह्य केले आहेत अशीं मोठीं ग्रंथालयें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं स्थापिलीं जावींत. लेखक, प्रकाशक व छापखानेवाले, तसेंच रसिक व धनिक वर्ग या सर्वांनीं एकमेकांशीं सहकार्य करून सरस्वतीची उपासना अधिक नेटानें चालू ठेवावी अशी माझी त्यांस कळकळीची व प्रेमाची विनंति आहे.

ग्रंथप्रकाशनाचे बाबतींत स्वतः केलेली मदत.

चांगले प्रकारचे ग्रंथप्रकाशनाचें कामीं धनिकवर्गानें सढळ हातानें साह्य केलें पाहिजे असें मीं मागें म्हटलें आहे. या बाबतींत मी अल्पसा प्रयत्न केला आहे व करणार आहें; त्याचें दिग्दर्शन करण्याची परवानगी घेतों. आजपर्यंत कांहीं ग्रंथकारांनां अल्पस्वल्प मदत माझे हातून झालेली आहे. चांगल्या ग्रंथांचे प्रकाशनासाठीं यापुढें मी दरवर्षी हजारबाराशें अशी रकम कांहीं वर्षें तरी खर्च करणेचें योजिलें आहे. शिवाय अशा बाबतींत एखादी कायम चालण्यासारखी योजना अवश्य आहे म्हणून व तें काम पार पाडणेचें प्रि. घारपुरे यांनीं मेहेर नजरेनें अंगावर घेतलें आहे, व त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. तशी योजना कोणी मजपुढें मांडली तरीहि मी तिचा योग्य तो विचार करीन.

आजचे अध्यक्ष रा. कोल्हटकर यांचें उत्कृष्ट व विचारपरिप्लुत भाषण ऐकण्यास आपण उत्सुक झाला असाल आणि हे उत्तम कवि नाटककार, व विनोदी लेखक असल्यानें त्यांच्या भाषण ऐकण्याची आपणांस उत्कंठा लागावी हें उचितच आहे. त्याचे आड मी आतां येत नाहीं. साहित्याचा विशेष व्यासंग नसणाऱ्या पण साहित्यावर प्रेम करणाऱ्या माझ्यासारख्या त्रयस्थ अनज्ञ (layman) माणसाला साहित्यासंबंधीं काय वाटतें तें मीं माझ्या मोडक्यातोडक्या भाषेंत आपल्यापुढें मांडलें आहे, व याच विषयावर मी चार शब्द सांगावे असें प्रो. पाध्ये व रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं मला सुचविलें होतें. आपले पुढें चार शब्द सांगणेचा माझा अधि-

कार नाहीं, त्यांतून " सह्याद्रीच्या खोऱ्यांत " माधवगिरीवर माहितगार माणसांची किंवा पुस्तक संग्रहाची कांहीं मदत नसल्यानें चार वेडेवांकडे शब्द लिहून ते अशा विद्वत्समूहापुढें मांडले आहेत त्याचा स्वीकार आपण हंसक्षीर न्यायानें करालच. आतां हें आपलें द्वादश संमेलन पूर्ण यशस्वी होवो अशी इच्छा प्रदर्शित करून श्रीज्ञानेश्वराचे भाषेंत मी प्रार्थना करून आपली रजा घेतो:—

साहित्य सोनियाच्या खाणी । उघडवी देशियेचिया अक्षौणी ॥
विवेकवल्लिची लावणी । हो देई सैंघ ॥

क्र. ३२८९

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे

चीफ ऑफ इचलकरंजी.

स्वागताध्यक्षांचें भाषण

स्वागताध्यक्षांचें भाषण

नियोजित अध्यक्ष, श्रीयुत बाबासाहेब इचलकरंजीकर, साहित्यसंमेलनास आलेले प्रतिनिधी, बन्धु व भगिनी—

पुण्यास आज १२ वें मराठी साहित्यसंमेलन भरत आहे. या संमेलनाच्या स्वागतमंडळाचा अध्यक्ष या नात्यानें आपणा सर्वांचें आनंदानें स्वागत करतों.

पुण्यास भरणारें असें हें पांचवें संमेलन होय. यापूर्वीचें पुण्यास भरणारें संमेलन १९०८ सालीं भरलें होतें. अर्थात् संमेलनाच्या भेटीचा लाभ पुण्याला आज सुमारें वीस वर्षांनीं मिळत आहे. मध्यंतरीं तें दोन वेळ बडोद्यास, दोन वेळ मुंबईस, एक वेळ अकोल्यास व एक वेळ इंदूरास भरलें. अशाच रीतीनें संमेलन बोलावण्यासारखीं आणखी बरींच शहरें दक्षिण महाराष्ट्रांत व बृहन्महाराष्ट्रांतहि आहेत. या शहरांची भेट घेण्याकरितां पुण्याला भेट देण्याचें संमेलनानें लांबविलें असतें तरी पुणें शहरानें त्या विलंबाचें दुःख न मानतां आनंदच मानला असता. परंतु यंदा संमेलनाला इतर कोणत्याहि शहराचें आमंत्रण नव्हतें. आणि समेलन भरविण्याच्या परंपरेंत खंड पडूं नये अशी पुणेकरांची इच्छा. म्हणून येथील शारदामंडळानें तें पुण्यास भरविण्याचा उपक्रम केला. तो यशस्वी होऊन आपण सर्व या ठिकाणीं जमलेले आहों. पुण्यानें योजिलेली सेवा व पुढें केलेला पाहुणचार हीं आपण मान्य केलीं हे आम्हांवर उपकार आहेत.

साहित्यसंमेलनसंस्थेचा पूर्व वृत्तान्त आपणांपैकीं पुष्कळांना परिचित असेलच. तथापि अशा विषयांचें स्मरण वरचेवर ताजें झालेलें बरें असतें. म्हणून आजपर्यंत भरलेलीं संमेलनें कोणत्या वर्षी कोणत्या स्थळीं भरलीं आणि त्यांना अध्यक्ष कोण लाभले होते याचें टिपण खालीं दिलें आहे.

अनुक्रम	वर्ष	स्थळ	अध्यक्ष
१	१८८५	पुणें	?
२	१९०५	सातारा	श्री. रघुनाथ पांडुरंग करंदीकर
३	१९०६	पुणें	श्री. गोविंद वासुदेव कानिटकर
४	१९०७	पुणें	श्री. विष्णु मोरेश्वर महाजनि
५	१९०८	पुणें	श्री. चिंतामण विनायक वैद्य
६	१९०९	बडोदें	श्री. कान्होबा रणछोडदास कीर्तीकर.
७	१९१२	अकोला	श्री. हरि नारायण आपटे
८	१९१५	मुंबई	श्री. बाळासाहेब पटवर्धन
९	१९१७	इंदूर	श्री. गणेश जनार्दन आगाशे
१०	१९२१	बडोदें	श्री. नरसिंह चिंतामण केळकर
११	१९२६	मुंबई	श्री. सरदार माधवराव किबे

वरील टिपणावरून हें आपल्या लक्षांत येईल कीं साहित्यसंमेलनाच्या कल्पनेचा मूळ उगम पुण्यास ४२ वर्षांपूर्वी झाला. त्या जुन्या काळीं या नूतन कल्पनेला स्फूर्ति मिळाली ती कै. माधवरावजी रानडे यांजकडून मिळाली असेल असें कोणी अनुमान करील तर तें खरेंच ठरेल.

१८८५ सालीं जें पहिलें साहित्यसंमेलन पुण्यास भरलें त्याच्या विनंतिपत्रावर नीलकंठराव कीर्तने, माधवराव रानडे, माधवराव कुंटे, हरिभाऊ दामले, काशीनाथपंत मराठे, नाना योगी, व्यंकटराव बाबा वकील अशा सद्गृहस्थांच्या सह्या आहेत. नव्या व जुन्या ग्रन्थांचें संगोपन, संशोधन व प्रकाशन या गोष्टी करण्याकडे लोकांचे लक्ष वेधावें, साहित्यव्यासंगी लोकांच्या अडचणी व अनुभव एकमेकांस सांगण्यास संधि मिळावी असा संमेलनाचा उद्देश होता. या पहिल्या संमेलनांत श्री. माधवरावजी रानडे यांनीं सन १८४५ ते १८८५ या अवधींतील मराठी ग्रंथांचें तुलनात्मक सिंहावलोकन केलें होतें. शिवाय दक्षिणा प्राइझ कमिटीचें काम अधिक व्यवस्थित व फलदायी करावें असें पुण्यांतील विद्वान मंडळींस वाटत असल्यानें त्याहि गोष्टींचा प्रश्न या संमेलनांत निघाला होता.

पुढें नऊ वर्षांनीं या कल्पनेस मूर्त स्वरूप येऊन डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी या नांवाची संस्था अस्तित्वांत आली. आणि नवीन ग्रन्थांचें परीक्षण करून त्यांतील कांहींना बक्षिसें देणें, निवडक इंग्रजी ग्रन्थांचीं भाषांतरें करविणें, आणि पेशव्यांचें दप्तर तपासून त्यांतील उपयुक्त लेखांचें प्रकाशन करणें हीं कामें या संस्थेमार्फत होऊं लागलीं. परंतु स्वतः साहित्यसंमेलन सन १८८५ सालीं जें एकदां भरलें तें पुन्हा १९०६ सालापर्यंत पुण्यास कोणाच्या दृष्टीस पडलें नाहीं! त्या सालीं हें पुनरुज्जीवन होण्याचें मुख्य कारण असें कीं, १८८५ ते १९०५ या वीस सालांत नवीन वळणाचें आणि राष्ट्रीय विचाराचें असें बरेंच वाङ्मय निर्माण होऊं लागलें होतें, परंतु डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटीला अशा वाङ्मयाचा जितका परामर्ष घेणें योग्य होतें तितकें तिच्या परिस्थितीमुळें तिजकडून घडलें जाणें शक्य नव्हतें. १९०६ च्या सुमाराला नव्या मनूंतील अनेक मराठी ग्रन्थकार व लेखक हळुहळु उदयाला येऊं लागले होते. अर्थात् डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटीसारख्या संस्थांतून घेतल्या जाणाऱ्या परामर्षापेक्षां अधिक कळकळीचा आपलेपणाचा व उत्तेजनपर असा परामर्ष, नवीन ग्रन्थांचा व ग्रन्थकारांचा, घेतला जावा अशी इच्छा सुशिक्षित लोकांमध्यें सहजच उत्पन्न झाली होती. १८८५ सालीं भरलेल्या संमेलनांत कांहीं उपयुक्त ठराव पास करण्यांत आले. तशा प्रकारचे ठराव एकाद्या प्रतिष्ठित परिषदेच्या द्वारें पुनःपुनः झाल्यास लोकमत प्रगट करण्याला त्यायोगें फार चांगल्या प्रकारचें साहाय्य होणार होतें; आणि व्हरनॅक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटीसारख्या परोपजीवी संस्थेकडून, विशेषतः तिच्या मर्यादित साधनांनीं आणि बंदिस्त व नेमस्त अशा कार्यक्षेत्रांत, हें लोकमत प्रगट करण्यास तर वाव नव्हता. म्हणून सातारा येथें कै. पारसनीस यांच्या प्रयत्नानें सन १९०५ सालीं साहित्यसंमेलनाचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. साताऱ्यास उपक्रम झालेल्या या कल्पनेला पुढल्याच वर्षीं पुण्यास चांगलें स्वरूप आलें. मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें मराठी भाषेचा प्रवेश करविणें, ऐतिहासिक व वाङ्मयात्मक लेखांचा संग्रह करणें, इतिहाससंशोधनास व्यवस्थित स्वरूप देणें, शिलालेखांचे वाचन करणें, आधुनिक

कवींचा परामर्ष घेणें, मराठी भाषेचा कोश विश्वकोश यासारखे प्रचंड ग्रन्थ निर्माण करविणें, इत्यादि उच्च प्रतीच्या विषयांची चर्चा पुण्यास भरलेल्या या दुसऱ्या व एकंदरीनें तिसऱ्या साहित्यसंमेलनांत प्रथम झाली. याचवेळीं साहित्यपरिषद या नांवाची कायमची संस्थाहि स्थापण्यांत आली. त्यानंतर १९०७ व १९०८ सालींहि पुण्यास साहित्यसंमेलन भरविण्यांत आलें. त्यांत या जुन्या व कांहीं नव्या विषयांचें प्रतिपादन होऊन, संस्थेच्या कार्यास व्यवस्थित प्रारंभ होणार तोंच हिंदुस्थानांतील राजकारणाच्या वातावरणांत वादळ व उत्पात यांना सुरवात झाली. आणि तेव्हांपासून साहित्यसंमेलन जें बाहेर भरूं लागलें तें यंदा पुण्यास परतून आलें.

वर सांगितल्याप्रमाणें लागोपाठ तीन संमेलनें पुण्यास भरलीं तरी साहित्यसंमेलन कायमचें नेहमीं पुण्यासच भरावें अशी पुणेंकरांची कधींच इच्छा नव्हती. ज्याप्रमाणें राष्ट्रीय सभा सर्व प्रांतांतून फिरते त्याच प्रमाणें साहित्यसंमेलन देखील महाराष्ट्रांतील व वृहन्महाराष्ट्रांतील निरनिराळया केंद्रस्थानांतून फिरून यावें, यच्चयावत् महाराष्ट्रीय समाज हा मराठी भाषा व वाङ्मय यांशीं समरस व्हावा व त्यांची सेवा केल्याचा आनंद सर्व ठिकाणच्या लोकांना सारखा लाभावा, अशीच पुणेंकरांची इच्छा होती व अजूनहि आहे. अद्यापहि नाशिक सोलापूर धुळें इत्यादि जवळच्या शहरीं, व उमरावती नागपूर उज्जनी झांशी, किंबहुना इकडे तंजावर व तिकडे ग्वाल्हेर, अशा दूरच्या ठिकाणीं संमेलनें भरविण्यास अवकाश आहे. तसेंच बडोदें व इंदूर या संस्थानांचें अनुकरण करून आपण साहित्यसंमेलनें आपल्या गांवीं भरवूं असा विचार दक्षिण महाराष्ट्रांतील सुशिक्षित संस्थानिकांनीं केल्यास तीहि जागा शिल्लकच आहे. पण संमेलनाच्या अखंड बैठकी चालू राहाव्या अशी तर इच्छा, आणि बाहेरचें आमंत्रण तर नाहीं, एवढ्याच करतां पुणें शहरानें यंदा हा उपक्रम केला आहे. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं यंदाचें संमेलन हें आम्ही नाखुषीनें किंवा वेठीसारखें भरवीत आहों. संमेलन दरवर्षी पुण्यास भरलें तर त्यांत आम्हांस आनंदच आहे. आणि तशी कायमची सुपारी आम्हांला कोणी देईल तर ती आम्हीं

आनंदानें स्वीकारूंहि. पुणें हौसेनें काय करावयास तयार आहे एवढेंच येथें सांगितलें. परंतु तें करतांना इतर शहरांचे हक्क व अधिकार संभाळले जावे, त्यांचा उपमर्द होऊं नये, किंबहुना पुणें शहर व महाराष्ट्रांतील इतर शहरें यांचा निरंतर एकजीव राहावा, अशीच पुण्याची खरोखर इच्छा आहे. ती सफल व्हावी म्हणूनच या दोन टोकांच्या दरम्यानच्या स्थितींचें हें थोडेसें सूक्ष्म विवेचन केलें.

यंदाच्या साहित्यसंमेलनापुढें विषय व ठराव कोणते येणार याची माहिती चिटणिसांकडून सभासदांना वेळोवेळीं देण्यांत येईलच. एकंदर कार्यक्रम तीन दिवसांचा धरिला आहे; तरी देखील तीन दिवस कार्याच्या मानानें पुरे होतील कीं नाहीं याची शंकाच आहे. अर्थात् सभासदांची इच्छा असल्यास आणखी एकादा दिवस संमेलनाचें काम लांबविण्याचा स्वागतमंडळाचा विचार आहे.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं श्रीयुत कोल्हटकर यांची निवडणुक स्वागतमंडळानें केलेली असून तें स्थान मंडित करण्याबद्दल त्यांना लौकरच विनंति करण्यांत येईल. तथापि त्यापूर्वी श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी संस्थानचे अधिपति, यांना प्रास्ताविक भाषण करण्याची विनंति आपणातर्फे मी करीत आहें. तें भाषण झाल्यावर अध्यक्ष स्थानापन्न होतील. अशा तऱ्हेचें प्रास्ताविक भाषण होण्याचा उपक्रम साहित्यसंमेलनाच्या इतिहासांत हा पहिलाच होय. तो या पुढेंहि चालूं राहील अशी मला आशा आहे. या उपक्रमाचा हेतू असा आहे कीं प्रत्यक्ष वाङ्मयसेवा करण्याइतकी सवड नसलेले, तथापि वाङ्मय विषयाचें प्रेम व त्याविषयीं आदरबुद्धि बाळगणारे असे जे विद्वान लोक समाजांत असतात. त्यांच्या परिचयाचा लाभ संमेलनाच्या सभासदांना व्हावा. वाङ्मयाच्या क्षेत्रांत प्रत्यक्ष वावरणाऱ्या लोकांप्रमाणेंच दुरून त्या क्षेत्राकडे सहृदयतेनें सहानुभूतीनें व मार्मिक दृष्टीनें पाहणाऱ्या अधिकारी लोकांनाहि वाङ्मयाविषयीं मत देण्याचा अधिकार असतो. किंबहुना एका विशिष्ट दृष्टीनें तो अधिकार वाङ्मयक्षेत्रांत स्वतः वावरणाऱ्या लोकांपेक्षांहि अधिक असतो असें मला वाटतें. त्यांतूनहि श्रीमंत बाबासाहेबांसारख्या संपन्न लोकांनीं मनावर घेतल्यास स्वतः साहित्यसंमेलनाकडून वाङ्मयवृद्धीला जी मदत एरवीं होणें शक्य नाहीं तीहि होण्याजोगी आहे. यासंबंधांत एक गुप्त गोष्ट उघडकीस आणण्याचें काम मी

आनंदानें करितों. कांहीं दिवसांपूर्वी ज्ञानप्रकाश वर्तमानपत्रांत प्रिन्सिपाल घारपुरे यांच्या सहीनें एक जाहिरात प्रसिद्ध होत होती. तींत अशा अर्थाचा मजकूर होता कीं प्रसिद्ध होण्यासारखे परंतु तें छापण्यास लागणारें द्रव्यसाहाय्य नसल्यामुळें हस्तलिखित स्थितींत पडून राहिलेले असे कोणाचे ग्रंथ असल्यास त्यांनीं घारपुरे यांजकडे कळवावें म्हणजे त्यांना द्रव्यसहाय किती कसें देतां येईल याचा विचार होईल. ही जाहिरात श्रीमंत बाबासाहेब यांच्या प्रेरणेनेंच पण घारपुरे यांचे नांवानें दिली होती. ही एकच गोष्ट सांगितली असतां मराठी भाषा व वाङ्मय यांचेविषयीं श्रीमंत बाबासाहेब यांचे मनांत कशा प्रकारची भावना वसत आहे हें सहजच लक्षांत येईल. तात्पर्य वाङ्मयाविषयीं प्रेम व तें परोपकारबुद्धीनें सफल करण्याला लागणारी द्रव्यानुकूलता ज्यांना ईश्वरानें दिली आहे अशा सद्‌गृहस्थांनीं स्वतः पुष्कळसें वाङ्मय लिहिलें नसलें तरी साहित्यसंमेलनासारख्या प्रसंगीं त्यांना गौरवपूर्वक पाचारण करणें हा त्यांचा बहुमान म्हणण्यापेक्षां संमेलनानें स्वतःचा केलेलाच बहुमान होय. वाङ्मयलेखन हें कांहीं अंशीं हौसेनें होत असतें हें जरी खरें तरी वाङ्मयाचा किती भाग गरजेमुळें व किती संसारोपयोगी द्रव्यसाधन मिळविण्याकरितां निर्माण होत असतो हें लक्षांत घेतलें म्हणजे लेखकवर्गाच्या अहंकाराला सहजच आळा पडेल, व साहित्यभक्ताची व्याख्या सकृद्दर्शनीं वाटते त्याहून अधिक विस्तृत कां मानावी लागते हें कळून येईल. ' काव्यं यशसे अर्थकृते ' असे मम्मटानें काव्याचे हेतू सांगितले आहेत ते कुत्सितबुद्धीनें नसून यथार्थवर्णनबुद्धीनेंच सांगितले आहेत; व जें काव्याला तेंच एकंदर वाङ्मयालाहि लागू आहे. असो. साहित्यक्षेत्रांत प्रत्यक्ष वावरणारे व त्या बाहेरचे पण अधिकारी अशा वाङ्मयभक्तांचा परिचय असाच वृद्धिंगत होत जाईल अशी मला आशा आहे.

स्वागतमंडळातर्फे होणाऱ्या भाषणांत स्वागत विषयाला सुटून इतर विषय सहसा नसावे असें मला नेहमीं वाटतें म्हणून त्या एकाच विषयाला अनुलक्षून हे चार शब्द मी बोललों आहे. तरी आतां श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं आपलें प्रास्ताविक भाषण करावें अशी मी विनंति करितों.

श्रीमंत बाबासाहेब यांचा परिचय खुद्द महाराष्ट्रांतील लोकांना आज पंचवीस तीस वर्षांचा आहेच. स्वतः संस्थानाधिपति असतांही त्यांनीं पूर्ववयांत युनिव्हर्सिटींतील शिक्षणाचा लाभ अनेक अंगांनीं घेतलेला आहे. इतर चार लोकांप्रमाणें युनिव्हर्सिटीच्या प्रत्यक्ष पदव्या मिळविण्याचें त्यांना कारण नव्हतें; पण त्या मिळवावयाच्या असत्या तर ते आज जुन्या पिढींतील एम्. ए., एल्. एल्. बी. गणले गेले असते. पण केवळ विद्याप्रेम मनांत ठेवून कांहीं दिवस कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत, नंतर प्रि. वर्डस्वर्थ यांचे हाताखालीं एल्फिन्स्टन कॉलेजांत आणि लॉ कॉलेजांत आपल्याला आवडत्या व राज्यकारभारोपयोगी अशा विषयांचा अभ्यास केला. दक्षिण महाराष्ट्रांतील इनामदारांना कायदे-कौन्सिलांत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मिळाल्यापासून ते मुंबई कायदे-कौन्सिलांत दोन वेळां निवडून आले होते. दोन वेळ त्यांनीं युरोपचा प्रवास केला असून सिलोन, ब्रह्मदेश, काश्मीर, जावा वगैरे प्रांतांत केवळ लोकस्थितिनिरीक्षणाच्या दृष्टीनें प्रवास केला. विलायतच्या प्रवासाचें त्यांचें पुस्तक प्रसिद्ध आहे. जुन्या इतिहासाच्या अभ्यासाविषयीं त्यांनीं सक्रिय सहानुभूति दाखविली आहे. सांगली येथील विलिंग्डन कॉलेजला मोठी देणगी देऊन तरुण पिढीच्या विद्यार्जनाविषयीं त्यांनीं प्रगट केलेली आस्था प्रसिद्ध आहे. परदेशीं जाऊन विद्या संपादन करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना साहाय्य करून त्यांनीं उदयाला आणिलें आहे व केव्हांही विद्येची अभिवृद्धि होण्याकडे त्यांची दृष्टि असून लोकशिक्षणाच्या अनेक अंगाच्या संस्थांना ते उत्तेजन देत असतात. अशा प्रकारचे अभिजात पुढारी आपल्या आजच्या साहित्यसंमेलनाच्या कार्याचा प्रारंभ करून देण्यास लाभले हा शुभशकुनच होय.

स्वागताध्यक्ष-न. चिं. केळकर

अध्यक्ष-श्री. कृ. कोल्हटकर

अध्यक्षांचें भाषण

अध्यक्षांचें भाषण

स्वागताध्यक्ष श्री. न. चिं. केळकर, श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर, प्रतिनिधि, बन्धु व भगिनी,—

मराठी भाषेचें व वाङ्मयाचें माहेरघर अशा या पुणें शहरीं सन १९०९ नंतर दीड तपानें भरणाऱ्या या बाराव्या संमेलनाचें अध्यक्षस्थान देऊन आपण माझा जो बहुमान केला, त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. हें स्थान मंडित करण्यास मजपेक्षां अनेक पटींनीं योग्य असे साहित्यसेवक खुद्द पुणें शहरांतही अनेक आहेत. ज्या शहरीं संमेलन भरावयाचें त्याच्या रहिवाश्यांनीं स्वतःकडे केवळ पाहुणचाराचें काम ठेवून अध्यक्षपदाचा मान इतरांस द्यावयाचा, असा अलिखित पण म्हणूनच विशेष बंधनकारक असा निर्बंध असल्यामुळेंच हें जबाबदारीचें कार्य मजकडे आलें आहे, ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. पण आपल्या ह्या निवडीनें माझ्याप्रमाणेंच आपल्याही शिरावर एक मोठी जबाबदारी पडत आहे, हें जाणून मी अंगीकारिलेलें कार्य तडीस नेण्याचें कामीं आपण मला हरएक प्रकारचें साहाय्य कराल, ही माझी खात्री आहे.

मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या ह्या अत्यंत आवडत्या शहरांत गेल्या अठरा वर्षांत एकही साहित्यसंमेलन भरलें नाहीं, हें प्रथमदर्शनीं एक न उलगडण्यासारखें कोडें वाटतें. पण किंचित् विचार केल्यास त्याचा उलगडा सहज होण्यासारखा आहे. पुण्यानें संमेलन भरविलें नाहीं, ह्याचें कारण तें संमेलनापेक्षां बऱ्याच अधिक महत्त्वाचें असें वाङ्मयनिर्मितीचें कार्य करण्यांत गुंतलें होतें, हें होय. संमेलन हें, गतकाळांत मराठी वाङ्मयाच्या संपत्तींत जी भर पडली, तिचा आढावा काढण्यासारखें आहे. संपत्तींत भर पडली, तरच आढाव्यास महत्त्व यावयाचें. संपत्तींत भर पडून आढावा काढला नाहीं, तर त्याचें विशेष महत्त्व नसतें. गेल्या दीड तपांत पुण्यास संमेलन झालें नाहीं तरी अनेक उपयुक्त ग्रंथ बाहेर पडले, व

अनेक उपयुक्त वाङ्मयसंस्था स्थापन झाल्या. ह्या काळांतच गीतारहस्य हा उत्कृष्ट ग्रंथ बाहेर पडला, हरि नारायण आपटे यांच्या अनेक सुरस कादंबऱ्या, व राम गणेश गडकरी ह्यांचीं सर्व लोकप्रिय नाटकें रसिकांपुढें आलीं, आणि श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, श्री. नरसिंह चिंतामण केळकर, श्री. वामन मल्हार जोशी अशांसारख्या अधिकारी लेखकांची बहुतेक ग्रंथसंपत्ति निर्माण झाली. याच काळांत महाराष्ट्र ज्ञानकोश हा प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध झाला, आणि अभिनव काव्यमाला, सुरस-ग्रंथमाला, सरसवाङ्मयरत्नमाला, महाराष्ट्र–कुटुंब–शिक्षण–माला, विजय–साहित्यमाला ह्यांचीं पुष्पें व रत्नें प्रकाशांत आलीं. याच काळांत, चित्रमय जगत्, लोकशिक्षण, व रत्नाकर हीं नमुनेदार मासिकें जन्मास आलीं, व त्यांपैकीं दोन हल्लीं देखील वाङ्मय सेवेचें कार्य समाधानकारक रीतीनें करीत आहेत. लोकशिक्षण मासिक जरी कालवश झालें असलें, तरी ‘ मरावें परी कीर्ति रूपें उरावें ’ या समर्थोक्तीप्रमाणें अजून जिवंतच आहे. याच काळांत मराठी ग्रंथसंग्रहालय स्थापन होऊन उत्कर्ष पावलें, भारत इतिहास संशोधक मंडळ भरभराटीस आलें. रविकिरण-मंडळ उदयास येऊन उन्नतीचा मार्ग आक्रमूं लागलें, व महाराष्ट्र–शारदामंदिर स्थिर पायावर उभारण्यांत आलें. याच काळांत स्थापन झालेल्या मयूर-मंडळ, तुकाराम-मंडळ, तुतारी–मंडळ इत्यादि भिन्न कवींच्या वाङ्मयास वाहिलेल्या संस्थाकडूनही कमी महत्त्वाचें कार्य झालें असें नाहीं. पेशवाईच्या भरभराटीच्या काळांत ज्याप्रमाणें पेशवे व त्यांचे कार्यकुशल मंत्री सर्व साम्राज्य–सत्ता आपल्या हातांत ठेवून ती दृढ करण्याचें काम बडोदें, इंदूर इत्यादि ठिकाणच्या आपल्या प्रतिनिधीं-कडून करवीत, त्याचप्रमाणें पुणें शहरानें वाङ्मयाची वाढ करण्याचें महत्त्वाचें काम आपल्या हातीं ठेवून त्याचा आढावा काढण्याचें अप्रमुख काम, मुंबई, बडोदें, इंदूर, अकोला येथील साहित्यसंमेलनाकरवीं उरकून घेतलें. त्यांपैकीं कांहीं संमेलनांचें कार्य त्यानें आपल्याच नागरिकांच्या नेतृत्वाखालीं पार पाडलें. खुद्द साहित्य-संमेलन जरी येथें भरलें नाहीं, तरी एक कवि-संमेलन आणि शारदो-पासकांचीं दोन संमेलनें येथें भरलीं. उत्तरोक्त संमेलनांच्या अध्यक्षांनीं मराठी भाषेच्या भविष्यासंबंधानें फार महत्त्वाची चर्चा केली.

गेल्या वीस वर्षांत पुणें शहरानें मराठी वाङ्मयाची जी सेवा केली, तिच्या

सिंहावलोकनानंतर, गेल्या साहित्य-संमेलनापासून आजपर्यंत लोटलेल्या एका वर्षाच्या काळांत मृत्यूनें मराठी वाङ्मयाची जी भयंकर हानि केली आहे, तिचा विचार अत्यंत उद्वेगजनक वाटल्यावांचून राहणार नाहीं. गीतापंचदशीचे कर्ते खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्दे, महाराष्ट्रसारस्वत या उत्कृष्ट ग्रंथाचे कर्ते व एक प्रमुख संशोधक विनायक लक्ष्मण भावे, केरळ कोकिळ मासिकाचे संपादक व एक नामांकित कवि कृष्णाजी नारायण आठल्ये, प्रसिद्ध इतिहास संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे व काशीनाथ नारायण साने, अनेक व्यायामविषयक पुस्तकें व परमार्थपर लेख लिहून प्रसिद्धीस आलेले तरुण लेखक सीताराम शिवराम लोटलीकर ऊर्फ सीताकांत, ग्रंथमाला मासिकाचे संपादक व समर्थ विद्यालयाचे उत्पादक विष्णु गोविंद विजापुरकर, मिरजेचे मार्मिक टीकाकार व ज्ञानेश्वरीचे संपादक गणेश कृष्ण आगाशे, पोर्च्युगीज मराठी कोशाचे कर्ते फटबा केंकरे व आपल्या विद्वान पतीस पूर्णपणें शोभण्यासारख्या लेखिका सौ. सरस्वतीबाई भिडे, ही नांवनिशीच त्या हानीचें भयंकर स्वरूप स्पष्ट करण्यास पुरेशी आहे. या यादींत समाविष्ट झालेल्या तीन संशोधकांच्या नांवांत त्यांच्यापूर्वी नुकतेच कालवश झालेले वासुदेव शास्त्री खरे, दत्तात्रय बळवंत पारसनीस यांच्या नांवांची भर घातली म्हणजे संशोधकांची जवळ जवळ सबंध जुनी पिढी नाहींशी झाली आहे, हें लक्षांत येऊन मन अत्यंत खिन्न होतें, व कालाच्या उदरांत नापत्ता झालेलीं अनेक ऐतिहासिक सत्यें उजेडांत आणणाऱ्या या संशोधकांवर झडप घालून निर्घृण कालानें इतिहाससंशोधनावर एक प्रकारें सूडच घेतला आहे, असाही विचार क्षणभर आल्यावांचून रहात नाहीं. या साहित्यसेवकांच्या संहारानें महाराष्ट्रभाषेची व वाङ्मयाची आणि महाराष्ट्राच्या इतिहासाची व ऐतिहासिक संशोधनाची झालेली अभूतपूर्व हानि केव्हां भरून येईल ती येवो. तूर्त तरी ‘ कालाय तस्मै नमः ’ इतकेंच म्हणून स्वस्थ बसण्यापलीकडे आपणांस कांहीं करतां येण्यासारखें नाहीं.

या कालवश झालेल्या व्यक्तींत अत्यंत प्रमुख व महत्त्वाची व्यक्ति विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे होत. त्यांची मूर्ति कल्पनाचक्षूंपुढें उभी राहिली म्हणजे त्यांनीं आपल्या हयातीच्या अखेरीस शारदोपासक-संमेलनप्रसंगीं उपस्थित केलेला महत्त्वाचा प्रश्नही पुढें उभा राहिल्यावांचून रहात नाहीं. मराठी भाषा

मुमूर्षु अवस्थेपर्यंत येऊन पोंहचली आहे काय, हाच तो मनास खडबडून जागें करणारा प्रश्न होय. या प्रश्नाशीं संबद्ध असलेले दुसरेही अनेक प्रश्न त्या बरोबरच समोर उभे राहातात. हल्लीं साहित्यपरिषदेमार्फत मराठी भाषेसंबंधानें होणाऱ्या अन्यायाविरुद्ध जी ओरड सुरू आहे, ती त्या भाषेस लागलेली शेवटची घरघरच आहे काय ? पुण्यासारख्या शहरांत मराठी वाङ्मयाच्या सेवेप्रीत्यर्थ जें अनेक संस्थांचें जाळें तयार होत आहे, तें, त्याचा मरूं घातलेल्या मराठीस मृत्युशय्या म्हणून कांबळ्यासारखा उपयोग व्हावा, म्हणूनच कीं काय ? मराठी वाङ्मयाच्या अभिवृध्यर्थ जीं अनेक बक्षिसें देण्यांत येतात, त्यांची किंमत अंतकाळीं द्यावयाच्या दानाइतकीच समजावयाची कीं काय ? प्रतिवर्षी अधिकाधिक जोमानें वाहणाऱ्या काव्यगंगेचा उपयोग मराठी भाषेच्या मुखांत अखेरचें गंगोदक घालण्याकरतांच व्हावयाचा आहे काय ? गीतारहस्य-सारख्या पवित्र ग्रंथाची निर्मिति मुमूर्षु मराठीच्या मुखानें भगवंताच्या नांवाचा उच्चार व्हावा, म्हणूनच झाली कीं काय ? सुरस, सरस, भारतगौरव, कुटुंब-शिक्षण, विजयसाहित्य, या मालांचा उपयोग मराठी भाषेच्या शवावर सन्मानार्थ पसरावयाच्या पुष्पमालांइतकाच होणार कीं काय ? जे अनेक खंदे लेखक मराठी भाषेस आधार देण्याकरतां उभे आहेत, त्यांच्या खांद्याचा उपयोग तिच्या शवास वाहून नेण्याकरतांच व्हावयाचा आहे काय ? आणि ज्ञानकोशाच्या खंडांचा विनियोग मराठीच्या सरणावर इंधन म्हणून रचण्याकडेच व्हावयाचा कीं काय ? अखेरीस असाही प्रश्न उद्भवतो कीं, राजवाड्यानीं स्वभाषेच्या अंताबद्दल हें जें अशुभ भविष्य वर्तविलें तें अचुक भविष्यवादी म्हणून किंवा महाराष्ट्रीयांच्या स्वभाषाभिमानावर सांचलेल्या औदासिन्याचा धुरळा झाडून टाकण्याकरितां ? तें निव्वळ भाकित असेल, तर त्यांनीं स्वतःच्या आयुर्मानासंबंधानें केलेलं भविष्य जसें दुर्दैवानें खोटें ठरलें, तसेंच त्यांनीं स्वभाषेच्या आयुर्मानासंबंधानें केलेलें हें भविष्य सुदैवानें खोटें ठरावें अशीच प्रत्येक महाराष्ट्रभाषाभिमानी इच्छा करील. हा इषारा त्यांनीं केवळ आपला भाषाभिमान विशेष प्रज्वलित करण्याकरतां दिला असेल तर त्यांचा हेतु बराच सिद्धीस गेला आहे, असें कबूल करणें भाग आहे.

राजवाड्यांनीं आपल्या तर्काची इमारत व्यवहारांत इंग्रजी भाषेचा प्रमाणा-बाहेर जो प्रवेश झाला आहे, त्यावर उभारली आहे. सबब त्याचाच प्रथम विचार करूं. इंग्रजांनीं या देशांत आपलें राज्य स्थापिलें, तेव्हां त्यांस राज्य-यंत्र सुरळीत चालण्यासाठीं इंग्रजी जाणणाऱ्या सेवकवर्गाची जरुरी भासूं लागली, व त्यांच्या उत्तेजनानें तो वर्ग भराभर तयार होऊं लागला. इंग्रजीचें तुटपुंजें ज्ञान असणाऱ्या इसमांस मोठमोठे पगार मिळूं लागले. मेकॉलेसाहेबांच्या प्रसिद्ध खलित्यांतील शिफारशीस अनुसरून हिंदुस्थानांत पाश्चात्य विद्येचा प्रसार करण्याचा जो ठराव झाला त्यानें विद्याखात्याचें धोरणही इंग्रजीच्या प्रसारास अनुकूल असें झालें. आरंभीं ज्या शाळा काढण्यांत आल्या, त्यांपैकीं अनेक शाळा मिशनऱ्यांच्या होत्या. त्या शाळांत ख्रिस्ती धर्मशास्त्राचें पुस्तक शिकावें लागे. त्या पुस्तकाचें जें पहिलें मराठी भाषांतर प्रसिद्ध झालें, त्यावरून मिशनऱ्यांची स्वधर्मप्रसाराची कळकळ जशी दिसून येई, तसें मराठी भाषेचें ज्ञान दिसून येत नसें. किंबहुना अनुकंपार्ह अज्ञानच प्रगट होई. त्या पुस्तकांतील भाषेचा नमुना पहावयाचा झाल्यास आपणांस 'संन्याशाचा संसार' या नाटकांतील गुलेलु साहेबाकडे गेलें पाहिजे. इंग्लिश चौथ्या इयत्तेपासून शिक्षणाचें माध्यम इंग्रजीच असें. केवळ इंग्रजी भाषा व तिचें व्याकरणच नव्हे, तर गणित, इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, ज्योतिःशास्त्र हे सारे विषय इंग्रजीच्या द्वारें शिकविण्यांत येत. त्या विषयांवरील इंग्रजी पुस्तकांची भाषा, विद्यार्थ्यांच्या आटोक्याबाहेरची असल्यामुळें तिचें शिक्षकांकडून मराठी भाषांतर करण्यांत येई, व तें इंग्रजी भाषेच्या नमुन्यावरच असल्यामुळें फार मासलेवाईक असे. पूर्वी एकदां संस्कृत भाषेचा दुभाषेपणा पतकरिल्यामुळें मराठी भाषेचे जसे हाल झाले, तसे आतां इंग्रजी भाषेच्या दुभाषेपणा पतकरिल्यामुळें होऊं लागले. या मराठी भाषांतराच्या साहाय्यानेंही विषयाचें आकलन नीट होत नसल्यामुळें घोकंपट्टीचा आश्रय करावा लागे. परीक्षांतील प्रश्नांचीं उत्तरें इंग्रजींतच द्यावीं लागत असल्यामुळें ही घोकंपट्टी अर्थातच इंग्रजी शब्दांची असे. ते इंग्रजी शब्द स्मरणांत कायमचे ठसण्याकरितां व तोंडांत पक्के बसण्याकरितां त्यांची संभाषणांत योजना होऊं लागली. त्या काळीं शास्त्रीय परिभाषा मराठींत विशेष तयार झालेली नसल्यामुळें व अनेक इंग्रजी

शब्दांकडून व्यक्त होणाऱ्या कल्पना प्रगट करण्यास समर्थ असे मराठी शब्दही निर्माण झालेले नसल्यामुळें इंग्रजी शब्दांचा उपयोग करण्यांवाचून गत्यंतरच नसें. संस्कृत भाषा शिकवितांना इंग्रजी परिभाषेची योजना करण्याचें वास्तविक कांहींच प्रयोजन नव्हतें. पण त्या भाषेचीही परीक्षा इंग्रजींतच द्यावी लागत असल्यामुळें तिचें ज्ञानही इंग्रजीच्या मध्यस्थीनेंच करून घ्यावें लागे. घरांतल्या आजीबाईची ओळख नातवास गांवाबाहेर राहणाऱ्या मडमेनें करून द्यावी, अशाच मासल्याचा हा हास्यास्पद प्रकार असे. या प्रकाराचें एक नमुनेदार उदाहरण म्हणून लुट् हा संस्कृत धातु देण्याचा प्रघात आहे. त्या धातूचा अर्थ to wallow या इंग्रजी पर्यायानें दिलेला आढळेल. पण विद्यार्थ्यास तो पर्यायही त्या धातूइतकाच सुबोध असल्यामुळें त्याचा अर्थ त्यास इंग्रजी-मराठी कोशांतून हुडकावा लागे. तो अर्थ ' लोळणें ' हा आहे असें कळल्यावर ' मऊ बिछान्यावर लोळणाऱ्या त्या विद्यार्थ्यांची स्थिती मोलियरच्या एका प्रहसनांतील विद्या–कलासंपन्न होऊं पहाणाऱ्या एका श्रीमंत पण खेडवळ इसमाप्रमाणें होई. ' गद्य ' ह्या शब्दाची व्याख्या कळतांच " मग मी जन्मभर नकळत गद्यच बोलत होतों तर !" असे धन्यतादर्शक उद्गार तोंडांतून निघून त्याची जी अवस्था होते, तशीच हुबेहुब अशा विद्यार्थ्यांची होई. असो. पुढें पुढें मराठीचाही परिचय इंग्रजीच्या मध्यस्थीनें होऊं लागला. तेव्हां तर या कृत्रिमतेचा कळस झाला. हें इंग्रजीच्या आधारें मराठीचें शिक्षण देतांना मराठी शब्दांचे जे इंग्रजी पर्याय देण्यात येत त्यांवरून मराठी शब्दांचा अर्थ कळण्याऐवजीं इंग्रजी शब्दांचाच कळे, व अशा अनपेक्षित रीतीनें इंग्रजी भाषेच्या परिचयांत भर पडूं लागली. त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं, संभाषणांत येणाऱ्या इंग्रजी शब्दांचें प्रमाण सपाट्यानें वाढत चाललें. वाक्यांत एकादाच इंग्रजी शब्द घातला तर तें आपल्या आंग्ल–भाषा–ज्ञानास शोभण्यासारखें नाहीं असें वाटूनच कीं काय त्याच्या पंक्तीस आणखी एकादा दुसरा इंग्रजी शब्द घालवासा वाटूं लागला. एखादें दुसरें इंग्रजी विशेषण तर मराठी विशेष्य, संयुक्त क्रियापदाचा पूर्वार्ध इंग्रजी तर उत्तरार्ध मराठी, आणि कधीं कधीं तर कर्ता व क्रियापद ह्यांशिवाय सारे शब्द इंग्रजी असे घेडगुजरी प्रकार जारीनें सुरू झाले. हळूं हळूं तर

स्वगत उद्गारही ह्या मिश्र भाषेंत निघूं लागले; आणि झोंपेंतील बरळणेंही त्या भाषेंत होत असल्यास नवल वाटण्याचें कारण नाहीं. इंग्रजी शब्दांच्या निकट सान्निध्याचा मराठी शब्दांच्या उच्चारावरही अनिष्ट परिणाम होऊं लागला. दादा, ताई, गंगू, धोंडू, या नांवांचे उच्चार डाडा, टाई, गॅंग्यू, ध्योंड्यू असें करण्यांत अजूनही कांहीं गांवठी साहेबांस धन्यता वाटत असते. मातृभाषेपेक्षां परकी भाषेशींच अधिक सलोख्याचा व्यवहार ठेवणाऱ्या अशा गुलेलु साहेबावर मराठींत भाषण करण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां त्याची विलक्षण तारांबळ उडून जाते. प्रगट करावयाचा विचार प्रथम इंग्रजी भाषेच्या रूपानें मनांत यावयाचा व नंतर त्यास मराठी भाषेचा पेहेराव चढवून तो श्रोत्यांपुढें मांडावयाचा ! श्रोतेही वक्त्याच्याच वर्गांतील असल्यामुळें त्यांसही त्या विचाराचें मर्म कळून घेण्याकरितां तसाच द्राविडी प्राणायाम उलट क्रमानें करावा लागतो. म्हणजे वक्त्याच्या मुखांतून निघालेल्या मराठी शब्दांचे इंग्रजी पर्याय प्रथम ध्यानांत घ्यावयाचे व नंतर त्यांच्या साहाय्यानें व्यक्त झालेल्या विचाराचें मर्म हस्तगत करून घ्यावयाचें ! विषयविवेचनाच्या वांट्याची अर्धीमुर्धी विचारशक्ति याप्रकारें भाषेच्या सव्यापसव्यांतच खर्च होत असल्यामुळें त्या विवेचनाची काय वाट होत असेल हें कल्पनेनेंच जाणलेलें बरें ! भाषणाच्या मंद गतीवरून वक्त्याच्या पदरांत मात्र विचारीपणाचें श्रेय फुकटाफुकटीं पडतें. असो. ह्या प्रकारें इंग्रजी भाषेचा मराठी भाषेंत प्रवेश व मराठी भाषेचें भ्रष्टीकरण हीं सारख्याच प्रमाणांत चालूं राहिल्यामुळें व्याप्ति व स्वरूप ह्या दोन्ही दृष्टींनीं मराठी भाषेची अत्यंत शोचनीय स्थिति झाली. अलिकडे तर आपण बोलतो ती इंग्रजीमिश्रित मराठी कीं मराठीमिश्रित इंग्रजी अशीही शंका उद्भवूं लागली आहे.

मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पहिलीं कांहीं वर्षें त्याच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत मराठीस संस्कृत भाषेच्या बरोबरीनें स्थान मिळालें होतें. पण सन १८६७ सालीं तिची उचलबांगडी करण्यांत आली. पुढें महादेव गोविंद रानडे ह्यांच्या अविश्रांत श्रमांमुळें व त्यांच्या मृत्यूनंतर लौकरच ऐच्छिक विषय म्हणून तिला एम्. ए. परीक्षेपुरतें विद्यापीठांत स्थान मिळालें. बाकीच्या परीक्षांच्या अभ्यासक्रमांत तिला पूर्ण मज्जाव होता. याप्रमाणें प्राथमिक व दुय्यम शाळांतून वहाणारी मराठी भाषेची सरस्वती विद्यापीठाच्या

प्रवेशद्वारापलीकडे जी गुप्त होई, ती पुन्हां एम्. ए. च्या वर्गांत प्रगट होई. मध्यंतरीचा चार वर्षांचा खंड म्हणजे एम्. ए. परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या मार्गांतील एक जबरदस्त धोंड असे. मधील तीन वर्गांच्या अभ्यासक्रमांत नेमण्यासारखे मराठींत ग्रंथच नाहींत, असा कोटिक्रम मराठीस त्या अभ्यासक्रमांतून वगळतांना पुढें करण्यांत येई. त्या वर्गांतील विद्यार्थ्यांकडून अर्थातच संस्कृत किंवा दुसऱ्या एखाद्या भाषेचें अध्ययन करण्यांत येई. व ती परिचित भाषा सोडून एम्. ए. परीक्षेकरितां चार वर्षें बाजूस ठेवलेली भाषा अभ्यासण्याचें धाडस एकाद्याच विद्यार्थ्यास होई. मराठींत विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत शोभण्यासारख्या विद्वत्तापूर्ण ग्रंथांची जी निपज व्हावयाची तिची अपेक्षा मराठी घेऊन एम्. ए. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपासूनच बहुधा असावयाची. पण असे विद्यार्थी विरळ व अभ्यासक्रमाच्या अपूर्णतेमुळें अर्धेकच्चेच निघत असल्यानें त्यांच्यासंबंधानें केलेली अपेक्षा फुकटच जाई. याप्रमाणें अभ्यासक्रमांत मराठीस स्थान नसल्यामुळें उत्तम ग्रंथांची निर्मिति नाहीं व ती नसल्यामुळें मराठीस अभ्यासक्रमांत स्थान मिळण्याचा संभव नाहीं, असा त्या उभतांमध्यें अन्योन्याश्रय उत्पन्न झाला. स्वराज्याची पात्रता असल्याशिवाय स्वराज्य मिळावयाचें नाहीं, व तें मिळून कार्य करावयाची संधि लाभल्याशिवाय पात्रता यावयाची नाहीं याच मासल्याचा बिनतोड असा हाही पेंच असे; व त्या पेंचामुळें स्वराज्यप्राप्तीचा काळ जितका लांबणीवर पडत चालला आहे, तितकाच मराठीचा विद्यापीठांत अधिक प्रवेश होण्याचा काळही या पेंचामुळें लांबणीवर पडला. विद्यापीठाच्या सर्वांत उच्च परीक्षेंत मराठीस जें स्थान मिळालें तें आकाशदिव्याप्रमाणें जनतेसमोर तेवत राहिल्यामुळें मराठीचा प्रश्न तिच्या अभिमान्यांच्या चित्तांत सतत जागृत ठेवण्याचें कार्य मात्र त्यांजकडून परिणामकारक रीतीनें पार पडलें.

दुय्यम शिक्षणांतील मराठी भाषेचें स्थानही १९२६ पावेतों विद्यापीठांतल्याप्रमाणेंच डळमळीत होतें. सन १९०६ पर्यंत तिचा दर्जा दुय्यम भाषा म्हणून संस्कृतच्या बरोबरीनें असे. १९०७ पासून १९१२ पावेतों तर संस्कृत भाषेप्रमाणें तीही आवश्यक विषय होऊन बसली. १९१३ पासून १९२५ पर्यंत तिचें विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेंतून उच्चाटन होऊन शाळेंतल्या शाळेंतच तिची

परीक्षा घेण्यांत येऊं लागली. या काळांत तिला इंग्रजी शाळांतील वरील वर्गांत महत्त्वाचें स्थान जवळ जवळ मुळींच नव्हतें. याप्रमाणें १९२६ सालापर्यंत तिच्या दर्जांत चढउतार होत गेला.

मराठी भाषेचा व वाङ्मयाचा उत्कर्ष होण्याच्या मार्गांत सरकार व विद्यापीठ ह्यांजकडून जशीं विघ्नें आलीं, तशीं राजकीय व इतर कारणांपासूनही उपस्थित झालीं. राष्ट्रीय सभेचें आद्यध्येय हिंदुस्थानांत राजकीय जागृती करणें व त्या जागृतीचें दडपण सरकारावर घालून त्याजकडून राजकीय हक्क संपादक करणें हें होतें. हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न प्रान्तांत भिन्नभिन्न देशी भाषा प्रचलित असल्यामुळें राष्ट्रीय सभेचा कार्यक्रम कोणत्याही एका देशी भाषेच्या द्वारें चालणें शक्य नव्हतें. इंग्रजी भाषा मात्र सर्व प्रान्तांतील सुशिक्षित वर्गास मातृभाषेइतकीच किंबहुना तिजपेक्षांही अधिक परिचित असल्यामुळें व राज्यकर्त्यांचीही भाषा तीच असल्यामुळें, तिच्याच साहाय्यानें राष्ट्रीय सभेचें कामकाज चालूं लागलें. राष्ट्रीय सभेबरोबर भरणाऱ्या सामाजिक, औद्योगिक, इत्यादि इतर परिषदांनींही जागृतिसाधनाच्या बाबतींत तिचेंच अनुकरण केलें. राष्ट्राच्या पुढाऱ्यांना कायदेमंडळांत वादविवाद करण्याची संधि मिळे, तेव्हां तेही त्यांना इंग्रजींतच करावे लागत. अशा रीतीनें इंग्रजी भाषेस मिळालेल्या महत्त्वामुळें देशी भाषांचें व अर्थात्च मराठी भाषेचेंही महत्त्व साहाजिकच त्या मानानें कमी झालें.

राष्ट्रीय सभेचें महत्त्व हिंदुस्थानापुरतें किंवा फार तर इंग्लंड देशापुरतें होतें. पण ज्ञानाचें महत्त्व व इंग्रजी भाषेची व्याप्ति सार्वत्रिक असल्यामुळें जगाच्या ज्ञानांत भर घालणारे ग्रंथ इंग्रजींतच होणें इष्ट आहे, असा त्यावेळीं समज होता, व तो फारसा चुकीचाही नव्हता. महाराष्ट्रांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्रमुख विद्वानांकडून जी ग्रंथरचना झाली, ती इंग्रजींतच झाली. ह्याचें एक कारण त्या विद्वानांचा ग्रंथरचना करण्याइतका मराठीशीं परिचय नव्हता, हें असूं शकेल. पण त्यांत प्रतिपादलेल्या सिद्धांतांचें महत्त्व व अंगीकारिलेल्या तर्कपद्धतीचें निर्दोषत्व पारखण्याइतका त्या काळचा महाराष्ट्रीय समज सुसंस्कृत नव्हता; व ते ग्रंथ मराठींत जरी झाले असते, तरी त्यांचें कौतुक परदेशीयां-

कडून झालें तितकें महाराष्ट्रीयांकडून झालें नसतें, हें कबूल करणें भाग आहे. महादेव गोविंद रानडे यांचा ' मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष ' हा ग्रंथ, भांडारकरांचा ' दक्षिण हिंदुस्थानचा इतिहास, ' महादेव मोरेश्वर कुंटे यांचा आर्यसंस्कृतीच्या स्थित्यंतरावरील ग्रंथ, काशिनाथ त्रिंबक तेलंग यांचे ' रामायण ' व ' भगवद्गीता ' यांवरील निबंध, चिंतामण विनायक वैद्य यांचे अवलोकितिलेखमाला, रामायणाचें कोडें व महाभारतावरील टीका हे लेख, बाळ गंगाधर टिळक यांचे वेदांचा काल व आर्यांचें मूळ वसतिस्थान यांवरील ग्रंथ, खाल्डियांतील वेद हा आणि त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झालेले कांहीं अर्धवट व कांहीं संपूर्ण असे निबंध इंग्रजींतच रचण्यांत आले. हे ग्रंथ मराठींत रचण्यांत आले असते, तर त्यांची तादृश चहा जरी झाली नसती, तरी त्यामुळें मराठीस अतोनात महत्त्व आलें असतें यांत शंका नाहीं.

त्या काळची मराठी वृत्तपत्रें बऱ्यापैकीं होतीं, पण बातमीच्या ताजेपणाच्या व मजकुराच्या भरीवपणाच्या दृष्टीनें तीं इंग्रजी वृत्तपत्रांहून बऱ्याच कमी योग्यतेचीं होतीं. तोच प्रकार मासिकांचा. त्या काळची मराठी भाषेंतील ग्रंथसंपत्तीही इंग्रजींतल्या मानानें अगदींच तुटपुंजी व बरीच हिणकस होती. यामुळें आंग्लभाषाभिज्ञांच्या वाचनाचा सारा भर इंग्रजी नियतकालिकांवर व पुस्तकांवरच असे. यामुळेंही त्यांच्या तोंडच्या मराठी भाषेंत इंग्रजी शब्दांची सरभेसळ सहजगत्या होत असे. वाक्यारंभींचा कर्ता व वाक्यांतींचें क्रियापद हीं मात्र बहुधा मराठींच असत. कधीं कधीं मात्र संभाषणांतील वाक्यें अशीं खिचडीवजा नसून पूर्णपणें निर्भेळ असत. मात्र तो निर्भेळपणा मराठी शब्दांचा नसून इंग्रजी शब्दांचा असे, व केवळ शुद्धतेच्या दृष्टीनें अशीं पूर्ण इंग्रजी वाक्यें ' न हिंदुर्नयवनः ' अशा मराठी वाक्यापेक्षां शतपट बरीं हें कोणीही कबूल करील.

इंग्रजी राज्याबरोबर आपणांस अपरिचित अशा अनेक गोष्टी सुरूं झाल्या, व तद्वाचक शब्द मराठींत नसल्यामुळें इंग्रजी शब्द मूळच्या अगर अपभ्रष्ट स्वरूपानें प्रचारांत आले. या वर्गांत स्टेशन, इंजन, ब्रेक, गार्ड, तिकीट, नंबर, डाक्तर, फी, पोलीस, कोडत, अपील, गुदाम, गटार, टेनिस, क्रिकेट, सर्कस,

वास्कूट, कोट, जाकीट, परमेश्वरी नोट, सट, हे व तत्सदृश शब्द येतील. इंग्रजी चालीरीतींचाही मराठी भाषेवर आंग्ल शब्दांच्या प्रवेशाच्या दृष्टीनें बराच परिणाम झाला. आपण हिंदु लोक जात्या भिडस्त व संकोची वृत्तीचे असल्यामुळें मनोवृत्ति शब्दांनीं व्यक्त करण्याच्या कामांत फार मुखदुर्बळ आहोंत. शब्दांपेक्षां कृतीनेंच भाव व्यक्त करणें आपणांस पसंत असतें. तोंडाची वाफ दवडल्यानें भावनांचा जोर कमी होतो किंबहुना त्यांचा लोप होतो, असें आपलें मत आहे. रस्त्यानें जातांना गुरुजी भेटल्यास त्यांस नमस्कार करणें म्हणजे त्यांच्याशीं बरोबरी करण्यासारखें आहे, असें हिंदु विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणें वाटतें. उलट पक्षीं पाश्चात्य विद्यार्थी अशा प्रसंगीं शुभेच्छा व्यक्त करून न थांबतां गुरुजीशीं हस्तांदोलन करण्याचा अतिप्रसंग करील. हिंदु स्त्री पतीस नांवानें हांक मारणें ही मर्यादातिक्रम समजते; मग त्या नांवाच्या मागें ‘ प्रिय ’ असें विशेषण लावणें दूरच राहिलें. पाश्चात्य स्त्रीस इतरांदेखत पतीला ‘प्रियकरा’ या शब्दानें संबोधण्यांतच केवळ नव्हे, तर आपलें प्रेम मूर्त व भरीव प्रकारानें दर्शविण्यांतही कांहीं संकोच वाटत नाहीं. हिंदु पतिपत्नी एकमेकांसंबंधीं बोलतांना ‘ आमची मंडळी ’ ‘ तिकडची स्वारी ’ वगैरे द्राविडी प्राणायामानें परस्परांचा निर्देश करितात. यासही त्यांची भाव प्रगट करण्यांतील ही मुग्धताच कारण आहे. उलटपक्षीं पाश्चात्य पतिपत्नी ‘ माझी पत्नी ’, ‘माझे पति’ असा निर्देश करून आपली निःसंकोच वृत्ति प्रगट करितात. कुटुंबाव्यातिरिक्त व्यक्तींशीं वागण्यांतही हिंदु व पाश्चात्य चालीरीतींत उत्तर दक्षिण ध्रुवाइतकें अंतर दिसून येतें. न कळत दुसऱ्याच्या अंगास धक्का लागला तर त्याबद्दल लागलीच दिलगिरी प्रदर्शित करण्यांत अगर माफी मागण्यांत येते; आणि अल्प मतभेद व्यक्त करावयाचा झाल्यासही त्याबद्दल आगाऊ परवानगी मागण्यांत येते. हा उपचार पाहून खुनी इसमास मृत्यूची शिक्षा सुनावण्याची त्याजपाशीं लीनतापूर्वक परवानगी मागणाऱ्या चिनी न्यायाधीशाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. कोटावरील सुरकुती साफ करण्याबद्दलही आभार मानण्यांत येतात, परंतु त्यांत आभार मानण्यासारखें कांहीं नाहीं, सबब त्याबद्दल अवा-

क्षरही नको असें उपकारकर्त्यांकडून उपकारबद्धास बजावण्यांत येतें. तें पाहून या महात्म्यांमध्यें रोजचे रोज उपकारांचे डोंगर तयार होत असतील, व त्यांच्या पायथ्याशीं कृतज्ञतेनें तुडुंब भरलेल्या नद्या वाहात असतील अशी परदेशस्थाची कल्पना झाल्यावांचून राहात नाहीं. हें औपचारिक विधि आरंभीं आपणांस कितीही अपरिचित असले, तरी आतां पूर्णपणें आपल्या अंगवळणीं पडून गेले आहेत. त्या विधींत उच्चारावयाच्या इंग्रजी मंत्रांचे मराठी पर्याय मात्र अजून तयार झालेले नसल्यामुळें त्या मंत्रांचा त्यांच्या विदेशी स्वरूपांतच उच्चार करणें भाग पडत आहे.

इंग्रजीमिश्रित मराठी भाषा नेहमींच्या संभाषणांत वापरणें जर वावगें आहे, तर कथापुराणप्रसंगीं तिची योजना करणें किती अश्लाघ्य आहे, हें विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. हे हिंदु संस्कृतीचे विशिष्ट प्रकार आजपर्यंत इंग्रजी भाषेपासून पूर्णपणें अलिप्त राहिले होते. पण अलीकडे त्यांसही त्या भाषेचा किंचित् उपसर्ग पोहोंचूं लागला आहे.

इंग्रजी व मराठी शब्दांच्या ज्या खिचडीची राजवाड्यांस इतकी शिसारी आली, देशी व विदेशी शब्दांच्या ज्या कंथेनें त्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला, ती तयार होण्यास कोणतीं कारणें झालीं, याचा येथवर विचार झाला. संभाषणांत इंग्रजी शब्दांचें प्राचुर्य असलें तरी त्याबरोबर कांहीं मराठी शब्दांचें वास्तव्य असतें, एवढी तरी समाधानाला जागा असते. शिवाय संभाषणप्रसंगीं संवयीनें तोंडीं येणाऱ्या इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय सुचण्याइतकी फुरसत मिळत नसते ही योग्य सबबही असते. पण आपल्या पत्रव्यवहारास तेवढी समाधानाची जागा व ती सबबही नसते. असें असतां सुशिक्षितांमधील पत्रव्यवहार बहुधा इंग्रजींतच चालत असतो. स्नेहीच केवळ नव्हे तर पितापुत्र, भाऊभाऊ, चुलतेपुतणे यांसारखे निकटचे आप्तही परस्परांशीं संभाषणाच्या द्वारें विचारविनिमय करतांना शुद्ध किंवा धेडगुजरी मराठी वापरीत असले तरी परस्परांस पत्रें लिहितांना मात्र निव्वळ इंग्रजीचाच आश्रय करतात. ह्याचें कारण त्यास लिहावयाचा मजकूर मराठीपेक्षां इंग्रजींत अधिक सोकर्यानें जुळवितां येतो.

एवढेंच असेलसें वाटत नाहीं. ज्या काळीं हा इंग्रजी पत्रलेखनाचा प्रघात सुरू झाला, त्या काळीं इंग्रजी सफाईनें बोलण्यांत जशी धन्यता वाटे, तशी ती सफाईनें लिहिण्यांतही वाटे; व इंग्रजी पत्रलेखन हा ती भाषा लिहिण्याचा सराव कायम करण्याचा एक मार्ग असे. मराठींत पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास मायन्यांची बारकाई ध्यानांत ठेवावी लागे. तीर्थरूप कोणास लिहावयाचें व तीर्थस्वरूप कोणास लिहावयाचें, विनंति कोणास करावयाची व विज्ञापना कोणास करावयाची, साधा साष्टांग नमस्कार केव्हां व कृतानेक साष्टांग नमस्कार केव्हां घालावयाचा, दंडवत कोणास लिहावयाचे व दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक कोणापुढें ठेवावयाचें याचा विचार अवश्य करावा लागे. सौभाग्यवती व गंगा-भागीरथी यांमधील तारतम्य लक्षांत न राहिल्यास गहजब उडत असे. पत्र पत्नीस लिहावयाचें असल्यास ‘ चिरंजीव वज्रचुडेमंडित सौभाग्यवती ’ असा मायना लिहून तिला सौभाग्याचें व पर्यायानें स्वतःला चिरंजीवत्वाचें दान द्यावें लागे, आणि जीवश्च कंठश्च मित्राला लिहावयाचें झाल्यास “जैसें गंगेचें निर्मळ पाणी ऐसा मित्र न मिळे त्रिभुवनीं ” याप्रमाणें काव्यमय मायना लिहिणें भाग पडे. उलट पक्षीं इंग्रजी पत्रांत मायन्याची विशेष भानगड नसे. ‘ प्रिय ’ हा एक शब्द घातला कीं त्यांत वडील व धाकटीं माणसें, जवळचे व लांबचे नातलग, ब्राह्मण व शूद्र, स्त्री व पुरुष ह्या सर्वांचा अंतर्भाव होई. मराठींत पत्र लिहितांना आपल्या अत्यंत आवडत्या माणसालाही ‘प्रिय’ या शब्दानें संबोधण्याची चोरी असे. ती गैरसोयही इंग्रजी भाषेचा आश्रय केल्यास आपोआप दूर होई. पण इंग्रजी पत्रलेखनाची वहिवाट पडण्याचें मुख्य कारण असें कीं, बालबोध लिपींत शुद्धता साधे, तर शीघ्रता साधत नसे, मोडी लिपींत शीघ्रता साधे तर शुद्धता साधत नसे; आणि इंग्रजी लिपींत दोन्ही साधत.

राजवाड्यांनीं मराठी भाषेच्या मुमूर्षुत्वाची मीमांसा करतांना इंग्रजी शब्दांच्या मिश्रणानें धेडगुजरी बनलेली संभाषणांतील मराठी भाषा व इंग्रजी पत्रलेखन यांवरच विशेष भर दिला होता. मराठी पुस्तकांसंबंधानें त्यांनीं फारसा विस्तार केला नव्हता. पुस्तक लिहितांना लेखकास योग्य मराठी शब्दांची योजना करण्यास हवी तितकी फुरसत मिळण्यासारखी असते व त्यामुळें त्यांतील

भाषा वरीच शुद्ध असते. मराठी शास्त्रीय परिभाषा जरी हल्लीं सपाट्यानें तयार होत असली, तरी ती अजून पूर्णतेला पोंचली नसल्यामुळें शास्त्रीय विषयावरील ग्रंथांत मात्र निरुपायानें अनेक स्थलीं इंग्रजी पारिभाषिक शद्ब घालावे लागतात. बाकीच्या ग्रंथांत मराठी भाषा शक्य तितक्या शुद्ध स्वरूपांत योजण्यांत येत असते. क्वचित् स्थलीं स्वभाषाभिमानाचा अतिरेकही दिसून येतो. उदाहरणार्थ इंग्लंडच्या इतिहासांत Habeas corpus Act याबद्दल "शरीर हाजीर कर कायदा" हा शद्ब वापरण्यांत आला आहे. "Wars of the Roses" याचा 'गुलाबांचीं युद्धें' हा मराठी पर्याय हल्लीं रूढ झाला आहे. हे गुलाब-रसिक इतिहासज्ञांच्या हृदयास कांट्याप्रमाणें बोंचत असल्यास नवल वाटावयास नको. मराठी कवितेनें प्रतिकूल परिस्थितींतही आपलें शुद्ध स्वरूप बऱ्याच अंशीं कायम ठेविलें आहे, याबद्दल ती अभिनंदनास पात्र आहे. नाटकांतील व कादंबऱ्यांतील भाषणांत मात्र मानवी व्यवहाराचें हुबेहुब चित्र दाखविण्याच्या निमित्तानें मधून मधून इंग्रजी शद्बांचा शिडकाव करण्यांत येत असतो. व्यवहाराचें प्रतिबिंब या दृष्टीनें तो शिडकाव अत्यंत अपुरा पडतो. व्यवहाराचें यथातथ्य अनुकरणच करावयाचें झालें तर प्रत्येक वाक्यांत दोन दोन चार चार तरी इंग्रजी शद्ब पेरणें भाग पडेल. एखाद्या प्रवेशांत दोन चार इंग्रजी शद्ब योजून धड व्यवहाराचें अनुकरणही साधत नाहीं, व मराठी भाषेची शुद्धताही साधत नाहीं. लेखकाचें भाषादारिद्र्य मात्र उघड होतें. त्यापेक्षां इंग्रजी शब्द वापरण्याचा मोह आवरून भाषेची शुद्धता राखणेंच श्रेयस्कर आहे. विनोदी वाङ्मयांतही इंग्रजी शद्ब फाजील प्रमाणांत योजण्याचा पायंडा अलीकडे पडूं लागला आहे. विसंगतपणा हा विनोदाचा आत्मा असल्यामुळें मराठी व इंग्रजी शद्ब जवळ जवळ ठेवून एक प्रकारचा विनोद उत्पन्न होऊं शकतो, हें खरें आहे. पण विनोद साधणें हें भाषेची शुद्धता राखण्याच्या मानानें फारच कमी योग्यतेचें ध्येय आहे, व त्याकरितां उच्च ध्येयाची हानि करणें सर्वथा अश्रेयस्कर होय.

आतांपर्यंत इंग्रजी भाषेचा मराठींत कितपत प्रवेश झाला आहे हें आपण

पाहिलें. आतां त्या प्रवेशाचा भाषा मृत आहे किंवा जिवंत आहे या प्रश्नाशीं कितपत संबंध पोंहचतो हें पाहूं. कोणतीही भाषा जिवंत आहे कीं मृत आहे याचा निर्णय बहुधा खालील गोष्टींवरून करावयाचा असतो.

१ ती भाषा बोलणारांचें जनतेंतील प्रमाण

२ त्या भाषेंत पत्रव्यवहार करणारांचें जनतेंतलि प्रमाण

३ त्या भाषेंत होणाऱ्या ग्रंथरचनेचें प्रमाण

४ त्या भाषेंत होणाऱ्या भाषणांतील व ग्रंथांतील भाषासरणीचें स्वरूप

५ त्या भाषेची व तिच्यांतील वाङ्मयाची जनतेवरील पकड व त्याबद्दल त्या जनतेस वाटणारा अभिमान.

सदरहू बाबींचा आपण क्रमानें विचार करूं.

(१) मराठी व इंग्रजी शब्दांची भेसळ इंग्रजी शिकलेल्या मूठभर पुरुषांच्या बोलण्यांतच बहुधा होत असते. अशिक्षित बहुजनसमाज इंग्रजी भाषेच्या संस्कारापासून पूर्णपणें अलिप्त असतो. स्त्रियांमध्यें बहुतेक भरणा अशिक्षित किंवा मराठी लिहिण्यावाचण्यास शिकलेल्यांचाच असतो. ज्या कांहीं अपवादरूप स्त्रिया इंग्रजी शिकतात, त्यांचा बहुतेक वेळ स्त्रियांमध्येंच जात असल्यामुळें त्यांचीही भाषा बहुधा निर्भेळ मराठीच असते. स्त्रीशिक्षणाच्या अभावामुळें देशाचे अनेक तोटे झाले असले, तरी स्त्रीवर्गांत मराठी भाषा शुद्ध स्वरूपांत कायम राहिली, हा त्यापासून एक लाभही झाला. मुलगे वयाच्या दहाबारा वर्षांपर्यंत मराठी शिक्षणच घेत असल्यामुळें त्यांसही तोंपर्यंत इंग्रजीचा संस्कार झालेला नसतो. इंग्रजी शिकलेल्या पुरुषांच्या तोंडची भाषाही मराठीमिश्रित इंग्रजी नसून इंग्रजीमिश्रित मराठी असते. कारण, त्या भाषेंतील वाक्यरचना इंग्रजी नसून मराठी असते; व वाक्यांतील क्रियापद मराठी असून कर्ताही बहुधा मराठीच असतो. त्यांच्या भाषेंत इंग्रजी शब्द बरेच येतात याचें कारण, त्यांच्या दुय्यम व उच्च शिक्षणाचें माध्यम इंग्रजी होतें हें होय. हल्लीं दुय्यम शिक्षणाचें माध्यम मराठी झाल्यामुळें पुढील पिढींत त्या बाबतींत बराच अभिनंदनीय फरक दिसून येईल, यांत शंका नाहीं. इंग्रजी शिकलेले लोकसुद्धां जेव्हां

बहुजनसमाजासमोर व्याख्यानें देतात तेव्हां त्या व्याख्यानांतील भाषा शक्य तितकी निर्भेळ मराठी ठेवण्याची ते काळजी घेतात. श्री. शिवराम महादेव परांजपे, श्री. लक्ष्मणशास्त्री लेले, श्री. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर, श्री. विनायकराव व नारायणराव सावरकर इत्यादि कांहीं वक्त्यांची तर व्याख्यानांत एकही इंग्रजी शब्द न येऊं देण्याची प्रतिज्ञाच असते. याप्रमाणें उत्तरोत्तर मराठी भाषणांतील भाषेचें स्वरूप अधिकाधिक शुद्ध होत जाणार हें निर्विवाद आहे.

(२) मराठींत पत्रव्यवहार करण्याचा प्रघात लेखकांमध्यें तरी वाढत्या प्रमाणांवर आहे, असा माझा अनुभव आहे. आपलाही तसाच असेल अशी आशा आहे. इंग्रजी भाषा सफाईनें बोलण्यालिहिण्याइतकें मार्मिक ज्ञान असणारासही जेव्हां जिव्हाळ्याच्या माणसाशीं उचंबळून आलेल्या वृत्ति प्रगट करावयाच्या असतात, तेव्हां मातृभाषेचा अवलंब करण्याखेरीज त्यास गत्यंतर नसतें. ह्याचें प्रत्यंतर म्हणून प्रसिद्ध इतिहासलेखक श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांचा युरोपांत शिकावयास गेलेला एकुलता एक पुत्र श्यामकांत यानें मृत्युशय्येवरून आपल्या मातापितरांस लिहिलेलें अखेरचें पत्र वाचण्याची मी आपणांस शिफारस करतों. तें हृदयद्रावक पत्र वाचतांना ज्याचा कंठ सद्गदित होऊन डोळ्यांत अश्रू उभे रहाणार नाहींत असा मनुष्य विरळाच सांपडेल.

(३) हल्लीं मराठींत होणाऱ्या ग्रंथांची संख्या पूर्वीपेक्षां पुष्कळच वाढली आहे ह्यांत संशय नाहीं. त्यांपैकीं कांहीं ग्रंथांची योग्यता पूर्वीच्या ग्रंथांपेक्षा अधिक असते असेंही सामान्यत्वेंकरून म्हणावयास हरकत नाहीं. पूर्वी विद्वान लोकांची ग्रंथरचना बहुधा इंग्रजींतच होत असे, व त्यामुळें मराठी वाङ्मयांत चांगल्या ग्रंथांची फारशी भर पडत नसे. हल्लींची ग्रंथरचना बहुधा मराठींत होऊं लागली आहे. श्री. शंकर बाळकृष्ण दीक्षितांचें 'भारतीय ज्योतिषशास्त्र', टिळकांचें 'गीतारहस्य', श्री. चिंतामण विनायक वैद्यांचा 'महाभारताचा उपसंहार' व 'मध्ययुगीन भारत', श्री. सरदेसायांच्या रियासती, श्री. केळकरांचे 'मराठे व इंग्रज', श्री. वामन मल्हार जोशांचा 'नीतिशास्त्रप्रवेश', श्री. दप्तरी यांचे भारतीय युद्धकाल, रामायण काल इत्यादिकांवरील निबंध व 'धर्म-

रहस्य' हा ग्रंथ हीं या प्रवृत्तीची ठळक उदाहरणें होत. यांपैकीं टिळक व वैद्य यांची अव्वलची ग्रंथरचना इंग्रजींत झाली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

(४) भाषणांतील व ग्रंथांतील भाषासरणीच्या स्वरूपासंबंधानें मृत व जिवंत भाषांमध्यें महत्वाचा फरक असतो. हिंदुस्थानांतील निरानिराळ्या प्रांतांत भिन्नभिन्न देशी भाषा चालू असल्यामुळें त्या प्रांतांचा परस्परांशीं विचार–विनिमय होण्यासाठीं एक समान भाषा अवश्यक आहे. हल्लीं ती भाषा इंग्रजी आहे; परंतु इंग्रजी अंमलापूर्वीं ती संस्कृत होती व तिच्या मध्यस्थीनें तोंडीं व लेखी विचार–विनिमय करण्याइतकें ज्ञान सर्व प्रांतांतील पंडितांस असे. परंतु तें ज्ञान सामान्य व्यवहारांतील भाषणसंभाषणावरून उचललेलें नसून ग्रंथांतील भाषेवरून संपादिलेलें असल्यामुळें त्यांत वहात्या पाण्यांतील जिवंतपणा नसून सांचलेल्या डबक्यांतील निर्जीवपणा असे. भिन्नभिन्न व्यक्तींचे मनोधर्म व मनोविकार ह्यांस अनुरूप अशा भिन्नभिन्न भाषासरणी निर्माण करण्याचें सामर्थ्य त्या ज्ञानांत नसे, व तें ज्ञान केवळ अनुकरणरूपच असल्यामुळें संस्कृत भाषेंत भर पाडण्याचें कार्यही त्याजकडून होण्यासारखें नसे. सर्व पंडितांची लेखी व तोंडीं भाषा एकाच सांच्यांतून ओतल्याप्रमाणें ठराविक स्वरूपाची असे. तिच्या द्वारें विचार–विनिमय होई, पण भावनांचें प्रकटीकरण हें जें ललितवाङ्मयाचें सर्वस्व तें तिच्या साहाय्यानें होणें मुळींच शक्य नसे. आपल्याकडील विद्वानांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत येणाऱ्या इंग्रजी भाषेचाही तोच प्रकार आहे. इंग्रजी भाषा ज्यांची मातृभाषा आहे, त्यांस ती जिवंत भाषा असेल, पण आम्हांस तरी मृत भाषाच आहे. रानडे, तेलंग, चंदावरकर हे केवढेही जाडे आंग्लभाषापंडित असले, तरी त्यांचें इंग्रजीचें ज्ञान पुस्तकी व त्यांचें इंग्रजी लेखन कोणत्या तरी आवडत्या ग्रंथकाराच्या भाषेचें अनुकरण असल्यामुळें त्यांस त्या भाषेंत स्वतःच्या मनोधर्मास योग्य अशी नवी भाषाशैली निर्माण करण्याचें सामर्थ्य नव्हतें, व त्यांजकडून इंग्रजी भाषेंत भरही पडली नाहीं. त्यांच्या ग्रंथांत ग्रथित झालेले विचार कितीही नवीन व महत्वाचे असले तरी त्यांस आंग्लललितवाङ्मयांत काय-

मचें स्थान मिळणें शक्य नाहीं. मराठी भाषेचा प्रकार अगदीं निराळा आहे. तिच्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर व टिळक ह्या तिघांनींही निबंधरचना केली. पण तिघांचीही भाषासरणी निरनिराळी. तिघांनींही आपापल्या मनोधर्माप्रमाणें भिन्नभिन्न भाषाप्रकार निर्माण केले व मराठी भाषेंत विविध स्वरूपाची भर घातली. केशवसुत व बालकवि ह्या कवींच्या, हरिभाऊ आपटे व श्री. वामन मल्हार जोशी ह्या कादंबरीकारांच्या, देवल व गडकरी ह्या नाटककारांच्या कृतींची तुलना केली असतां प्रत्येकाच्या कृतींत त्याच्या स्वभावाची छाया पडली असल्याचें व तिजमुळें मराठी भाषेंत उपयुक्त भर पडल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल.

(५) आतां शेवटच्या मुद्याचा विचार करावयाचा. अशिक्षित समाजावर मराठी भाषेंतून होणाऱ्या पुराणांची, कथाकीर्तनांची, ललितांची, भजनांची पोवाडे लावण्या वगैरेंच्या गायनाची, व्याख्यानांची व नाटकांची किती छाप असते हें विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. पुराणें, कथाकीर्तनें, पोवाडे, लावण्या इत्यादिकांसंबंधीं सुशिक्षितांच्या मनांत एकेकाळीं फारसें प्रेम दिसून येत नसे. पण तें आतां आपल्या तत्संबंधीच्या उत्साहानें गतउपेक्षेचें क्षालन करीत आहेत. अलीकडील कांहीं विद्वानांना स्वतः पुराणें सांगण्यास, कथा करण्यास, भजनांत रंगून जाण्यास, पोवाड्यांचें व लावण्यांचें अध्ययन करण्यास कमीपणा वाटेनासा झाला आहे. त्यांचा मराठी भाषेविषयींचा आपलेपणा व अभिमान दुसऱ्याही अनेक दिशांनीं दिसूं लागला आहे.

महाराष्ट्रसाहित्यपरिषदेची स्थापना ही या बदललेल्या मनःस्थितीचें कारण नसली तरी तिचें एक प्रमुख मूर्त स्वरूप आहे. तिच्या जन्मापूर्वीच मराठीस एम्. ए. परीक्षेच्या अभ्यासक्रमांत पुन्हां स्थान मिळालें होतें. तिच्या ठरावांत नमूद केलेल्या शिफारशींस मुंबई व नागपूर विद्यापीठाकडून मूर्त स्वरूप देण्यांत आले आहे,व त्याचें श्रेय तिला स्वतःकडे घेण्याला हरकत नाहीं. प्रो. हरि गोविंद लिमये प्रभृतींच्या चिकाटीच्या प्रयत्नांनीं गेल्या सहा वर्षांपासून बी. ए. परीक्षेच्या अभ्यासक्रमांत मराठीस ऐच्छिक विषय म्हणून

स्थान मिळालें आहे. प्रवेशपरीक्षेनंतरच्या दोन वर्गांत अजून तिचा रिघाव झालेला नाहीं; त्यामुळें आगगाडीच्या मार्गांतील एखादा मोठा पूल मोडून पडल्यावर उतारूंची जी अडचण होते, तशीच मराठीच्या विद्यार्थ्यांची झाली आहे, व तिजमुळें मराठी भाषा घेणें हें एक धाडसाचें काम होऊन बसलें आहे. ती अडचण नाहींशी करण्याचें जोराचे प्रयत्न चालू आहेत व ती अल्पावधींत दूर होईल यांत संशय नाहीं. दुय्यम शिक्षणाचे माध्यम मुंबई इलाख्यांत अंशतः व मध्यप्रांतांत पूर्णपणें मराठी भाषा हेंच करण्यांत आलें आहे. परीक्षांतील प्रश्नांचीं उत्तरें मराठींतून देण्याची सवलतही अंशतः देण्यांत आली आहे. जुन्या परंपरेंतील विद्यार्थी त्या सवलतीचा फायदा घेत नाहींत व आणखी कांहीं वर्षे घेणार नाहींत हें खरें; पण कोणत्याही क्रांतीच्या काळांत असेंच व्हावयाचें. मराठी हें माध्यम सुटून इंग्रजी माध्यम सुरू होतेवेळीं विद्यार्थ्यांस विषयाचें आकलन करणें बरेंच जड जातें. व ही अडचण मराठी भाषा हेंच शिक्षणाचें आमूलाग्र माध्यम झाल्याशिवाय नाहींशी होणार नाहीं. तसें होण्यास भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्राची मराठी हीच मुख्य भाषा ठरली पाहिजे, व हल्लीं इंग्रजी भाषेस जें महत्त्व आहे, तेंच मराठीस प्राप्त झालें पाहिजे. राज्यकारभाराच्या निरनिराळया खात्यांचें सर्व काम मराठींतून चाललें पाहिजे. व विद्यापीठांत मराठीस आवश्यक विषय म्हणून स्थान मिळालें पाहिजे. आज ह्या गोष्टी मनोराज्यांतील वाटण्याचा संभव आहे. पण प्रांतिक राज्यकारभार जों जों. आधिकाधिक स्वायत्त होत जाईल तों तों तें मनोराज्य वास्तविक सृष्टींत उतरण्याची खात्री वाटते. बाकी भाषा व वाङ्मय सुधारण्यास स्वराज्याची आवश्यकताच आहे असें समजण्याचें कारण नाहीं. हिंदी व बंगाली भाषा व वाङ्मय यांचा स्वराज्यावांचूनच उत्कर्ष होत आहे तसा मराठी भाषेचा व वाङ्मयाचाही होण्यास प्रत्यवाय नाहीं.

मराठी विषयींच्या वाढत्या प्रेमाचीं व अभिमानाचीं आणखीही प्रमाणें पाहूं गेल्यास तीं आपणांस विपुल प्रमाणांत आढळतील. रानड्यांचा इंग्रजी–मराठी कोश, वासुदेवराव आपट्यांचा मराठी–मराठी कोश, पटवर्धनांचा फारशी–मराठी कोश, ज्ञानकोश, केंकऱ्यांचा पोर्च्युगीज–मराठी कोश, भिड्यांचें मराठी-

भाषेचे वाक्प्रचार व म्हणी, आपटयांचे मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, राजवाड्यांचा धातुकोश, ह्या ग्रंथांची रचना मराठी भाषेविषयींच्या असामान्य प्रेमाची व कळकळीची द्योतक आहे. भावे, जोशी व पोतदार ह्यांनीं प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा आणि देशपांडे ह्यांनीं महानुभावीय मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिला, त्यांस त्या वाङ्मयाबद्दल वाटणाऱ्या आत्मीय भावापासूनच प्रेरणा मिळाली. प्राचीन अप्रसिद्ध मराठी काव्यें व गद्य लेख हुडकून जतन किंवा प्रसिद्ध करण्यांत अनेक संशोधकांचे जे परिश्रम खर्ची पडत आहेत, त्यांस इतिहासाच्या प्रेमाबरोबर मराठी भाषेचेंही प्रेम कारणीभूत झालें आहे. प्राचीन मराठी कवींचीं चरित्रें, लोकहितवादी, चिपळूणकर इत्यादि गद्यग्रंथकारांचीं चरित्रें, प्राचीन व अर्वाचीन मराठी कवितेबद्दल होणारी गुणदोषविवेचनात्मक चर्चा, राम गणेश गडकऱ्यांसारख्या लोकप्रिय ग्रंथकाराच्या कृतींवर होणारे टीकात्मक वाङ्मय यांवरून मराठी वाङ्मयाविषयींचा वाढता अभिमान व्यक्त होतो. मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या उन्नतीसाठीं ज्या अनेक नव्या संस्था व माला निघत आहेत त्याही त्या अभिमानाच्या निदर्शकच आहेत. शास्त्रीय परिभाषा व इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय तयार करण्याच्या कामीं जे अनेक प्रयत्न चालू आहेत त्यांच्याही उगमाशीं स्वभाषाप्रेमच असलेलें दिसून येईल. हैद्राबादेसारख्या मुसलमानी संस्थानांत व गोव्यासारख्या पोर्च्युगीज अंमलाखालील प्रदेशांत मराठी भाषेच्या अभिमानानें ज्या शाळा व इतर संस्था महाराष्ट्रीय लोकांकडून स्वार्थत्यागपूर्वक चालविण्यांत येत आहेत, त्यांवरून तो अभिमान इंग्रजी अंमलाखालील मुलखांतल्यापेक्षांही जाज्वल्य असल्याचें प्रत्ययाला येतें. नाशिक येथें नुकतेंच जें ख्रिस्तीसाहित्यसंमेलन भरलें, त्यावरून ख्रिस्ती समजांतही मराठी विषयींचा अभिमान जागृत झालेला दिसत आहे. विष्णुशास्त्री, केशवसुत, हरिभाऊ आपटे, गोविंदाग्रज यांच्या प्रतिवर्षी होणाऱ्या स्मृतिदिनांवरूनही त्या अभिमानाची तीव्रता कळून येते. महाराष्ट्रीय अर्वाचीन कवींची व गद्यग्रंथकारांची, शेक्सपियर, स्कॉट, वर्डस्वर्थ, मेकॉले, मार्कट्वेन, बर्नार्ड शॉ इत्यादि आंग्ल ग्रंथकारांशीं जी तुलना करण्यांत येते, तिच्यांत तार-

त्म्य जरी कमी असलें, तरी मराठी वाङ्मयाविषयींचा जाज्वल्य अभिमान निःसंदेहपणें दिसून येतो.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या काळीं आपल्या भाषेविषयीं जी उद्वेगजनक अनास्था वसत होती, तिचें सांप्रतच्या अतिरिक्त अभिमानांत रूपांतर होण्याची कारणें देतांना पहिलें स्थान खुद्द विष्णुशास्त्र्यांच्या लेखांसच दिलें पाहिजे. त्या लेखांनीं महाराष्ट्रीयांच्या स्वभाषेविषयीं निद्रित अभिमानास जागें केलें. त्यानंतर महादेव गोविंद रानड्यासारख्यांच्या परिश्रमांनीं मराठीस उच्च व दुय्यम शिक्षणामच्या अभ्यासक्रमांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. महाराष्ट्रीय साहित्य-परिषदेच्या ठरावांनीं समाजांत भाषाविषयक जागृति होण्यास बरेंच साहाय्य झालें. मागें स्वदेशीची व अलिकडे असहकारितेची जी लाट हिंदुस्थानभर उचंबळली, तिनें परभाषाद्वेषाबरोबर महाराष्ट्राच्या स्वभाषाप्रेमास ऊत आणिला असल्यास नवल नाहीं. विलायती कपड्यांच्याप्रमाणें इंग्रजी शब्दांची होळी जर करितां आली असती तर त्या शब्दांबद्दलचा तिटकारा आहे यापेक्षांही अधिक वाढला असता. अलिकडे सरकारी नोकरी दुर्लभ होऊं लागल्यापासून इंग्रजीच्या प्रसाराचें एक मोठेंच कारण नाहींसें झालें आहे. राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानाची प्रांतवार पुनर्घटना केल्यामुळें महाराष्ट्रांत होणाऱ्या प्रांतिक परिषदांच्या अधिवेशनांतून मराठींत भाषणें होऊं लागलीं आहेत. मतदानाचा अधिकार अत्यंत विस्तृत झाल्यामुळें उमेदवारांनीं मतदारासमोर करावयाचीं भाषणें मराठींत करणें त्यांना भाग पडूं लागलें आहे. स्थानिक कायदेमंडळांत मराठींत भाषणें करण्याची पूर्ण मुभा असल्यामुळें तेथेंही तीं होऊं लागलीं आहेत. पूर्वी शिक्षण पांढरपेशा वर्गांतील पुरुषांपुरतेंच मर्यादित असें, पण तें सक्तीचें व सार्वत्रिक होऊं लागल्यानें वाचकांचा व लेखकांचाही वर्ग वाढीस लागला आहे. केसरी, ज्ञानप्रकाश, इत्यादि वृत्त-पत्रांची योग्यता व लोकप्रियता बरीच वाढल्यामुळें आणि विविधज्ञानविस्तार, चित्रमयजगत् मनोरंजन इत्यादि मासिकांत पूर्वीपेक्षां बरेंच स्वतंत्र व वाचनीय लेख येऊं लागल्यामुळें इंग्रजी नियतकालिकांच्या बऱ्याच चहात्यांची तहान मराठी नियतकालिकांकडून भागविण्यांत येऊं लागली आहे. तसेंच इंग्रजी,

बंगाली, हिंदी, गुजराथी, ह्या भाषांतील अनेक चांगल्या कादंबऱ्यांची बरींच चांगलीं भाषांतरें व रूपांतरें प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें व कांहीं स्वतंत्र कादंबऱ्याही चांगल्यापैकीं निघूं लागल्यामुळें कादंबरीभक्तांची बरीच तलफ स्वदेशी मालावर भागूं लागली आहे. मराठी भाषा दुय्यम शिक्षणांत माध्यम व वरिष्ठ शिक्षणांत ऐच्छिक विषय झाल्यापासून अनेक चांगल्या शालोपयोगी पुस्तकांची निर्मिति होऊं लागली आहे. पूर्वी राष्ट्रीय दृष्टीनें लिहिलेला हिंदुस्थानचा इतिहास उपलब्ध नव्हता. पण अलिकडे इतिहासाचीं अनेक नवीं नवीं साधनें आटोक्यांत आल्यामुळें श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांस त्या दृष्टीनें इतिहास लिहितां आला, व तो बराच लोकप्रिय झाला आहे. काळेकृत 'वऱ्हाडचा इतिहास' व देशपांडेकृत 'महानुभावीय मराठी वाङ्मय' हे ग्रंथही आपुलकीच्या दृष्टीनें लिहिलेल्या इतिहासाचे चांगले मासले आहेत. संशोधनाबद्दल विशेष आवड असलेल्या वाचकांची हौस पुरविण्याची सोयही शंकर बाळकृष्ण दीक्षित, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, चिंतामण विनायक वैद्य, केशव लक्ष्मण दप्तरी ह्यांच्या पुस्तकांवरून व बाळ गंगाधर टिळकांच्या वेदकालावरील व आर्यांच्या मूळ वसतिस्थानावरील ग्रंथांच्या मराठी भाषांतरांवरून बरीच होण्यासारखी आहे. परंतु इंग्रजी वाङ्मयाकडे फाजील पक्षपातानें झुकत चाललेली महाराष्ट्रीयांची दृष्टि परत खेंचून मराठी भाषेकडे व वाङ्मयाकडे वळती करण्याचें मुख्य श्रेय जर कोणास द्यावयाचें असेल, तर तें मराठी भाषेंत स्वतंत्र व सरस ग्रंथरचना करणाऱ्या लेखकांसच दिलें पाहिजे. आजपर्यंत इंग्रजींतून अगर इतर देशी भाषांतून मराठींत अनेक भाषांतरें व रूपांतरें करण्यांत आलीं, पण त्यांनीं मराठी पुस्तकांत भर टाकण्यापलीकडे विशेष कार्य केलें नाहीं. उलटपक्षीं विष्णुशास्त्री चिपळुणकर, केशवसुत, हरीभाऊ आपटे, व राम गणेश गडकरी या व इतरही स्वतंत्र व बुद्धिमान लेखकांनीं आपल्या कृतींनीं इंग्रजी भाषेनें व वाङ्मयानें दिपून गेलेल्या समाजास मराठी भाषेचें सामर्थ्य दाखविलें, महाराष्ट्रीयांतही लेखनपटु, निबंधकार, कवि, कादंबरीकार, व नाटककार निपजूं शकतात, याची खात्री पटवून त्यांचे ठायीं आत्मविश्वास उत्पन्न केला, आणि लेखकांच्या परंपरा

निर्माण केल्या. यांतील प्रत्येक लेखकांत वैगुण्यें आढळतील व त्यांच्या भक्तांनीं तीं वैगुण्यें टाळून त्यांच्या गुणांचेंच अनुकरण केलें पाहिजे. पण त्यांच्यांत कोणतेही दोष असले, तरी त्यांनीं मराठी भाषेवर फार मोठे उपकार केले आहेत, याबद्दल दुमत असण्याचें कारण नाहीं.

या साऱ्या विवेचनाचा मतलब इतकाच कीं, मराठी भाषा मरावयास टेंकली असून तिला औषधाऐवजीं मांडी देणेंच योग्य आहे, असें जें राजवाड्यांस वाटत होतें, त्यांत प्रथम दर्शनीं वाटतें तितकें तथ्य नाहीं. ती भाषा व तिच्यांतील वाङ्मय दिवसेंदिवस अधिकाधिक जोमदार व संपन्न होत चाललें आहे. त्यांत इंग्रजी किंबहुना बंगाली व हिंदी भाषांतील व वाङ्मयांतील जोम व संपन्नता नसली, तरी मुमूर्षूंतील दुबळेपणा व उत्साहहीनता हीं सुद्धां नाहींत. इंग्रजी अभिजात वाङ्मयाची अखंड परंपरा आज चार पांच शतकांची तरी आहे. बंगाली व हिंदी अर्वाचीन वाङ्मयाची परंपरा तितकी जुनी नसली, तरी जवळ जवळ दीडशें वर्षांची आहे. इंग्लंड देश युरोपापासून अगदीं अलिप्त असल्यामुळें त्यास इतर देशांतील घडामोडींचा उपसर्ग मुळींच पोंचला नाहीं; व यामुळें त्यास वाङ्मयसेवा बऱ्याच निर्वेधपणें करितां आली. बंगाल प्रांताचा व उत्तर हिंदुस्थानांतील हिंदूंचा राजकीय इतिहास उज्वल नसल्यामुळें त्यांसही आपल्या वाङ्मयाची आराधना बऱ्याच स्वस्थपणें करितां आली. महाराष्ट्राचें बहुतेक प्राचीन मराठी वाङ्मय परमार्थपर, पद्यमय, व परतंत्र असें होतें. जरी त्यांतील अनेक स्थलें अत्यंत सुंदर कल्पना व सोज्वळ भाषा ह्यांनीं मंडित आहेत, तरी त्याचा फारच थोडा भाव वाङ्मय दृष्टीनें लिहिलेला आहे. जें वाङ्मय पूर्णपणें स्वतंत्र म्हणतां येईल, त्यांतही कलाकृति या सदराखालीं येणारें फारच थोडे. नाहीं म्हणावयास शाहिरांकडून जे कांहीं ऐतिहासिक पोवाडे व शृंगारिक लावण्या रचण्यांत आल्या त्या मात्र ऐहिक विषयांवर असून त्यांत जिवंतपणा व कारागिरी दिसून येते. प्राचीन मराठी गद्य वाङ्मय म्हटलें म्हणजे बखरी व राजकीय पत्रव्यवहार. त्यांतही वाङ्मयदृष्टी साहजिकपणेंच कमी आढळते. ऐहिक विषयावरील गद्य व पद्य वाङ्मयास खरी सुरवात

इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर झाली. त्याची वाढ होण्यास जेमतेम एक शतकच मिळालें. या शतकांतही गतवैभवाच्या उद्वेगजनक विचारानें वाङ्मयसेवेंत बराच खंड पडला. इतर बाबतींतही महाराष्ट्रास विशेष अनुकूलता नाहीं. इंग्रजी वाङ्मयाचे वाचक साऱ्या जगभर पसरले असून संपन्न असल्यामुळें त्यांत एखादा चांगला ग्रंथ प्रसिद्ध होतांच त्याच्या प्रती लाखांनीं खपून त्याच्या कर्त्यास ताबडतोब विपुल धनाचा व कीर्तीचा लाभ होतो.

उत्तर हिंदुस्थान व बंगालप्रांत इंग्लंडच्या मानानें कमी संपन्न असतील पण महाराष्ट्राच्या मानानें तें बरेच संपन्न आहेत. बृहन्महाराष्ट्रांतील मराठी बोलणारांची संख्या दोन कोट तर बंगाली बोलणारांची तिच्या तिप्पट आणि हिंदी बोलणारांची संख्या तर तिजहूनही अधिक. तेव्हां इकडील ग्रंथकारांपेक्षां तिकडील ग्रंथकारास कीर्तीची व धनाची जोड फार विपुल व शीघ्र मिळण्याचा संभव. इंग्लंडमध्यें लेखकांची संख्या मोठी असल्यामुळें, त्यामध्यें तीव्र स्पर्धा चालू असते. त्यामुळें आणि तिकडील वाचकवर्गही बराच सुसंस्कृत व ज्ञानसंपन्न असल्यामुळें तिकडे प्रसिद्ध होणारें ग्रंथ बऱ्याच योग्यतेचे असतात ते लिहिण्यापूर्वी ग्रंथकारास बरीच पूर्वतयारी करावी लागते. आम्हामधील लेखकांची संख्या अत्यंत अल्प असल्यामुळें त्यांस अभ्यासाची किंवा व्यासंगाची कांहींच जरूरी भासत नाहीं. छंदःशास्त्राशीं व साहित्यशास्त्राशीं तर राहोच पण व्याकरणाशीं व शुद्ध लेखनाशीं सुद्धां पुसट ओळख करून घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाहीं. अशा लेखकांच्या लेखणींतून उतरलेले लेख कोणत्या योग्यतेचे असतील, याचा आपणच विचार करावा. पाश्चात्य देशांत मुलाचा कल व मगदूर त्याच्या बालपणींच अजमावण्यांत येतो. त्यामुळें त्याचा भावी व्यवसाय ठरविणें फार सोपें जातें. आमच्या मुलांस पत्नीप्रमाणें व्यवसाय निवडण्याचेंही स्वातंत्र्य नसतें; यामुळें उत्तम सैनिक होण्याजोगा इसम कवि होऊन छंदःशास्त्रांतील नियमांचे खून करूं लागतो, इमारतीच्या बांधकामावर देखरेख करण्यास योग्य असा इसम बांधेसूद कथानकें तयार करण्याच्या उद्योगास लागतो, एका एका चित्राप्रीत्यर्थ महिना महिना खर्च करणारा चित्रकार होण्यालायक इसम दैनिक पत्राचा

संपादक होऊन रोजचेरोज साऱ्या जगाची उठाठेव करूं लागतो, आणि मलमपट्टयांनीं जखमा बुजवणारा वैद्य होण्यास योग्य असा इसम आपल्या तीक्ष्ण लेखणीनें होतकरू लेखकांवर शरसंधान करणारा टीकाकार होतो. अखेरची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यास अगर त्याच्या पालकास त्यानें पुढें चालवावयाच्या धंद्याचा विचारही येत नाहीं. त्यानंतर त्याच्या पत्नीची निवड जशी त्याच्या वडिलांकडून होते, तशी त्याच्या धंद्याची होते. वडिलांचा जो धंदा तोच बहुधा त्याजवर लादण्यांत येतो. त्यानें स्वतः त्याची निवड केली तर ती स्वतःच्या आवडीप्रमाणें करण्याऐवजीं, धंद्यांत पडणारा त्रास आणि त्याच्या मानानें होणारा पैशाचा अगर कीर्तीचा लाभ यांकडे पाहूनच तो करतो; व ती निवड बहुधा चुकीची ठरते. धंदा चालू केल्यावर कालावधीनें त्यास आपली चूक कळून येते; पण त्याचा कांहीं उपयोग नसतो. याप्रमाणें पोटाचा धंदा व आवडीचा धंदा भिन्न असल्यामुळें त्याजकडून एकाचीहि नीट जोपासना होत नाहीं. स्वीकृत धंद्याकडे लक्ष लागत नाहीं, व आवडीच्या धंद्याकडे लक्ष पुरविण्यास सवड नसते. याप्रमाणें त्यास दोन्ही धंद्यांत अपयश येतें. दोन्ही धंद्यांत यश मिळविण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्या शारीरिक व बौद्धिक सामर्थ्यावर गैरवाजवी ताण पडून त्यास अकालीं वार्द्धक्य येतें. स्वीकृत व्यवसायाकडे आपले तनमनधन लावून त्यांत उत्तम यश मिळवणारे फारसे धंदेवाले आपणांमध्यें दिसत नाहींत, याचें कारण धंद्याची चुकीची निवड हेंच होय, ह्यांत संशय नाहीं.

याप्रमाणें इंग्लंडांतील लेखकांच्या मानानें आपणांकडील लेखकांस प्रत्येक तऱ्हेची प्रतिकूलता असतां त्यांस तिकडील लेखकांच्या बरोबरीनें यश आलें आहे, अशी स्वतःची समजूत करून घेणें चुकीचें होणार आहे. फाजील साशंकता जशी आपणांस घातक होईल, तसा फाजील आत्मविश्वासही होईल. गेल्या शतकांत आपण केलेली प्रगति आपल्या अडचणींच्या मानानें निःसंशय अभिनंदनीय आहे. पण अजून आपणांस फार मोठा पल्ला गांठावयाचा आहे, हें विसरून चालणार नाहीं. आपलें वाङ्मय निराश होण्याइतकें दरिद्री नाहीं,

तसें हुरळून जाण्याइतकें संपन्नही नाहीं. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें तें मरणाच्या दारीं बसलें नाहीं, तसेंच आपणांमधील फाजिल आशावाद्यांच्या मताप्रमाणें आंग्ल वाङ्मयाइतकें प्रौढ दशेप्रत पोंचलेलेंही नाहीं. तें बाल्य व तारुण्य यांच्या संधिकालांत आहे, असें म्हटल्यास त्याचें योग्य वर्णन केल्यासारखें होईल. अजून त्याचें बाल्यांतील पारतंत्र्य पूर्णपणें सुटलें नाहीं. हें प्रतिवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या स्वतंत्र व इतर पुस्तकांची मोजदाद केल्यास दिसून येईल. बाळपणीं पारतंत्र्य कबूल करण्याची लाज तरी वाटत नाहीं, पण बाल्य संपवून तारुण्यांत प्रवेश करूं पहाणाऱ्या आपल्या वाङ्मयांतील लेखकांस पारतंत्र्य पतकरीत असतांही तें कबूल करण्याची मनस्वी लाज वाटत असते. वास्तविक पहातां स्वतंत्र व भाषांतररूप अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथांची भिन्न प्रकारची योग्यता असते. स्वतंत्र रचना अल्पप्रमाणांत झाली तरी तिनें बुद्धिमान व कल्पक लेखकांच्या सामर्थ्यास अवसर मिळून त्याची जोपासना होते, आणि ती रचना विशेष सरस व उज्वल असल्यास तिचा व तिला जन्म देणाऱ्या देशाचाही परदेशांत बोलबाला होतो. उलटपक्षीं भाषांतररूप ग्रंथांनीं तें कार्य झालें नाहीं, तरी वाङ्मयांत थोड्या काळांत विपुल भर पडून होतकरू लेखकांपुढें उत्तमोत्तम आदर्श ठेवण्याचें कार्य होतें. त्या ग्रंथांची भाषा सुंदर असल्यास त्यांकडून भाषेचीही उत्तम सेवा होते. अशा ग्रंथांच्या लेखकांस त्यांबद्दल लाज वाटण्याचें मुळींच कारण नसतें. असें असतां भाषांतररूप व रूपांतररूप असलेलीं पुस्तकें स्वतंत्र भासविण्याकरतां त्यांच्या कर्त्यांकडून ज्या क्लृप्त्या लढविण्यांत येतात, त्या पाहून ही कल्पनाशक्ति स्वतंत्र रचनेकडे लागली असती तर किती चांगलें झालें असतें असा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील मराठी लेखकांस आपली कृति इंग्रजी ग्रंथाच्या आधारें तयार झाली आहे, असें करण्यांत भूषण वाटे. हल्लीं त्यांत कमीपणा वाटतो. पण स्वतंत्र रचनेबद्दल वाटणारा हा आदर उसनवारी लपवून व्यक्त करण्यापेक्षां स्वतंत्र रचनेचा अवलंब करूनच प्रगट करणें योग्य होईल. उसनवारी करूनही स्वतंत्र रचनेचें श्रेय मिळावितां येतें, असा होतकरू लेखकांचा समज झाल्यास ते स्वतंत्र रचनेच्या खटाटोपांत कशाला पडतील ? परभाषेंतील पुस्तकांच्या

पांगुळगाड्याच्या आधारानें अल्पावकाशांत व दगदगीशिवाय कीर्तिमंदिर गांठण्याची खात्री असल्यावर केवळ आपल्या दुबळ्या पायावर उभें राहून तें मंदिर दृष्टिपथांतही येण्याची फारशी आशा नसतां पडत झडत चालण्याची कोणास हौस वाटेल ? या चोरट्या उसनवारीनें दांभिकपणा तर वाढत आहेच पण आपलें बौद्धिक सामर्थ्य उपयोगांत न आल्यामुळें उत्तरोत्तर ऱ्हास पावत आहे. इतर भाषांतून केलेल्या उसनवारीची फेड शेंकड्यास एक या प्रमाणांत तरी आपणांकडून होत आहे काय ? ही शोचनीय स्थिती अशीच चालू राहिल्यास लवकरच मराठी वाङ्मयास नादार व्हावें लागणार आहे. परकीय भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें होणें जरूर आहे, याबद्दल वाद नाहीं. पण अशा एका ग्रंथामागें पांच तरी बऱ्यापैकीं स्वतंत्र ग्रंथ तयार झाले पाहिजेत. तसें न होतां एका स्वयंप्रकाशित चांगल्या ग्रंथामागें शंभर परप्रकाशित ग्रंथ निर्माण व्हावे, ही गोष्ट अत्यंत लज्जास्पद आहे.

परावलंबनाशिवाय बाल्यांतील आणखीही कांहीं विशेष आपल्या वाङ्मयांत दिसून येतील. आपल्या अंगरजानें आपल्या जनकास मलिन करणें, अकारण हास्य करून अवास्तव आशावादीपणा प्रगट करणें, वडिलांच्या खांद्यावर बसून आपण त्यांच्यापेक्षांही उंच आहों अशी प्रौढी मिरविणें, अर्थविहीन शब्दावडंबराचें बाळसें धरणें, " अडगुळं मडगुळं सोन्याचें कडबुळं " यासारखें अनुप्रास साधण्याकरतां निरर्थक शब्दांचा डोलारा उभारणें हे ते विशेष होत. त्याबरोबरच तारुण्यांतील उच्छृंखलपणा, अनौचित्य हे दुर्गुणही दिसून येतात. प्रौढ वाङ्मयांत दिसून येणारे औचित्यदृष्टि, सौंदर्यदृष्टि, संयम हे गुण मात्र अजून मराठी वाङ्मयांत फारसे दिसूं लागले नाहींत. आपण एकादी कल्पना किंवा कोटि साधण्याकरितां औचित्यभंगाचा दोष पत्करण्यास तयार होतों, हास्यरस उत्पन्न करण्याकरतां सौंदर्याचा बळी देतों, अल्पविस्तरत्व हा सुभाषिताचा आत्मा आहे, हें विसरून एखाद्या क्षुल्लक कल्पनेच्या परिपोषणार्थ किंवा स्पष्टीकरणार्थ पानेंच्यापानें खर्चीं घालतों, आणि विनोद किंवा चमत्कृति साधण्याकरितां कथानकाशीं सोयरसुतक न बाळगणारे प्रवेश व व्यक्ति

निर्मून त्या कथानकाच्या बांधेसूदपणाची व सेंद्रियत्वाची हानि करितों. प्रौढ व परिपक्व बुद्धीचें पाश्चात्य ग्रंथकार लाघव व सहजपणा साधण्याकरितां भगीरथ प्रयत्न करितात; उलटपक्षीं आपण ते गुण सुसाध्य आहेत, असा समज करून घेऊन कृत्रिम व अस्वाभाविक प्रकार साधण्यांतच आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करतों. याप्रमाणें आपलें वाङ्मय बाल्य व तारुण्य यांच्या सीमेवर उभें असून त्याच्या ठायीं बालपणींचें दौर्बल्य व भावी तारुण्यांतील उच्छृंखलपणा ह्यांचें विलक्षण मिश्रण झालें आहे.

महाराष्ट्रीय वाङ्मयास प्रत्येक तऱ्हेची प्रतिकूलता असतां त्यानें थोड्यांच अवधींत सर्व गोष्टींची अनुकूलता असलेल्या आंग्ल वाङ्मयाची बरोबरी करण्यास समर्थ व्हावें, इतकी ईश्वराची आम्हांवर विशेष कृपादृष्टि आहे काय? तशी कृपादृष्टि असती तर आमचा देश इतक्या विपन्नावस्थेस येऊन पोंचला असता काय? देशांत वारंवार पडणारीं अवर्षणें व दुष्काळ, कायमचें ठाणें देऊन बसलेलें अठराविश्वे दारिद्र्य, सुशिक्षितांत वाढत जाणारी बेकारी, शेंकडों वर्षांच्या गुलामगिरीमुळें उत्पन्न झालेलें दैन्य व दुबळेपणा, हिंदु-मुसलमानांतील व ब्राह्मणब्राह्मणेतरांतील भयंकर दुही, अस्पृश्यासारख्या स्वकीयांबद्दल वाटत असणारी लज्जास्पद बेफिकिरी, व्यवहारांत पदोपदीं दिसून येणारा अप्रामाणिकपणा व स्वार्थीपणा, परदेशांत होणारी दुर्धर विटंबना, जनतेंत पसरलेलें गाढ अज्ञान, हीं सारी ईश्वरी कृपादृष्टीचींच चिन्हें आहेत काय? प्रत्येक काळांतील संस्कृति त्या काळांतील वाङ्मयांत प्रतिबिंबित होत असते असा नियम आहे. एलिझाबेथ व व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दीतील इंग्लंडची भरभराट तत्कालीन वाङ्मयांत व दुसऱ्या चार्लस राजाच्या आमदानींतील हीन स्थिति तत्कालीन हीन वाङ्मयांत स्पष्टपणें उमटलेली आहे. आपल्या देशांतही विक्रम, भोज इत्यादि भाग्यशाली राजांच्या राजवटींतच संस्कृत वाङ्मयाचा उत्कर्ष झाला. वाङ्मयावरून जसा संस्कृतीचा अदमास करितां येतो तसा उलट संस्कृतीवरून वाङ्मयाच्या मगदुराचाही करतां येतो. वर वर्णिलेल्या लोकस्थितीवरून जर आपल्या वाङ्मयाच्या योग्यतेचें अनुमान केलें, तर तें मी वर दिलेल्या अनुमानाहून फारसें भिन्न होणार नाहीं, असें वाटतें. यः

मुद्याचा इतका विस्तार करण्याचा हेतू हाच कीं मराठी वाङ्मयाच्या अलिकडील उत्कर्षामुळें बऱ्याच ठिकाणीं जो कृतकृत्यतेचा ध्वनि निघत आहे त्यास आळा बसावा, व आपलें वाङ्मय जरी प्रगतीचा मार्ग सपाट्यानें आक्रमूं लागलें आहे. तरी त्यानें अजून तारुण्यांत प्रवेश केलेला नाहीं, हें वाङ्मयसेवकांच्या मनांत पूर्णपणें ठसावें. मराठी वाङ्मयाच्या अलीकडील जोराच्या मजलांमुळें त्याच्या कांहीं उपासकांत एक प्रकारचा उन्माद उत्पन्न झाला आहे आणि त्याची मजल कांहीं प्रमुख कवि व नाटककार कालिदासापेक्षां व शेक्सपीयरपेक्षां श्रेष्ठ आहेत, अशीं धाडशी विधानें करण्यापर्यंत येऊन ठेपली आहे. खुद्द गडकऱ्यांनी "कांहीं इंग्रजी कविता वाचून" या आपल्या कवितेंत "पिठांत पाणी घालुनि केलें, दूध भलें निष्ठुर काळें। पितात गरिबांचीं बाळें। आम्हां मराठी शाहीरांच्या कवनांचा वाहे पूर। समाधान त्यांतच चूर। पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी। कवीश्वरें चढलीं भारी॥" असें जे उद्गार काढले आहेत, त्यावरून त्या काळींही त्या उन्मादाचा स्वैर संचार असल्याची त्यांना जाणीव होती, असें दिसून येतें. त्या उन्मादांतील अंधतेचा लोप होऊन मराठी वाङ्मयाबद्दलचा योग्य अभिमान अवशिष्ट रहावा, व त्यानें पुढील मार्ग आत्मविश्वासानें पण डोळसपणानें आक्रमण्याचें त्यास सामर्थ्य यावें, या उद्देशानेंच हें कटुकर्तव्य करावें लागलें. तें करण्याच्या भरांत मजकडून अधिकारातिक्रम झाला असल्यास त्याबद्दल मी क्षमा मागतों.

मराठी वाङ्मयाचा पुढील प्रवास शीघ्र व निर्विघ्न होण्यासाठीं या निषेधपर इशाऱ्याशिवाय कांहीं विधिरूप सूचनाही वरील विवेचनाच्या धोरणानें करण्यासारख्या आहेत. राजवाड्यांच्या चित्तांस शल्याप्रमाणें टोंचणारा इंग्रजी शब्दांच्या प्राचुर्याचा प्रश्न आपण ताबडतोब हातीं घेतला पाहिजे. शिक्षणाचें माध्यम म्हणून मराठी भाषेचा मुंबई विद्यापीठाच्या दुय्यम शिक्षणांत अंशतः व नागपूर विद्यापीठाच्या दुय्यम शिक्षणांत पूर्णपणें प्रवेश झाला असून मागेंपुढें पूर्वोक्त विद्यापीठाकडून उत्तरोक्त विद्यापीठाचें अनुकरण होण्याचा संभव आहे. उच्च शिक्षणांतही ती भावी काळांत माध्यम होण्याचा संभव नाहींसा नाहीं. सबब दुय्यम व उच्च शिक्षणक्रमांत नेमण्यास योग्य असे शास्त्रीय ग्रंथ

शक्य तितक्या लवकर तयार झाले पाहिजेत, व त्याकरितां अर्थवाहक, कर्ण-मधुर, व सुटसुटीत अशी शास्त्रीय परिभाषा तयार झाली पाहिजे. आजपर्यंत शारीरशास्त्र, ज्योतिःशास्त्र, वगैरे अनेक शास्त्रांतील मराठी परिभाषा तज्ज्ञांकडून सुचविण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें रानड्यांचा कोश, ज्ञानकोश, इत्यादि ग्रंथांतही अनेक पारिभाषिक शब्द सांपडण्यासारखे आहेत. बंगाली, हिंदी, गुज-राथी, या देशी भाषांही शास्त्रीय परिभाषा तयार झाल्या आहेत. त्या सर्वांतून योग्य निवड करून आणि जरूर व शक्य असल्यास नवीन शब्द तयार करून प्रत्येक शास्त्रांतील पूर्ण परिभाषा बनविण्यास साहित्यपरिषदेनें एक मंडळ नेमलें पाहिजे; व त्या मंडळाची प्रत्येक शास्त्रागणीक एकेक याप्रमाणें भिन्नभिन्न पोटमंडळांत विभागणी केली पाहिजे. यांपैकीं प्रत्येक पोटमंडळानें आपणांकडे सोंपवलेल्या शास्त्रांतील निरनिराळीं सदरें आपल्या सभासदांत वांटून घेऊन प्रत्येक सदरांतील परिभाषा नियमित काळांत तयार होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक पोटमंडळात तज्ज्ञांच्या जोडीस एकेक भाषा शास्त्रीही नेमणें योग्य होईल. पोटमंडळांच्या सभांत प्रत्येक सभासदानें तयार केलेल्या पारिभाषिक शब्दांची चर्चा होऊन व त्यांपैकीं कांहीं पसंत न पडल्यास त्यांच्या जागीं सुच-विण्यांत येणाऱ्या इतर शब्दांबद्दल वाटाघाट होऊन सर्वांत योग्य ठरणारी परि-भाषा कायम केली पाहिजे. तिचा विचार करून व तिच्यांत कांहीं वैगुण्यें आढ-ळल्यास, तीं दूर करून परिभाषा शक्य तितकी सर्वांग सुंदर करण्याकरतां एक सर्वाधिकारी मंडळ नेमल्यास उद्दिष्ट हेतु अधिक चांगल्या रीतीनें सिद्धीस जाईल. पण तसें मंडळ नेमले नाहीं, तरी चालेल. तयार झालेली परिभाषा साहित्यपत्रि-केंत प्रसिद्ध होऊन तिजवर तज्ज्ञांचे अभिप्राय मागविण्यांत आले पाहिजेत; व त्यांचा विचार झाल्यानंतर अखेरची परिभाषा मुक्रर होऊन साहित्यपत्रिकेंत प्रसिद्ध झाली पाहिजे. मंडळांतील सारे सभासद पुण्याचे रहिवाशी असल्यास पोटमंडळांच्या सभा भरविण्यास विशेष दगदग अगर खर्च होण्याचें कारण नाहीं.

शास्त्रीय परिभाषेप्रमाणेंच इंग्रजी ग्रंथांत येणाऱ्या सामान्य शब्दांचे व वाक्प्र-चारांचे मराठी जोडीदार तयार करण्याकरतांही एक मंडळ नेमणें

जरूर आहे. या मंडळांत शिंपी, सुतार, लोहार, कोळी, टांगेवाले वगैरे धंदेवाल्यांचे प्रतिनिधि नेमणेंही योग्य होईल. या धंदेवाल्यांच्या व्यवहारांत प्रचलित असलेले शद्ब त्यांजकडून मिळविणेंच इष्ट होईल. त्या शद्बांत कांहीं शब्द इंग्रजी शब्दांचे अपभ्रंश होऊन बनलेले आहेत. उदाहरणार्थ-कांचगुंज्या (Gauzes and buttons), पाना (Spanner बद्दल सुतारांकडून योजण्यांत येणारा शब्द), लोलक (Rowlock बद्दल कोळ्यांकडून योजण्यांत येणारा शब्द) तराई राईन (हे शब्द Trial व reins बद्दल तांगेवाले योजतात). जेथें इंग्रजी शब्दांस योग्य मराठी पर्याय मिळणें दुर्घट जातें, तेथें मूळ इंग्रजी शद्बच शुद्ध अगर अपभ्रष्ट स्वरूपांत योजणें योग्य होतें. अशा शब्दांचीं उदाहरणें यापूर्वीं दिलींच आहेत. या शब्दचमूस महायुद्धकाळीं रंगरूट हा एक नवा रंगरूट मिळाला. खुद्द इंग्रजांनीं कुली, पक्का, पंडित, बंगला, बक्षीस, चटणी, बाजार इत्यादि शद्ब आपणांपासून उचलले आहेत. त्याअर्थी आपणांसही त्यांची उसनवारी करण्यास हरकत नाहीं. मात्र ही उसनवारी अनिर्वाहपक्षींच करणें योग्य होईल. इंग्रजी शद्बांचे योग्य पर्याय निर्माण करण्याची टांकसाळ गेल्या चाळीस पन्नास वर्षांपासून चालू असून तिच्यांतून निघालेल्या परिस्थिति, सहानुभूति, सहकारिता, सहकार्य, प्रतियोगी, नोकरशाही, पायगाडी(Bicycle), फटफटी (Motor Cycle) इत्यादि नाण्यांवर समाजाच्या मंजुरीचा शिक्काही मिळाला आहे. या टांकसाळींतून अगदीं ताजी निघालेली व शिक्का बसण्याकरतां अजून समाजापुढें न आलेलीं कांहीं नाणीं मासल्याकरितां येथें देतों.

Motor = धूरगाडी. हा शब्द अर्थव्यक्तिक्षम असून कर्णमधुरही आहे. धूर्जटी शब्दाचा हा भाऊ शोभतो.

Money-bag = चामचंची.
Station = थांबा, उतार.
Footnote = पायटीप.
Stove = तेलचूल.
Waiting room = पडशाळा.
Railway = रूळरस्ता.

Rock-oil = खाणेल.
Diary = दैनंदिनी.
Uniform = गणवेष.

पहिले आठ शब्द श्री. माधव त्रिंबक पटवर्धनांनीं व शेवटचे दोन श्री. विनायकराव सावरकरांनीं निर्माण केले आहेत.

पण मराठी पर्याय शोधून काढण्यास इतर सर्व इंग्रजी शब्दांपेक्षां अधिक योग्य असे जर कोणते शब्द असतील, तर ते पूर्वी सांगितल्याप्रमाणें उठतां-बसतां, वेळींअवेळीं, आमच्या तोंडून निघणारे दिलगिरी, कृतज्ञता प्रगट करतांना, क्षमायाचना वगैरे करितांना योजण्यांत येणारे शब्द होत. ते शब्द आमच्या संस्कृतीशीं विलग दिसणारे असले तरी ज्याअर्थी आपणांकडून क्षुल्लक प्रसंगींही उच्चारण्यांत येतात त्या अर्थी त्यांचे मराठी पर्याय जितक्या लवकर तयार होतील, तितकें बरें. ‘ शक्य आहे, ’ ‘ आशा करितो ’ ‘ शिफारस करतो ’ ‘ उमेद वाटते ’ इत्यादि इंग्रजी वाक्प्रचार मराठींत रूढ झाले आहेत. त्यांत आणखीही कांहीं सदृश वाक्प्रचारांची भर पडली तर तें वावगें वाटण्याचें कारण नाहीं. तसेंच दुसऱ्यास संबोधतांना आपण इंग्रजी शब्दांची जी योजना करतों, तीही यापुढें बंद झाली पाहिजे. पतिपत्नींचा निर्देश करतांना किंवा त्यांस संबोधतांना त्यांचीं नांवें घेण्याचा प्रघात यापूर्वीच अल्प प्रमाणांत सुरू झाला आहे. तो वाढविला पाहिजे. अनेक मातापितर आपल्या अर्भकास ‘ बेबी ’ या इंग्रजी नांवानें संबोधतात. तें नांव त्या अर्भकास जें एकदां चिकटतें, तें त्या अर्भकानें दुसऱ्या बाल्यावस्थेंत जरी प्रवेश केला तरी सुटत नाहीं, व त्यांस ‘ राव ’ ‘पंत’ साहेब ’ यापैकीं कोणताही शब्द जोडतां येत नसल्यामुळें त्यानें त्याची जन्मभर गैरसोय होते. विद्यार्थी आपल्या गुरूस ज्या ‘ सर ’ ह्या नांवानें संबोधतात तें नांव इतकें रूढ झालें आहे कीं तें कधीं तरी प्रचारांतून जाईल कीं काय, याची शंकाच वाटते. त्याबद्दल ‘ गुरू ’ हा शब्द रूढ करण्याचा प्रयोग भाषाभक्तांनीं करून पाहाण्यासारखा आहे. ‘ सर ’ हा शब्द बरोबरीच्या माणसास संबोधतांनाही वापरण्यांत येतो. त्याअर्थी उत्तर हिंदुस्थानांत गुरू हा शब्द योजतात, तो त्याअर्थी इकडेही सुरू करण्यास हरकत नाहीं. त्या अर्थानें ‘महाराज’ हा शब्द

कधीं कधीं वापरतात पण तो फाजील आदर दर्शविणारा वाटतो ' राव ' ' राजश्री ' हे शब्द फाजील सलगी दर्शवणारे आहेत. ' देवा ' हा शब्दही उत्तर हिंदुस्थानांत गुरूप्रमाणेंच प्रचारांत आहे. तोही इकडे आणण्यासारखा आहे. वऱ्हाड व नागपूर प्रांतांत ' साहेब ' या शब्दाची याच अर्थी योजना करण्यांत येते, व त्याच्या मुसलमानी उगमाशिवाय त्यांत आक्षेपार्ह असें कांहीं नाहीं. या बाबीचा इतका विस्तार करण्याचें कारण अशा क्षुल्लक दिसणाऱ्या शब्दामुळेंच इंग्रजी शब्द योजण्याची प्रवृत्ति वाढत असते, हें होय. या शब्दाबद्दल म पर्याय शोधून काढण्याच्या प्रयत्नाबरोबरच नवीन शिरूं पाहणाऱ्या इंग्रजी शब्दास मज्जाव करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. आट्यापाट्याच्या खेळांत ज्याप्रमाणें प्रतिपक्षांतील एखाद्या गड्यास कोंडीच्या एका बाजूस अडवण्यास जावें तों दुसरा गडी दुसऱ्याच बाजूनें निसटून प्रवेश करतो, तशी स्थिति इंग्रजी शब्दांच्या शिरजोरीमुळें होणाऱ्या आपल्या भाषाभक्तांच्या तारांबळीची झाली आहे. अलीकडे ' मिष्टर ' हा शब्दही ' सर ' शब्दाप्रमाणें आपल्या भाषेंत स्थाईक होण्याच्या उद्देशानें मराठी कादंबऱ्यांत व नाटकांत डोकावूं लागला आहे. मराठी भाषामंदिराच्या ओसरींत या 'मिष्टरनें' ऐसपैस पाय पसरण्यापूर्वीच त्यास अर्धचंद्र मिळाला पाहिजे.

मराठी भाषेच्या प्रांतांतून इंग्रजी शब्दांची जों जों हकालपट्टी होत जाईल तों तों मराठींत योग्य शब्द नसल्यामुळें इंग्रजी शब्द वापरावे लागतात, या सबबीस जागा रहाणार नाहीं. इंग्रजीबद्दल मराठी माध्यम झाल्याचा परिणाम पुढील पिढीपासून इंग्रजी शब्दांच्या विरळतेच्या रूपानें दिसावयास लागणार हेंही निश्चित आहे. पण तोंपर्यंत आपण आपल्या तोंडीं बसलेले इंग्रजी शब्द घोकीत स्वस्थच बसणार काय ? स्वस्थ बसल्यास केवळ आपल्याकडेच स्वाभिमानशून्यता येईल असें नाहीं, तर आपण आपल्या संसर्गानें भावी पिढीस दूषित करून निर्भेळ मराठी बोलण्याचें श्रेय तिजकडून हिरावून घेऊं. सबब चालू पिढींतील प्रत्येक मराठी भाषेच्या अभिमान्यानें मराठी संभाषणांत इंग्रजीवर पूर्ण बहिष्कार घालण्याचा निर्धार केला पाहिजे, व तो अंमलांत आणून गत अपराधाचें पूर्ण क्षालन केलें पाहिजे; आज जर मराठी शुद्धीकरणाचा कायदा

अस्तित्वांत असता, व त्यानें दर इंग्रजी शब्दामागें एक दिवस सक्तमजुरीची शिक्षा ठेवली असती, तर आपणांस असा निर्धार करण्याचें कारण पडलें नसतें. कायद्यापेक्षां अन्तःस्फूर्तीनेंच सुधारणा घडवून आणणें इष्ट असें प्रतिपादन करणारांवर या बावतींत अधिक जबाबदारी येते हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. इंग्रजी शब्द मराठी संभाषणांत जितक्या सौकर्यानें शिरले, तितकेच अवघड काम त्यांना त्यांतून हुसकून लावणें होणार आहे. पण तें अवघड कामही एक आवश्यक कर्तव्य म्हणून आपण पार पाडिलें पाहिजे. तोंडास येतील ते इंग्रजी-मराठी शब्द उच्चारीत बडबड करण्यापेक्षां निव्वळ मराठी शब्द सावकाश उच्चारीत गेल्यास भाषाशुद्धीबरोबर विचारांचा व्यवस्थितपणाही साधण्यासारखा आहे. माधवराव रानड्यांनीं चणे-कुरमुरे मंडळ नांवाची एक खाजगी संस्था काढली असून त्या संस्थेच्या सभासदांनीं इंग्रजी शद्बावर पूर्ण बहिष्कार टाकला होता, अशी एक आख्यायिका आहे. सभासदांच्या तोंडीं येणाऱ्या प्रत्येक इंग्रजी शब्दागणिक एक पै दंड द्यावा लागून वसूल होणाऱ्या रकमेंतून चणेकुरमुरे विकत घेण्यांत येत; व जिभेनें केलेल्या गुन्ह्याबद्दल तिला चणेकुरमुऱ्यांची खडी फोडावी लागे Promissory Note बद्दल परमेश्वरी नोट हा शब्द याच मंडळानें काढला असें म्हणतात. ज्या दस्त-ऐवजाच्या आधारानें कर्जाऊ रक्कम मिळून ऋणकोची गरज तावडतोब भागते, त्याला परमेश्वरी हें सार्थ नांव दिल्याबद्दल प्रत्येक ऋणकोनें मंडळास दुवा दिला असला पाहिजे, त्यांत शंका नाहीं. असेंच एक मंडळ अलीकडे पुण्यास स्थापन झाल्याचें व त्याजकडून भाषाशुद्धीचें काम समाधानकारक रीतीनें चालत असल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. सभासदानें एखादा इंग्रजी शब्द उच्चारल्यास त्यास दुसऱ्या सभासदानें योग्य मराठी शब्द सुचविल्याशिवाय तो गुन्हा सम-जला जाऊं नये असा त्या मंडळाचा नियम आहे. यामुळें दंडांतून मिळणाऱ्या खाद्यपेयांच्या आमिषानें बुद्धिपुरःसर होणाऱ्या गुन्ह्यांचें प्रमाणही वाढत नाहीं, व मराठी शब्द सुचविण्याची इतर सभासदांवर जबाबदारी पडल्यामुळें योग्य शब्दांची चर्चाही होते, असा त्या नियमाचा दुहेरी फायदा आहे. अशीं मंडळें जितकीं निघतील तितकीं पाहिजेच आहेत. या संबंधानें साहित्यपरिषदेनेंही मराठी ही मातृभाषा असणाऱ्या इसमांनीं परस्परांशीं संभाषण करतांना निर्भेळ

मराठीच भाषा वापरली पाहिजे असा एक शिफारसवजा ठराव करणें श्रेयस्कर आहे. मात्र सूतवर्गणीसंबंधानें देण्यांत येणाऱ्या सवलतीप्रमाणें शुद्ध मराठी बोलण्याच्या बाबतींत सवलती देण्यांत येऊं नयेत; नाहींतर धेडगुजरी मराठी बोलण्यास सवकलेल्या इसमाला दरमहा चार आणे फेंकून देऊन अगर शुध्द मराठी भाषा बोलण्याकारितां मोलानें एखादा मजूर ठेऊन तसें करण्याची मुभा दिल्यासारखें होईल. महाराष्ट्रीयांनीं परस्परांशीं पत्रव्यवहार करतांनाही तो इंग्रजींत न करतां मराठींत करावा असाही ठराव परिषदेनें करणें जरूर आहे. मात्र त्याबरोबरच मोडी लिपींत जीं थोडीं वैगुण्यें आहेत, तीं नाहींशी करण्याचाही तिनें प्रयत्न केला पाहिजे. त्या वैगुण्यामुळें केवळ पत्रलेखकांचीच नव्हे, तर ग्रंथकारांचीही गैरसोय होत असते. सभेंत भाषण करणाऱ्या वक्त्यानें त्या भाषणांत एकही इंग्रजी शब्द आणूं नये, अशीही साहित्यपरिषदेनें शिफारस करणें जरूर आहे. वक्त्यानें इंग्रजी शब्द उच्चारल्यास सभेंतील कोणाही श्रोत्यानें त्यास त्याचा पर्याय मोठ्यानें ओरडून सुचवावा या सूचनेचा दुरुपयोग होण्यासारखा नसता तर मी ती सूचना देखील अवश्य केली असती.

राजवाड्यांचा इंग्रजी शब्दांवर जसा कटाक्ष होता, तसा फारशी व आरबी या पौरस्त्य भाषांतील शब्दांवर नव्हता. या पक्षपाताचीं अनेक कारणें आहेत. या भाषांची घडण मराठी भाषेच्या स्वरूपाशीं जशी जुळण्यासारखी आहे, तशी इंग्रजी भाषेची नाहीं. विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी नामाच्या अंत्यस्वराचें सामान्यरूप होऊन उपान्त्य स्वरांतही कधीं कधीं विकार होतो, या नियमाचें मराठी शब्दांकडून जितक्या निष्ठुरतेनें पालन करविण्यांत येतें, तितक्याच सक्तीनें फारशी व आरबी शब्दांकडूनही करविण्यांत येतें. इंग्रजी शब्द बहुधा हा नियम पाळण्यापेक्षां टाळीतच असतात. फारशी व आरबी भाषांतील शब्दांचा मराठींत प्रवेश झाल्यास पांच शतकांहून अधिक काळ लोटला आहे. इंग्रजी शब्दांचा प्रवेश होऊन जेमतेम एक शतकच लोटलें आहे. शेकडों मुसलमानी शब्दांस मराठी अगर संस्कृत पर्याय उपलब्ध नसल्यामुळें ते आपणांस आवश्यक होऊन बसले आहेत. उदाहणार्थः—

१ भूमिविभागवाचक —इलाखा, जिल्हा, तालुका
२ कृषिव्यवसायोपयोगी —रब्बी, जिराईत.
३ राजसेवकव्यवहारोपयोगी —तपशील, मामलतदार, मिसल, मुनसफ, राजीनामा, वसूल, शिरस्तेदार, हिशेब.
४ न्यायव्यवहारोपयोगी —जप्ती, जातमुचलका, जामीन, मुद्दा.
५ राजकीयव्यवहारोपयोगी —सनदशीर.
६ व्यवसायवाचक —बेलदार, भिस्ती, मिस्त्री, मुकादम, वकील, सराफ, हमाल.
७ व्यवसायसाहित्यवाचक —अंगुस्तान, रंधा, वस्तरा.
८ पुष्पवाचक —गुलछबू, गुलाब.
९ फलवाचक —खरबूज, नारिंग.
११ खाद्यपेयवाचक —गुलकंद, बर्फी, मुरंबा, सरबत.
११ पाकसाहित्यवाचक —दालचिनी, बदाम, बेदाणा, मनुका.
१२ भूषणवाचक —बाजूबंद, मोहोर, लाल.
१३ वस्त्रवाचक —भरजरी, मखमल, मोजा, शाल.
१४ शृंगारोपयोगिसाहित्यवाचक—सफेता, साबण, सुरमा.
१५ आसनवाचक —खुर्ची, गालिचा, पलंग, पालखी, मेणा.
१६ वाद्यवाचक —डफ, ढोल, तबला, तंबुरा, तुणतुणें, सतार
१७ वास्तुविषयक —इमारत, मजला.

यांशिवाय जबाबदारी, तारीख, दुकान, नकाशा, मक्ता, मेज, रुमाल, रेशीम, लिफाफा, विमा, सोडत, हजेरी, हवा, असे योग्य प्रतिशब्दांच्या अभावीं आवश्यक होऊन बसलेले आणखी कितीतरी शब्द आहेत.

स्त्रियांच्या व मुलाबाळांच्या तोंडीं बसल्यामुळें प्रचारांतून काढून टाकण्यास जवळजवळ अशक्य असेही शेंकडों मुसलमानी शब्द आहेत. उदाहरणार्थः—

१ न्याय-व्यहारोपयोगी	—दावा
२ व्यवसायवाचक	—कारकून, चाकर, दाई, दिवाण, नोकर, शिपाई, हुजऱ्या.
३ खाद्यवाचक	—मेवा, हलवा.
४ पाकसाहित्यवाचक	—मसाला.
५ पात्रवाचक	—डबा, तबक, तवा, दौत, सुरई.
६ वस्त्रवाचक	—कुडतें, झबलें, पोषाख, रजई, सद्रा.
७ भूषणवाचक	—ताईत, बिलवर.
८ शृंगारोपयोगिसाहित्यवाचक	—अत्तर.
९ आसनवाचक	—गाशा, बिछाईत.
१० कालवाचक	—गुदस्ता, महिना, मुदत, रोज.
११ वास्तुविषयक	—जिना, महाल.
१२ क्रीडाविषयक	—डाव, नरद.

याशिवाय अखेर, अजून, कंवर, कागद, कायदा, खात्री, खुनी, खुषी, गरीव, छान, जागा, जिन्नस, झोंक, देखील, नजर, नाजूक, बिलकुल, बोचकें, मतलब, माल, रगड, सामान, सूज, सोपा, सोबत, हौस, असे वरील वर्गांत न पडणारे पण बायकामुलांच्या तोंडीं कायमचे बसलेले कितीतरी शब्द आहेत.

मुसलमानी शब्दांचा मराठी वाङ्मयांत विशेष उपयोग वीररसांत व हास्यरसांत होतो, या गोष्टीचें स्पष्टीकरण करण्याची जरुरी नाहीं. याप्रमाणें मुसलमानी शब्दांनीं मराठी भाषेची बरीच अडचण भागत असतां व सजावट होत असतां त्याजविरुद्ध एक जोराची मोहिम सुरू करण्यांत आली आहे.

हल्लीं हिंदुमुसलमानांत जी भयंकर तेढ उत्पन्न झाली आहे, तीच या मोहिमेच्या मुळाशीं असावी. त्या तेढीमुळें ह्या जातींत हल्लीं विस्तव जाईनासा झाला असला तरी ती शाश्वत स्वरूपाची आहे असें समजण्याचें कारण नाहीं. त्यापैकीं प्रत्येक जातीच्या लोकांची संख्या एवढी मोठी आहे व त्यांचे हितसंबंध परस्परांशीं इतके निगडित झाले आहेत कीं एका जातीचा दुसरीवांचून निभाव लागण्यासारखा नाहीं. तीस वर्षांपूर्वीं उभयतांमध्यें असेंच तीव्र वैमनस्य उत्पन्न झालें होतें. पण तें लवकरच शांत झालें. तशीच हल्लीची ही दुही अल्प अवधींत नाहीशीं होईल अशी खात्री वाटते. अशा जुजबी कारणांचा परिणाम भाषेसारख्या चिरस्थायी स्वरूपाच्या गोष्टीवर होऊं देणें कधींही समंजसपणाचें ठरणार नाहीं. उद्यां आपल्या कर्नाकटस्थ बंधूशीं जर आपली अशीच तेढ उत्पन्न झाली तर मराठी भाषेंतील कर्नाटकी शब्द काढून टाकण्यास आपण तयार होऊं कां ? संतकवींच्या कालांत संस्कृतज्ञ पंडितांनीं त्या कवींस जोराचा विरोध केला, त्यावेळीं त्या कवींनीं संस्कृत शब्दावर बहिष्कार घातला असता तर तें आत्मघातकीपणाचें ठरलें नसतें काय ? द्रविड, संस्कृत व मुसलमानी शब्द मराठी भाषेचे मुख्य घटक होऊन बसले आहेत. त्यापैकीं कोणत्याही वर्गांतील शब्दांचा समूळ त्याग केल्यानें मराठी भाषेस कायमचें पंगुत्व येऊन तिचें कधींही भरून न निघण्यासारखें नुकसान होणार आहे. मुसलमानांच्या चढाईच्या धार्मिक धोरणानें आपणांस चीड येणें रास्त असेल, पण त्याचें शासन मराठी व्याकरणाचें निर्बंध निमूटपणें पाळणाऱ्या बिचाऱ्या मुसलमानी शब्दास करण्यांत काय हंशील ? त्यानें मुसलमानांचें कांहींच नुकसान होण्यासारखें नसून आपल्या भाषेचें मात्र अपरिमित नुकसान होणार आहे. मुसलमानांच्या अपराधाचें शासन त्यांच्या शब्दांस द्यावयाचेंच असेल तर तें हद्दपारीनें देण्याऐवजीं त्यांना वेठीला धरून सक्त मजूरी करावयाला लावण्यानेंच देणें योग्य होईल. अनेक मुसलमानी शब्द आपल्या भाषेस किती आवश्यक आहेत व त्यांचें हिंदू पर्याय बनविणें किती निष्फल आहे याचा कांहीं अजमास या मोहिमेच्या पुरस्कर्त्यांनीं कांहीं मुसलमानी शब्दांस सुचविलेल्या पर्यायावरून होण्यासारखा आहे.

मुसलमानी शब्द	सुचविण्यांत आलेले पर्याय
कायदा	विधि
गैरहजर	अविद्यमान, अनुपस्थित
चाबूक	असूड
जबाबदारी	उत्तरदायित्व
दस्तुर खुद्द	स्वाक्षर
नकाशा	मानचित्र
रकाना	स्तंभ
सनदशीर	वैध
साहेब	राव, पंत
हजेरी	उपस्थिति
हवा	वारा, वायु

शब्दाचें नाणें व्यवहारांत चालू व्हावयास सुटसुटीत असावें लागतें हें लक्षांत वागविल्यास असले शब्द ग्राह्य होण्याचा फारसा संभव नाहीं हें कबूल करणें भाग पडेल. प्रचलित शब्दांऐवजीं हे नवे पर्याय वापरले असतां वाक्यांत केवढें स्थित्यंतर होतें तें पहाः–

"दादासाहेब सनदशीर चळवळीचे पुरस्कर्ते असल्यामुळें कायदेमंडळाच्या सभेला हजर राहण्याचें त्यांनीं स्वदस्तुरच्या सहीनें भाऊसाहेबांना कळविलें होतें. पण हवा बिघडल्यामुळें व महायुद्धावर नकाशे देऊन बरेच रकाने लिहावयाचे असल्यामुळें ते गैरहजर राहिले. त्यामुळें भाऊसाहेब रागावले व जबाबदारी न जाणणाऱ्या अशा लोकांना चाबकानें झोडपलें पाहिजे असे त्यांनीं उद्गार काढले." या वाक्यांतील मुसलमानी शब्दांबद्दल शुद्धपर्याय योजिले असतां त्याचें रूपांतर खालीं दिल्याप्रमाणें होतें:–

' दादाराव वैध चळवळीचे पुरस्कर्ते असल्यामुळें विधिमंडळाच्या सभेला उपस्थित होण्याचें त्यांनीं स्वाक्षरानें भाऊपंतांना कळविलें होतें. पण वायु बिघडल्यामुळें व महायुद्धावर मानचित्रें देऊन बरेच स्तंभ लिहावयाचे असल्यामुळें ते अविद्यमान झाले. त्यामुळें भाऊपंत रागावले व उत्तरदायित्व न जाणणाऱ्या अशा लोकांना असुडानें झोडपलें पाहिजे असे त्यांनीं उद्गार काढले,

मराठी भाषेंतील मुसलमानी शब्दांचें एकंदर प्रमाण शेंकडा पंधरा इतकेंच आहे व त्यांपैकीं दहा शब्दांचें अस्तित्व बखरी वगैरेंतच शिल्लक राहिले असून पांच शब्दच काय ते प्रचारांत आहेत असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ही संख्या इतकी अल्प आहे कीं, तिजमुळें मुसलमानांबद्दल विशेष कृतज्ञताबुद्धि मनांत वसण्याचें कारण नाहीं. मुसलमानी शब्द प्रचारांत राहिल्यानें मुसलमानांनीं आपणांवर मिळाविलेले विजय व आपल्या धर्माची केलेली विटंबना सतत दृष्टीपुढें राहून मनास व्यग्रता उत्पन्न केल्यावांचून रहाणार नाहींत असा एक कोटिक्रम बहिष्काराच्या वतीनें पुढें करण्यांत येत असतो. पण गेल्या हजार वर्षांपासून होत आलेली आपली राजकीय दुरवस्था व तिचीं कारणें त्या शब्दांच्या अखंड वास्तव्यामुळें खरोखरच आपल्या मनांत सारखी जागृत राहिल्यास ती एक इष्टापत्तीच होणार आहे. निदान परकीय सत्तेप्रमाणें परकीय शब्द जर अपरिहार्यच असतील तर त्यांचा अशा जागृतीच्या रूपानें उपयोग करून घेण्यासारखा आहे असें त्या कोटिक्रमास उत्तर देतां येईल.

मुसलमानी शब्दांच्या उपकारित्वामुळें आपणांस मुसलमानांबद्दल कृतज्ञता वाटते अगर त्यांच्या उच्चारामुळें आपल्या मनास व्यग्रता येते या सबबींच्या आधारानें जर त्यांजवरील बहिष्कार समर्थनीय ठरेल तर शब्दांशिवाय मुसलमानांच्या आणखी कितीतरी गोष्टींवर आपणांस बहिष्कार घालावा लागेल. महाराष्ट्रांत अलीकडे गायनाचा जो उत्कर्ष झालेला आहे. तो बहुधा मुसलमान वस्तादांपासून मिळालेल्या शिकवणीमुळेंच झाला आहे. प्रत्येक मुसलमानी वस्तूस त्याज्य समजावयाचें झाल्यास यच्चयावत् वस्तादी चिजास वाळींत टाकावें लागेल. अनेक महाराष्ट्रीय कुटुंबांचीं आडनांवें पेशवे, डबीर, अमीन, सबनीस, वाकनीस, शेकदार, जकातदार अशीं असून त्यांचा उगम उघड उघड मुसलमानी भाषेंतच असल्यामुळें त्यांजवर तिलांजलि देण्याला त्या कुटुंबांस तयार व्हावें लागेल. मुसलमानी शब्दांचा जसा त्याग करावयाचा तसा मोंगल बादशहा, हैद्राबादचे निजाम वगैरेंनीं दिलेल्या देणग्यांचाही त्याग करावा लागेल. मुसलमानी शब्दांवरील मोहीम जर आमूलाग्र चालवून यशस्वितेनें तडीस न्यावयाची असेल तर त्यांनी केवळ भाषणांतून व यापुढें प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतूनच हकालपट्टी करून

भागणार नाहीं; तर यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांतून व ग्रंथांतूनही करावी लागेल. जुन्या व नव्या कवितेंतून ' पाईक ' 'पैजार' 'फिर्याद' 'बहर' 'महाल' इत्यादि जे अनेक मुसलमानी शब्द शिरले आहेत, त्यांना तिच्यांतून हांकून द्यावें लागेल. इतकेंच नव्हे, तर बरेंच प्राचीन व सर्व अर्वाचीन वाङ्मय भाषा शुद्धीच्या दृष्टीनें पुन्हां लिहून काढावें लागेल. बरें, इतका खटाटोप करूनही मराठी भाषा निर्यवन होईल असेंही नाहीं. कारण या मोहिमेचे प्रमुख पुरस्कर्ते श्रीयुत विनायकराव सावरकर यांनीं "जिल्हाबोर्ड" या शब्दांस ' जिल्हा मंडळ ' हा पर्याय सुचवून जिल्हा या शब्दाची अपरिहार्यता पर्यायानें कबूल केली आहे; व त्या शब्दाइतकेंच अपरिहार्य दुसरेही अनेक शब्द असण्याचा संभव नाहींच असा त्यांचा आग्रह असेलसें वाटत नाहीं.

अनेक मुसलमानी शब्द मराठी भाषेंत सहजासहजीं आले नसून तत्सिध्यर्थ अनेक भाषा पंडितांना आपली बुद्धि खर्च करावी लागली आहे. इतकेंच नव्हे तर 'नोकरशाही' सारख्या कांहीं शब्दांच्यामागें विशेष इतिहासही आहे. इतक्या कष्टानें प्राप्त करून घेतलेली शब्दसंपत्ति केवळ भावनेला बळी पडून गमावणें केव्हांही योग्य होणार नाहीं.

परकीय शब्दांचा त्याग करून त्यांच्याबद्दल नवी विश्वामित्री सृष्टि निर्माण करण्याच्या वरील प्रकाराबरोबरच विदेशी शब्दांबद्दल उसना आपलेपणा धरून त्यांच्या अंगीं नसतें आर्यत्व चिकटवूं पाहण्याची एक नवीन टूम सुरूं झाली आहे. तिच्यांत स्वाभिमान नाहीं, प्रामाणिकपणा नाहीं व व्युत्पत्तिज्ञानही नाहीं, एवढेंच नव्हे तर तीमुळें त्या विदेशी शब्दांची आवश्यकता मात्र सिद्ध होते.

श्री. विनायकराव सावरकर अत्यंत बुद्धिमान, तेजस्वी व उत्साही लेखक आहेत. त्यांनीं यापूर्वी मराठी भाषेची चांगली सेवा केली आहे, व मुसलमानी शद्बांवरील मोहिमेसारख्या विशेष फलद्रूप न होणाऱ्या उद्योगाकडे त्यांनीं आपली बुद्धि खर्च न केल्यास त्यांजकडून यापुढेंही तशीच सेवा होण्याची मराठी भाषाभक्तांस सकारण आशा आहे. बुद्धिमान पुरुषाचा कोणताही उद्योग अगदींच वाया जात नसतो, या नियमास अनुसरून त्यांनीं सुरू केलेली ही मोहीमही अगदींच निरर्थक ठरली आहे असें नाहीं. कारण अलीकडे मराठी गद्यांत व पद्यांत

मुसलमानी शद्बांस जी बेसुमार भरती आली होती तिला त्या मोहिमेचा उदय झाल्यापासून ओहोटी लागल्याची स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. त्यांच्या उद्योगानें मराठी भाषेंतून मुसलमानी शब्दांस अर्धचंद्र न मिळाला तरी भाषेंत कांहीं उपयुक्त शद्बांची भर पडल्यावांचून राहणार नाहीं; व हा लाभही अल्प आहे असें नाहीं.

लेखकांकडून भाषेची व वाङ्मयाची सेवा होण्यास त्यांजपुढें कीर्तीचें व द्रव्याचें आमिष असणें पुष्कळदां जरूर असतें. त्यासंबंधानें साहित्यपरिषदेस कांहीं योजना करतां येण्यासारख्या आहेत. इंग्लंडांतल्याप्रमाणें इकडे सुसंस्कृत वाचकवर्ग अजून तयार झालेला नाहीं. सबब प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांवर साहित्य-पत्रिकेंत संक्षिप्तच पण स्पष्ट व पूर्वग्रहापासून अलिप्त असे अभिप्राय येणें जरूर आहे. गडकरी वाङ्मयांतील दोष निःस्पृहपणें न दाखविण्यांत आल्यामुळें गेल्या दशकांत अनेक होतकरू लेखकांची दिशाभूल झाली आहे; तशी इतःपर होतां कामा नये. नव्यानें प्रसिद्ध होणारें पुस्तक स्वतंत्र आहे कीं दुसऱ्या पुस्तकाच्या आधारानें लिहिलें आहे हें जाहीर होणें जरूर आहे. त्यानें स्वतंत्र व इतर पुस्तकांची भेसळ होण्याची व त्या भेसळींत स्वतंत्र ग्रंथांचें यश लुप्त होण्याची आपत्ति टळते. याकरतां प्रत्येक लेखकानें पुस्तक प्रसिद्ध करतांना तें स्वतंत्र आहे कीं नाहीं हें मलपृष्ठावर किंवा प्रस्तावनेंत नमूद केलें पाहिजे असा साहित्यपरिषदेनें नियम केला पाहिजे, व त्या नियमाचा भंग झाल्यास अगर याव-याची माहिती अन्यथा ठरल्यास अपराध्याचें नांव साहित्यपत्रिकेंत निषेधपूर्वक प्रसिद्ध केलें पाहिजे. सरस्वती व लक्ष्मी यांच्या सुप्रसिद्ध वैरामुळें पुष्कळदां लेखकांस आपला ग्रंथ प्रसिद्ध करण्याची ऐपत नसते. त्याचा ग्रंथ उत्तेजनार्ह असल्यास त्याच्या प्रसिद्धीची तजवीज साहित्यपरिषदेस करतां येण्यासारखी आहे. तिची स्थिति संपन्न नसल्यामुळें तिला तें काम स्वतः हातीं घेतां येणार नाहीं हें खरें; पण एखादा प्रकाशक हाताशीं बाळगून व साहित्यपरिषदेनें शिफा-रस केलेलीं सर्व पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें व तीं पुस्तकें बृहन्महाराष्ट्रांतील ग्रंथा-लयांस सवलतीनें विकण्याचें त्यानें कबूल केल्यास त्या ग्रंथालयांचा आश्रय मिळवून देऊन लेखक, प्रकाशक व ग्रंथालयें या तिघांचेंही कल्याण तिला

साधितां येण्यासारखें आहे. प्रत्येक वाचकानें वाङ्मयांचीं पुस्तकें दुसऱ्याकडून मागून न आणितां स्वतः खरेदी करावी असा पुष्कळदां उपदेश करण्यांत येत असतो. परंतु महाराष्ट्रीय समाज बहुधा दरिद्री असल्यामुळें तो उपदेश दुष्काळांत प्रजेनें उपाशीं रहाण्यापेक्षां बासुंदी कां खाऊं नये या प्रश्नाइतकाच हास्यास्पद असतो. त्यापेक्षां बृहन्महाराष्ट्रांतील ग्रंथालयांचा वर लिहिल्याप्रमाणें आश्रय मिळवितां आल्यास कोणाही एकावर बोजा न पडतां लेखकांस योग्य उत्तेजन मिळणार आहे. श्री. केशव लक्ष्मण दप्तरी या शोधकाचें नांव आतां महाराष्ट्रास चांगल्या प्रकारें परिचित असतां त्यांचें बरेंच महत्त्वाचें लिखाण अजून अप्रसिद्ध अवस्थेंत धूळ खात पडलें आहे; व त्यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेलें 'धर्मरहस्य' हें पुस्तक पदरच्या खर्चानें प्रसिद्ध केलें असतां तो खर्च भरून काढण्या इतकाही त्याचा खप होत नाहीं हें महाराष्ट्रास लाजिरवाणें आहे. नवीन निबंधांकरतां बक्षिसें लावण्यापेक्षां असें अप्रसिद्ध लिखाण प्रसिद्ध केल्यास साहित्यपरिषदेनें शिलकेंत असलेल्या निधीचा अधिक योग्य उपयोग केल्यासारखें होणार आहे. महाराष्ट्रीय लेखकांस उत्तेजन देण्याचा आणखीही एक उत्तम उपाय सुचवितां येण्यासारखा आहे. दर पांच वर्षांत प्रसिद्ध होणाऱ्या स्वतंत्र पुस्तकांत अत्यंत श्रेष्ठ ठरेल त्यास आपटे किंवा गडकरी या सारख्या श्रेष्ठ साहित्यसेवकाच्या नांवानें पांचशें किंवा हजार रुपयांचें बक्षीस देण्याचा साहित्यपरिषदेनें उपक्रम केल्यास तिजवर खर्चाचा विशेष बोजा न पडतां विद्यमान लेखकांस द्रव्याच्या व कीर्तीच्या रूपानें योग्य उत्तेजन मिळून गतसाहित्यसेवकाचेंही योग्य स्मारक होण्यासारखें आहे. पाश्चात्य देशांत 'नोबेल' सारख्या बक्षिसांच्या रकमा फार मोठ्या असतात व त्यावर लाथ मारण्याइतके बर्नार्ड शॉ सारखे श्रीमंत लेखकही असूं शकतात. महाराष्ट्रांतील लेखक त्यामानानें फारच अल्प संतुष्ट असल्यामुळें हजार पांचशें रुपयांसारख्या लहानशा रकमेनेंही त्यांस समाधान व उत्तेजन मिळण्यासारखें आहे,

आतांपर्यंतचें विवेचन निर्दोष व तर्कशुद्ध असल्यास राजवाड्यांनीं मराठी भाषेच्या प्रकृतीविषयीं केलेल्या निदानानें आपण घाबरून जाण्याचें तादृश कारण नाहीं. राजवाड्यांचाही हेतु आपणांस घाबरवून सोडण्यापेक्षां योग्य इशारा

देण्याचाच असला पाहिजे. परक्या भाषांतलि शब्दांचा सुकाळ हें भाषेच्या मुमूर्षुतेचें एकटेंच लक्षण असतें तर मराठेशाहींतील बखरींत व बोलण्याच्या भाषेंत जेव्हां मुसलमानी शब्दांचा विलक्षण सुळसुळाट झाला तेव्हांच मराठीनें राम म्हटला असता. परकीय शब्दांचें प्राचुर्य हें लक्षण जरी निर्णायक मानिलें तरी तेंहि मराठी भाषेच्या सद्यःस्थितीस लागू पडत नाहीं. कारण त्या प्राचुर्याचें वास्तव्य मराठी भाषेच्या एका कोपऱ्यांतच काय तें असून बाकीचा भाग अजून शाबूत आहे. तो कोंपराही अल्पावधींतच दुरुस्त होण्यासारखा आहे. याप्रमाणें मराठी भाषा आसन्न मरण अवस्थेंत नाहीं ही गोष्ट जरी अभिनंदनीय असली तरी तिचें स्थान अजून बाल्यावस्था व तारुण्य यामध्येंच कुठें तरी आहे ही गोष्ट फारशी अभिनंदनार्ह नाहीं. तिची प्रौढावस्थेच्या दिशेनें जरी प्रगति होत असली व जरी ती प्रगति कधीं कधीं सपाट्याची वाटली तरी झाडावर दोन हात चढून लागलीच तीन हात खालीं घसरणाऱ्या अंकगणितांतील मांजराच्या पुच्छप्रगतीप्रमाणें त्या प्रगतीस मधून मधून पिछेहाटीचें स्वरूप येत असतें. या पिछेहाटीचीं कारणें, व्यासंगाचा पूर्ण अभाव व थोर लेखकांचें अंधानुकरण हींच प्रमुखत्वेंकरून दिसून येतात. हल्लींचे कांहीं लेखक लेखनकलेंत बरेच निपुण असतात. पण एकंदर लेखांच्या वाङ्मयगुणांची सरासरी काढली तर ती बरीच निराशाजनक दिसून येईल. सामान्य लेखांचा मगदूर वाढावा अशी इच्छा असल्यास स्फूर्तीवर कमी भर देऊन लेखनकलेवर अधिक परिश्रम केले पाहिजेत, व थोर ग्रंथकारांचे तारतम्यपूर्वक अनुकरण केलें पाहिजे. अशी तयारी होत गेली म्हणजे लेखकांमध्यें स्पृहणीय स्पर्धा सुरू होईल व बऱ्यापैकीं ग्रंथकार अधिकाधिक प्रमाणांत निपजूं लागतील. बरे ग्रंथकार पुष्कळ निपजूं लागले म्हणजे त्यांतून एखादा चांगला ग्रंथकार निघेल. त्याच क्रमानें व पद्धतीनें अनेक चांगल्यांतून एकादा उत्तम व अनेक उत्तमांतून एकादा उत्कृष्ट ग्रंथकार उत्पन्न होईल. एक शेक्सपिअर उत्पन्न होण्यास त्याच्या खालोखालच्या योग्यतेचे अनेक नाटककार व एक स्कॉट निर्माण होण्यास त्याच्या खालेखालच्या दर्जाचे अनेक कादंबरीकार प्रथम जन्मले पाहिजेत. पाश्चात्य देशांत लेखनकला साध्य करून घेण्यांकरतां जितके परिश्रम होतात तितके आपणांकडे झाल्यास आपणांतही संपूर्ण जगास ललामभूत होणारे श्रेष्ठ ग्रंथकार उत्पन्न होतील. ते होत तोपर्यंत आपणांतील थोर

ग्रंथकारांबद्दल योग्य आदर बाळगून त्यांच्यापेक्षांही पुढील मजल गांठण्याचा चिकाटीचा प्रयत्न केला पाहिजे, म्हणजे त्यास यश आल्यावांचून रहाणार नाहीं.

राजवाड्यांचें निदान अचुक असून मराठी भाषा मरणाच्यादारीं बसली असती तरी ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् विकृतिर्जीवितम्' हें तत्व हाडींमाशीं मुरलेल्या आम्हां हिंदु लोकांस भय वाटण्याचें मुळींच कारण नसतें. आमचा पुनर्जन्मावर पूर्ण विश्वास असल्यामुळें मरण म्हणजे पुढील जन्माची तयारी इजहून भयंकर त्या विषयींची आमची कल्पना असणें शक्य नाहीं. तसें पाहूं गेलें तर संस्कृत, महाराष्ट्री, अपभ्रंश व मराठी या भाषांस परस्परापासून भिन्न मानण्यापेक्षां एकाच भाषेची निरनिराळ्या जन्मांतील स्वरूपें मानणें त्यांजमधील साम्य विरोध स्पष्ट होण्याच्या दृष्टीनें योग्य होईल. इंग्रजी-पूर्वीचा व नंतरचा हे जे मराठी भाषेचे दोन प्रमुख कालविभाग पडतात त्यांसही त्यांच्या स्वरूप भेदाच्या दृष्टीनें तिचे दोन जन्म मानतां येतील. तिच्या पूर्वजन्मांत तिनें अनेक रसाळ गीतांनीं परमेश्वरास आळवून परमार्थाचें साधन केलें. पण त्या जन्माच्या अखेरीस पोवाडे व लावण्या यांच्या रूपानें तिला ऐहिक भोग भोगण्याची इच्छा होऊन ती इच्छा पूर्ण करून घेण्याकरतां तिला दुसरा जन्म घ्यावा लागला. पूर्वजन्मातील संस्कार इतके दृढ असतात कीं त्यांचा पुढील जन्मावरही परिणाम होतो, हें पुनर्जन्म सिद्धांताचें एक महत्त्वाचें तत्त्व आहे. त्यास अनुसरून पूर्वजन्मांतील परकीय शब्दांच्या वैपुल्याची मराठीच्या दुसऱ्या जन्मांत पुनरावृत्ति होत आहे. पूर्वजन्मांत तिला जसा संस्कृत वाङ्मयाचा आधार घ्यावा लागला तसा दुसऱ्या जन्मांत इंग्रजी वाङ्मयाचा घ्यावा लागला आहे. या जन्मांतील तिच पहिला शतकार्ध लोकहितवादी, कीर्तनें, हळबे, रिसबूडद्वय, जोरवेकर, गुंजीकर अशीं कांहीं नांवें वगळल्यास पूर्ण पारतंत्र्यांत गेला. तेव्हांपासून बाल्य व तारुण्य यांमधील संधिकालास सुरवात झाली, व निबंध-मालेच्या जन्मापासून तिजमध्यें हळूं हळूं स्वतंत्र कर्तृत्व दिसून येऊं लागलें. या कर्तृत्वाची परंपरा विष्णुशास्त्र्यांपासून जी सुरू झाली ती आगरकर, टिळक, महा-जनी, गोळे, राजारामशास्त्री भागवत, हरिपंत पंडित, मंगेश जिवाजी तेलंग, राजवाडे, खरेशास्त्री, किर्लोस्कर, देवल, गडकरी, पुरुषोत्तम भास्कर डोंगरे, महादेव

त्र्यंबक वेंकटेश रहाळकर, हरिभाऊ आपटे इत्यादि गद्य ग्रंथकारांनीं व मोगरे, टिळक, केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज, बालकवि, दत्त, माधवानुज, रेंदाळकर इत्यादि कवींनीं उज्ज्वलतेनें चालविली; व अनेक अधिकारी विद्यमान लेखक ती अखंड राखण्याकरतां आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. बडोदें येथें १९२१ सालीं भरलेल्या साहित्य संमेलनाचे विद्वान अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांनीं अशा लेखकांचा गौरवपूर्वक उल्लेख केलेलाच आहे. त्यानंतर श्री. नारायण सीताराम फडके, श्री. वाग्भट नारायण देशपांडे, श्री. गो. गं. लिमये, श्री. न. र. फाटक, श्री. चिंतामण विनायक जोशी, श्री. माधव त्र्यंबक पटवर्धन, गिरीश, श्री. विष्णु सखाराम खांडेकर, श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर, श्री. श्री. ना. बनहट्टी, श्री. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. यशवंत, श्री. द. के. केळकर वगैरे नव्या दमाच्या लेखकांनीं व कवींनीं वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांत जी सुंदर भर घातली आहे तिजवरून या परंपरेच्या भविष्याविषयीं काळजी करण्याचें कारण नाहीं असें दिसून येईल. पहिल्या जन्मांतील कर्मानुसार मराठीला अजून मधून मधून पारतंत्र्याचे झटके येत असले तरी तिचा या जन्मांतील मुख्य रोंख स्वातंत्र्य प्राप्तीवर आहे, आणि त्या रोंखानें तिची या पूर्वीच अल्पस्वल्प प्रगति झाली आहे. तिच्या सेवकांच्या उत्साहावरून तिची पुढील प्रगति अखंड होणार अशी आशा वाटण्यास सबळ कारणें दिसूं लागलीं आहेत. ती आशा पूर्ण होऊन जगांतील भाषांच्या शर्यतींत तिनें जोराच्या मजला मारून अल्पावधींतच प्रमुख भाषांस गांठावें अशी शुभ इच्छा प्रकट करून मी हें प्रास्ताविक भाषण संपवितों.

ग्रंथालय
ग्रं. क्र. ३२८६
शाखा